


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार १ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




## थोडक्यात

### विद्यापीठात महिलेवर लैंगिक अत्याचार

**बंगळुरू/वृत्तसंस्था :** बंगळुरू विद्यापीठाचे माजी कुलसचिव प्रोफेसर बीसी मैलारप्पा यांना एका महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याच्या आणि तिच्या जीवाला धोका निर्माण केल्याच्या आरोपाखाली अटक केली. पीडितेच्या दोन तक्रारींनंतर बसवेश्वरनगर पोलिसांनी ही अटक केली. पोलिसांच्या माहितीनुसार, महिलेच्या पतीचे निधन झाले आहे. २०२२ मध्ये ती मैलारप्पा यांच्या संस्थेत काम करत असताना त्यांच्या संपर्कात आली. आरोपीने तिच्या एकाकीपणाचा फायदा घेतला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यास सुरु वात केली, असा आरोप महिलेने केला आहे. या प्राध्यापकाने त्या महिलेला मेसेज पाठवण्यास आणि तिच्याकडून सहकार्याची मागणी करण्यास सुरु वात केल्याचा आरोप आहे. महिलेने बसवेश्वरनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिस प्रकरणाचा तपास करत असताना, तिने कामाक्षीपाल्य पोलिस ठाण्यात दुसरी तक्रार दाखल केली, तिला मैलारप्पा विरु द्धची तक्रार मागे घेण्यासाठी धमकी दिली जात असल्याचा आरोप त्या महिलेने केला आहे.

### बॉर्डर पार करुन एकाचा भारतात प्रवेश करण्याचा प्रयत्न

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** मागील काही महिन्यांपासून भारत - पाकिस्तान सीमेवर मोठा बंदोबस्त आहे. 'ऑपरेशन सिंदूर' वेळी दोन्ही देशातील सीमेवर मोठा तणाव होता. दरम्यान, आता भारतीय सशस्त्र दलांनी सीमेवर दक्षता बाळगली आहे. मागील काही दिवसात असंख्य घुसखोरांना पकडले आहे. या क्रमात, बीएसएफने शुक्रवारी असाच आणखी एक प्रयत्न उधळून लावला. पाकिस्तान सीमा ओलांडून भारतात घुसण्याचा प्रयत्न करणा-या एका पाकिस्तानी व्यक्तीला सैनिकांनी अटक केली. फिरोजपूरमधील आंतरराष्ट्रीय सीमेजवळ घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडताना सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी एका पाकिस्तानी व्यक्तीला अटक केली आहे, असे बीएसएफने अधिकृत निवेदन जारी केले आहे. बीएसएफ पंजाब फ्रंटियरने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील एका पोस्टमध्ये याची माहिती दिली. 'जवानांना सीमेवर संशयास्पद हालचाली दिसल्या, त्यामुळे बीएसएफने तात्काळ कारवाई केली आणि जलालाबादजवळ भारतीय हद्दीत घुसलेल्या एका व्यक्तीला अटक केली. १६० व्या बटालियनच्या सैनिकांनी त्याला सीमा चौकीजवळ संशयास्पद हालचाल करताना पाहिले. बीएसएफच्या माहितीनुसार, घुसखोर इम्तियाज अहमद असे ओळख पटली आहे, तो पाकिस्तानच्या शकरगढ जिल्ह्यातील परवल गावचा रहिवासी आहे. 'सर्वात दक्षता आणि सतर्कता दाखवत, बीएसएफ जवानांनी फिरोजपूरमधील जलालाबादजवळ भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमा बेकायदेशीरपणे ओलांडणा-या एका पाकिस्तानी घुसखोराला अटक केली.

### 89 वर्षीय अभिनेते धर्मेंद्र मुंबईतील रु ग्णालयात दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :**ज्येष्ठ अभिनेते आणि बॉलिवूडचे हिमॅन धर्मेंद्र यांना रु ग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आज शुक्रवारी तब्येतीच्या तक्रारीमुळे



त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रु ग्णालयात नेण्यात आले. धर्मेंद्र आता नव्वदीला आले आहेत आणि रु टीन चेकअपसाठी त्यांना रु ग्णालयात दाखल करण्यात आल्याचंही सांगितलं जात आहे. त्यामुळे काळजी करण्यासारखं कोमतंही कारण नाही. धर्मेंद्र यांचं वय ८९ आहे. ८ डिसेंबर रोजी ते नव्वदी गाठणार आहेत. या वयातही त्यांची उर्जा, उत्साह, काम करण्याची इच्छा ही तरु णांनाही लाजवणारी असते. अनेकदा ते आपल्या दोन्ही मुलांसोबत नाचताना, गप्पा मारताना दिसतात. टीव्ही ९ भारतवर्षच्या रिपोर्टनुसार, धर्मेंद्र यांना वयानुसार स्वास्थ्यासंबंधी काही तक्रारी जाणवत आहेत. यामुळेच रु टीन चेकअपसाठी त्यांना रु ग्णालयात ॲडमिट करण्यात आलं आहे. त्यांच्या काही टेस्टही होणार आहेत. तरी गंभीर काहीही घडलेलं नसून काळजी करण्याचं कोणतंही कारण नाही. ठरल्याप्रमाणे दरवेळी त्यांना रु टीन चेकअपसाठी रु ग्णालयात नेण्यात येते. धर्मेंद्र यांचे चाहते आणि हितचिंतक आपल्या आवडत्या अभिनेत्यासाठी प्रार्थना करत आहेत. २०२३ साली ते करण जोहरच्या 'राकी और रानी की प्रेम कहानी' सिनेमात दिसले होते. यात त्यांचा शबाना आजमी यांच्यासोबत किसींग सीनही होता ज्याची खूप चर्चा झाली. तर आता धर्मेंद्र हे श्रीराम राघवन यांच्या आगामी 'इक्कीस'सिनेमातही दिसणार आहेत. यामध्ये अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा मुख्य भूमिकेत आहे.

### *दुलारचंद यादव यांचा मृत्यू गोळी लागल्याने झाला नाही*

■ डॉक्टरांचा मोठा खुलासा! ■

मोकामा येथील दुलारचंद यादव यांच्या मृत्यू प्रकरणात संशस्यास्पद माहिती समोर आली. शवविच्छेदन करणा-या डॉक्टरांच्या एका वक्तव्यामुळे या प्रकरणाला अनपेक्षित वळण आले. दुलारचंद यादव यांचा मृत्यू गोळी लागल्याने झाला नसल्याचे शवविच्छेदन करणा-या डॉक्टरांच्या पथकाने स्पष्ट केले आहे. डॉ. अजय कुमार यांच्या नेतृत्वाखालील तीन डॉक्टरांच्या पथकाने दुलारचंद यादव यांच्या पार्थिवाचे शवविच्छेदन केले. डॉ. कुमार यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, 'दुलारचंद यांना घोट्याजवळ गोळी लागली आणि ती गोळी पायातून पार झाली. अशा प्रकारच्या बंदुकीच्या गोळीने मृत्यू होणे वैद्यकीयदृष्ट्या अशक्य आहे.' तपासणीदरम्यान डॉक्टरांना दुलारचंद यादव यांच्या शरीरावर इतर अनेक जखमा देखील आढळून आल्याचे सांगण्यात आले. डॉक्टरांच्या या विधानामुळे दुलारचंद यादव यांच्या मृत्यूचे मूळ कारण काय, हा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. गोळीमुळे मृत्यू झाला नसल्यास, हाणामारीच्या वेळी नेमके काय घडले? ज्यामुळे त्यांचा जीव गेला, याबद्दलचे गूढ वाढले आहे. शवविच्छेदन पथक सर्व वैद्यकीय पुरावे आणि शरीरावरील जखमा विचारात घेउन लवकरच आपला अंतिम अहवाल पोलिसांना सादर करणार आहे.

### सपकाळांवर पोलिसांची पाळत

**नागपूर :** काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन



सपकाळ यांच्यावर पोलिसांनी पाळत ठेवल्याचा गंभीर आरोप केला आहे. या आरोपानंतर सपकाळ हे एका पोलीस अधिका-यावर चांगलेच संतापल्याचा व्हीडीओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे.सपकाळ यांनी सांगितले की, मी ज्या खोलीत राहतो, त्या ठिकाणी पोलीस शिपाई येतो, झोपण्याच्या खोलीपर्यंत येउन चौकशी करतो. हे योग्य नाही. हा प्रकार तिस-यांदा घडला आहे, म्हणूनच मी संबंधित अधिका-यांना फोन करून विचारणा केली. त्यांनी पुढे म्हटले की, मुंबईत सर्वोदय आश्रमात वास्तव्य करत असताना पोलीस पाळत ठेवत आहेत का? यामागे मुख्यमंत्री किंवा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश आहेत का? अतुल लोंढे यांनी या प्रकरणात तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले, मुख्यमंत्री, गृहमंत्री आणि पोलीस आयुक्त यांनी या प्रकरणाची जबाबदारी घ्यावी. पोलीस आयुक्त देवेन भारती स्वतःच्या मनाने असे प्रकार करत असतील, तर त्यांची एवढी हिम्मत कशी होते? हे प्रकार बंद करावेत.


# 'सारखं फुकटात, सारखं फुकटात; सारखं माफ, कसं व्हायचं'

## कर्जमाफीवरून अजित पवारांनी शेतक-यांना सुनावलं

**मुंबई/प्रतिनिधी :** 'शून्य टक्के व्याजदराने पैसे दिल्यावर तुम्हीपण वेळच्या वेळी पैसे फेडायची सवय लावा ना. सारखंच फुकटात, सारखंच फुकटात आणि सारखंच माफ, सारखंच माफ; कसं व्हायचं? असे म्हणत अजित पवारांनी कर्जमाफीच्या मागणीवरून शेतक-यांना सुनावले.

सोमेश्वर सहकारी साखर कारखाच्या ६४ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ झाला. या कार्यक्रमात बोलताना अजित पवारांनी सातत्याने शेतकरी कर्जमाफी करण्यावरून नाराजी व्यक्त केली. अजित पवार म्हणाले, 'खूप मोठ्या प्रमाणावर आम्ही सवलती देतोय. योजना देतोय. हे सगळं देताना एक लाख कोटीपेक्षा जास्त रक्कम लागते. आम्ही जाहीरनाम्यात लिहिलं होतं. शेवटी आम्हाला करता येईना. काल या नेते मंडळींना, बच्चू कडू, राज शेट्टी, अजित नवले खूप जण आम्ही बसलो होतो. आम्ही चर्चा करून तो निर्णय ३० जूनला घ्यायचं ठरवलं. किती एकरपर्यंत द्यायची ते आम्ही तुम्हाला एप्रिलमध्ये सांगू', अशी माहिती त्यांनी दिली. 'तुम्हीपण शून्य टक्के व्याजाने पैसे दिल्यावर वेळच्या वेळी पैसे फेडायची सवय लावा ना. सारखंच फुकटात, सारखंच फुकटात आणि सारखंच माफ, सारखंच माफ, कसं व्हायचं? असं नाही चालत', अशा शब्दात अजित पवारांनी कर्जाची परतफेड न करणा-या शेतक-यांना सुनावले.

'एकदा साहेबांनी (शरद पवार) कर्जमाफी केली. एकदा देवेंद्र फडणवीसांनी कर्जमाफी केली. एकदा आम्ही उद्धव ठाकरेंच्या सरकारमध्ये केली. आता आम्हाला पुन्हा निवडून यायचं होतं, आम्ही सांगितलं की आम्ही कर्जमाफी करू. करा माफ. लोक काय म्हणतात, तुम्ही सांगितलं ना, मग करा. जो शब्द दिला, ते करताना आज काही हजार कोटी रु पये त्याला लागणार आहेत', असे म्हणत अजित पवारांनी मित्रपक्षांनाही अप्रत्यक्षपणे सुनावले. 'जितकी मदत करायला पाहिजे, तितकी करेन; पण सारखीच मदत नाही. काही तुम्हीपण हातपाय हलवा', असे अजित पवार उस उत्पादक शेतक-यांनाही म्हणाले.




डॉक्टर तरुणी आत्महत्या प्रकरण

### महिला आयपीएस अधिकारी करणार तपास

**मुंबई/प्रतिनिधी :** फलटणमधील डॉक्टर तरुणीच्या प्रकरणामध्ये एसआयटी च्या स्थापनेचे आदेश मुख्यमंत्री फडणवीसांनी दिले आहेत. राज्याचे गृहमंत्री फडणवीसांनी राज्याच्या पोलिस महासंचालकांना हे आदेश दिले आहेत.फलटणप्रकरणी महिला आयपीएस अधिका-यांच्या नेतृत्वाखाली एक एसआयटी स्थापन करण्यात यावी असे हे आदेश आहेत. त्यामुळे फलटण प्रकरणात महाराष्ट्र सरकार आता ॲक्शन मोडमध्ये आलेलं पाहायला मिळत आहे. फलटण प्रकरणात पोलिसच आरोपी असल्याने पोलिसांवर, त्यांच्या तपासावर आरोप होत असल्याने महिला आयपीएस ⇨(पान २ वर)

## अधिकारी, कर्मचा-यांना 7 नोव्हेंबर रोजी उपस्थिती अनिवार्य; राज्य सरकारचे आदेश


**पुणे/प्रतिनिधी :** 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताला ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्षे पूर्ण होत आहे. या निमित्ता सर्व तालुक्यांच्या ठिकाणी सामूहि गान कार्यक्रम आयोजित करण्या येणार असून, त्यासाठी शासनाच सर्व विभागांतील शासकीय निमशासकीय अधिकारी, कर्मच यांना उपस्थिती अनिवार्य असण आहे. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय रचि 'वंदे मातरम्' या देशाच्या राष्ट्री गीताच्या निर्मितीला १५० वर्षे पू होत आहेत. ३१ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीदरम्यान राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये संपूर्ण 'वंदे मातरम्'च्या सर्व कडव्यांचे गायन होण्याबाबत, तसेच 'वंदे मातरम्' या गीताचा इतिहास सांगणारे प्रदर्शन




शाळांच्या दर्शनी भागात लावण्याबाबत शिक्षण विभागाने या पूर्वीच सूचना दिल्या आहेत. त्या शिवाय आता सर्व शासकीय कार्यालयांमध्येही वंदे मातरम् गीताची १५०वी वर्षपूर्ती साजरी केली जाणार आहे..

शासनाच्या निर्देशानुसार, ७ नोव्हेंबर २०२५ रोजी 'वंदे मातरम्' या गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त सर्व तालुक्यांच्या ठिकाणी सामूहिक गान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शासनाच्या सर्व विभागांतील शासकीय व निमशासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांनी अनिवार्यपणे उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने संबंधित अधिका-यांनी तालुक्याच्या ठिकाणी 'वंदे मातरम्' गीताच्या ⇨(पान २ वर)

## कार-ट्रक धडकेत एकाच कुटुंबातील चार ठार



■ कार शिकताना भयंकर अपघात
■ वणी मध्ये पसरली शोककळा

**यवतमाळ :** कार शिकत असलेल्या तरूणीचे वाहनावरील नियंत्रण सुटून झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील चारजण ठार झाले. ही दुर्घटना आज शुक्रवार ३१ ऑक्टोबरच्या सकाळी ११ वाजताच्या सुमारास वणी- चारगाव मार्गावरील लालगुडा गावालगत घडली. या अपघातात एक पाच वर्षीय चिमुरडी गंभीररित्या जखमी झाली आहे. रियाजुद्दीन रफिकउद्दीन शेख (वय, ५३), मायरा रियाजुद्दीन शेख (वय, १७), झोया रियाजुद्दीन शेख (वय, १३), अनिबा रियाजुद्दीन शेख (वय, ११ सर्वे राहणार भीम नगर ,वणी) अशी मृतांची नावे आहेत.अपघातात मृत रियाजुद्दीन शेख यांच्या भावाची मुलगी इनाया शकीरूद्दीन शेख ही पाच वर्षीय चिमुरडी गंभीर जखमी झाली असून तिला उपचारासाठी चंद्रपूर येथे हलविण्यात आले. माहितीनुसार

गॅरेज व्यावसायिक असलेल्या रियाजुद्दीन शेख यांची मोठी मुलगी मायरा ही कार चालविणे शिकत होती. मात्र, रस्त्याच्या एका वळणावर वाहनावरून तिचे नियंत्रण सुटले तिने ब्रेक जागी एक्सलेटर दाबले. यामुळे कार थेट रस्ता ⇨(पान २ वर)

## आंदोलन संपताच सरकारकडून गुन्हे दाखल

**नागपूर/प्रतिनिधी :**प्रहार संघटनेचे प्रमुख तथा माजी मंत्री बच्चू कडू यांनी शेतक-यांची कर्जमाफी करा अशी मागणी करत नागपूरमध्ये चक्का जाम आंदोलन केले. त्यांनंतर सरकारने त्यांना चर्चेचे निमंत्रण दिले. त्यानंतर कर्जमाफी संदर्भात मुंबईत बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतक-यांच्या कर्जमाफी संदर्भात ३० जूनपर्यंत अंतिम निर्णय घेणार असल्याचे आश्वासन दिले. बच्चू कडूंच्या आंदोलनामुळे सरकारने आता ३० जूनपर्यंत कर्जमाफीचा निर्णय घेणार असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे कडू यांच्या लढ्याला काही प्रमाणात यश आल्याचे दिसत आहे. मात्र, बच्चू कडू यांचे आंदोलन संपताच सरकारने शेतकरी नेत्यांसह आंदोलकांवर गुन्हे दाखल केले आहेत. शेतकरी आंदोलनादरम्यान नागपुरकरांसह हजारो नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागला. बेकायदेशीरपणे महामार्ग रोखला. ⇨(पान २ वर)

### कडूंच्या हवामहालाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची भाजप आमदाराची मागणी



### आता कुठलेही आंदोलन करणार नाही-कडू

**नागपूर :** वर्धा रोडवर शेतक-यांच्या आंदोलनामुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बुधवारी स्वतःहून दखल घेतली आणि तातडीचे आदेश देत माजी आमदार बच्चू कडू ⇨(पान २ वर)

## खा.संजय राउतांची प्रकृती बिघाड, 2 महिने उपचार घेणार


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात चर्चेत असलेले नाव म्हणजे संजय राउत..महाविकास आघाडीच्या स्थापनेपासून राउत चर्चेचा केंद्रबिंदु बनले. त्यातच गेल्या लोकसभा निवडणुकीपासून आजतागायत संजय राउत यांची पत्रकार परिषद आणि राज्याच्या राजकारणात आरोपांचा धुरळा असं समीकरण बनले. मात्र हेच संजय राउत आता पुढील काही दिवस सक्रीय राजकारणापासून दूर राहणार आहेत.



राउतांनी स्वतः याबाबत पत्रक काढत माहिती दिली असून त्यामुळे अनेक चर्चांना उधाण आले आहे. त्यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही राउतांच्या पोस्टची दखल घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संजय राउतांचे पोस्ट रिट्विट करून त्यांना लवकर बरे व्हा असं म्हटलं आहे. मोदी म्हणाले की, संजय राउतजी, तुमच्या प्रकृतीत लवकर सुधारणा आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करतो असं त्यांनी म्हटलं. त्यावर राउतांनीही पंतप्रधानांचे आभार मानले. ⇨(पान २ वर)

### 4 मंदिरांवर लिहिले 'आय लव्ह मोहम्मद'

**लखनौ/वृत्तसंस्था :**मालमत्तेच्या वादातून मुस्लिम शेजा-यांना खोट्या प्रकरणामध्ये गुंतवण्यासाठी चार मंदिरांच्या भिंतींवर आय लव्ह मोहम्मद लिहिल्याबद्दल उत्तर प्रदेशातील अलीगडमध्ये चार जणांना अटक करण्यात आली आहे. अलीगडचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक नीरज जादोन यांनी दिलेल्या माहितीनुसार, चौघांची नावे जिशांत कुमार, आकाश कुमार, दिलीप कुमार आणि अभिषेक सारस्वत अशी आहेत. या प्रकरणातील पाचव्या आरोपीची ओळख पटली असून त्याचे नाव राहुल आहे, तो सध्या फरार आहे. हे सर्वजण ३० ते ३५ वयोगटातील आहेत. पोलिसांनी सांगितले की, २५ ऑक्टोबर रोजी चार मंदिरांच्या भिंतींवर आय लव्ह मोहम्मद लिहिलेले आढळले.





## प्रगती जगताप राज्यसेवा परीक्षेत एससी मधून राज्यात प्रथम

■ एमपीएससी परीक्षेच्या तोंडावर वडिलांचे निधन
■ स्वतः आयसीयूमध्ये दाखल

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यसेवेची पूर्व परीक्षा असताना, वडिलांचे अचानक निधन झाले. वडिलांच्या मृत्यूने प्रगतीच्या मनावर परिणाम झाला. ती नैराश्यात गेली. त्यात प्रकृती अस्वस्थ्यतेने तिला ग्रासलेले अशा परिस्थितीतून बाहेर पडत आपल्या लक्ष्यावर केंद्रीत करून प्रगती जगताप यांनी राज्यसेवा परीक्षेत अनुसूचित जातीमधून राज्यात प्रथम येण्याचा मान पटकावला. राज्यसेवा मुख्य परीक्षा २७ ते २९ मेदरम्यान घेण्यात आली होती. त्यानंतर मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या १५१६ उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत घेण्यात आली. या मुलाखती ३० ऑक्टोबरपर्यंत घेण्यात आल्या. या मुलाखती संपल्यानंतर रात्री अंतिम निकाल जाहीर झाला. सुनील जगताप असे प्रगतीच्या वडीलांचे नाव. अकोला महापालिकेत वंचित बहुजन आघाडीमधून नगरसेवक म्हणून ते निवडून आले होते. मात्र, ऑगस्ट २०२४ मध्ये त्यांचे अकाली निधन झाले. त्यामुळे प्रगती नैराश्यात गेली. डिसेंबरमध्ये पूर्व परीक्षा असताना, त्याचा अभ्यासात तिचे मन लागत नव्हते. मात्र, मित्र-



मैत्रिणी आणि घरच्यांच्या मदतीने त्यातून बाहेर पडून प्रगतीने केवळ अभ्यासावर लक्ष केंद्रीत केले. सुरुवातीपासून प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी तिने तयारी सुरू केली. घरी मोठा भाउ एका आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेत काम करतो. मात्र, आपल्या केंद्रीय लोकसेवा आयोगातून प्रशासकीय सेवा करण्याची इच्छा मनोमन ठेवत २०१८ ते २०२२ या दरम्यान ती कृषीसेवक म्हणून कार्यरत होती. ते पद सोडून तिने राज्यसेवेची तयारी सुरू केली. त्यातून तिची २०२३ मध्ये उपविभागीय अधिकारी म्हणून निवड झाली होती. मात्र, ती कळमेश्वर येथे सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून रूजू झाल्या. ⇨(पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## पान १ व १० वरून

## महिला आयपीएस अधिकारी

अधिका-यांच्या हातात हा तपास देण्यात येणार असल्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यामुळे आता महिला अधिकारीच या प्रकरणाचा तपास करताना पाहायला मिळणार आहेत.

दरम्यान, डॉक्टर तरुणीच्या आत्महत्येप्रकरणी विशेष तपास पथकाकडे वर्ग करण्याची मागणी अनेक राजकीय नेते, पक्ष व सामाजिक कार्यकर्त्यांकडून केली जात होती. डॉक्टर तरुणीच्या कुटुंबाचीही तशी मागणी होती. या मागणीतून दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी अशी मागणी जोर धरुन होती. त्यामुळे आता मुख्यमंत्र्यांनी हे आदेश दिले आहेत. या प्रकरणात काही राजकीय व्यक्तींवरही आरोप करण्यात आले आहेत. त्यांच्याही अटकेची मागणी होत असताना आता या एसआयटी पथकाच्या स्थापनेनंतर पुढे काय घडतं याकडे सर्वांचं लक्ष असणार आहे.दरम्यान, या प्रकरणातले प्रमुख आरोपी प्रशांत बनकर व आयपीएस गोपाळ बदने या दोघांनाही पोलिसांनी अटक केलेली आहे. व त्यांची कस्टडीही न्यायालयाने पोलिसांना दिलेली आहे. सखोल तपास, व या दोन आरोपींचा एकमेकांशी काही संबंध आहे का हे सर्व तपशील तपासण्यासाठी सरकारी वकिलांनी न्यायालयात युक्तिवाद केला होता. ज्याला न्यायालयाने दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर ५ दिवसांची कस्टडी दिली होती. फलटणमधील उपजिल्हा रुग्णालयात काम करणा-या डॉक्टर तरुणीने स्वतःच्या हातावर आरोपींची नावे लिहित आत्महत्येसारखं पाउल उचललं होतं. तिने यावेळी पीएसआय गोपाळ बदनेने आपल्यावर ४ वेळा अत्याचार केल्याचं म्हटलं होतं, तर दुसरा आरोपी प्रशांत बनकरने आपला मानसिक व शारिरीक छळ केल्याचं लिहिलं होतं.

## अधिकारी, कर्मचा-यांना ७ नोव्हेंबर

सामूहिक गान कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन तहसिलदार सर्वसाधारण, पुणे यांनी केले आहे. देशभक्तीची भावना दृढ करणे आणि 'वंदे मातरम्'या राष्ट्रगीतास १५० व्या वर्षानिमित्त अभिवादन करणे हा कार्यक्रमाचा उद्देश आहे. त्यामुळे जिल्ह्यात हा कार्यक्रम उत्साहात पार पाडण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

***'वंदे मातरम्'गीताला वंदन-*** 'वंदे मातरम्'या राष्ट्रीय गीताला ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्षे पूर्ण होणार. ३१ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राज्यातील सर्व शाळांमध्ये 'वंदे मातरम्'च्या सर्व कडव्यांचे गायन. 'वंदे मातरम्'या गीताचा इतिहास सांगणारे प्रदर्शन शाळांच्या दर्शनी भागात लावण्याबाबत शिक्षण विभागाच्या सूचना. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शासनाच्या सर्व विभागांतील शासकीय व निमशासकीय अधिकारी आणि कर्मचा-यांनी उपस्थित राहणे आवश्यक. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी 'वंदे मातरम्' या गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त सर्व तालुक्यांच्या ठिकाणी सामूहिक गान कार्यक्रमाचे आयोजन

## आंदोलन संपताच सरकारकडून

ज्यामुळे नागरिकांची गैरसोय झाल्याचा ठपका ठेवत नागपूर पोलिसांनी बच्चू कडू, माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासोबत शेकडो आंदोलकांवर गुन्हा दाखल केले आहेत. त्यामुळे आंदोलन संपताच पोलिसांनी आंदोलकांवर कारवाई करायला सुरू केल्याचं पाहायला मिळत आहे. तर आंदोलकांनी आंदोलनासाठी परवानगी दिलेल्या जागेऐवजी २ किमी मागेच वर्धा येथे आंदोलन करत महामार्ग अडवल्यामुळे ३० तासांहून अधिक वेळ महामार्गावर कोंडी झाली. यामुळे नागरिकांचे हाल झाले. तसंच अटींचे उल्लंघन करणे, बेकायदेशीरपणे जमाव जमवून नागरिकांचे जीवन आणि मालमत्ता धोक्यात आणणे शिवाय वाहतुकीत अडथळा निर्माण करणे अशा कलमांखाली हिंगणा पोलिसांनी आंदोलकांवर गुन्हे दाखल केले आहेत.

**हवामहालाची उच्चस्तरीय चौकशी करा**

भाजप आमदार प्रवीण तायडे यांनी बच्चू कडू यांच्या हवामहालाची उच्चस्तरीय चौकशी करा, अशी मागणी केली आहे. बच्चू कडू यांनी समाजसेवेच्या नावाखाली ७२ एकर परिसरात खंडणीच्या पैशातून हवामहाल बांधल्याचा आरोप तायडे यांनी केला आहे.

## आता कुठलेही आंदोलन करणार

यांना व त्यांच्या समर्थकांना तत्काळ रस्ता मोकळा करण्याचे निर्देश दिले होते.दिवाळी अवकाश सुरू असताना न्या. रजनीश व्यास यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले होते. यानंतर गुरुवारी झालेल्या सुनावणीत उच्च न्यायालयाने बच्चू कडू यांच्या प्रस्तावित रेल रोको आंदोलनाबाबत कठोर भूमिका घेतली. त्यामुळे बच्चू कडू यांनी रेल रोको आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला. आता शुक्रवारी बच्चू कडू यांनी उच्च न्यायालयात नवी भूमिका घेतली आहे. नागपूरमध्ये सुरू झालेल्या आंदोलनाबाबत वृत्तपत्रातील बातम्यांचा दाखला देत न्यायालय म्हणाले होते की बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली तब्बल १० हजारांहून अधिक आंदोलनकर्ते रस्त्यावर उतरले असून, त्यामुळे सुमारे २० किलोमीटर लांबीच्या वाहतूक कोंडीत नागरिक अडकले. या वाहतूक कोंडीत केवळ खासगी वाहनच नव्हे, तर रुग्णवाहिका आणि पोलीस वाहनांनाही अडथळा निर्माण झाला होता. या महामार्गावरूनच नागपूर विमानतळ, नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट, शुअरटेक ह?स्पिटल आणि अनेक शाळा आहेत, तसेच हा रस्ता पुढे समृद्धी महामार्गाशी जोडला जातो.

त्यामुळे अशाप्रकारे राष्ट्रीय महामार्ग रोखणे म्हणजे नागरिकांच्या संविधानात दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होय, असे न्यायालयाने नमूद केले होते.सुनावणीदरम्यान न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, बेलतरोडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी २६ ऑक्टोबर २०२५ रोजी ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांना २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता मौजा परसोडी येथील क?टन रिसर्च सेंटरलगत आंदोलन करण्याची परवानगी दिली होती. ही परवानगी केवळ एका दिवसापुरती होती. मात्र, आंदोलन पुढील दिवशी (२९ ऑक्टोबर) देखील सुरूच असल्याचे दिसून आले. न्यायालयाने म्हटले की, परवानगी संपल्यानंतरही आंदोलन सुरू ठेवणे हे कायद्याचे उल्लंघन आहे आणि त्यामुळे नागरिकांना असह्य त्रास झाला आहे, असेही न्यायालय म्हणाले होते.

शुक्रवारी याप्रकरणी पुन्हा एकदा न्यायालयात सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान सरकारने सद्यस्थितीबाबत माहिती दिली. बच्चू कडू यांच्यावतीने ?ड.स्मिता सिंगलकर यांनी न्यायालयाला सांगितले की आता ते रेल रोको आंदोलन करणार नाही. तसेच नागरिकांना त्रास होईल अशाप्रकारचे कुठलेच आंदोलनही करण्यात येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. न्यायालयाने या विधानाला रेक?र्डवर घेत पुढील सुनावणी ६ नोव्हेंबर रोजी निश्चित केली.

## खा.संजय राउतांची प्रकृती

आपण सगळ्यांनी माझ्यावर कायम विश्वास ठेवला आणि प्रेम केले. पण सध्या अचानक माझ्या प्रकृतीत काही गंभीर स्वरुपाचे बिघाड झाल्याचे समोर आले. उपचार सुरू आहेत मी यातून लवकरच बाहेर पडेन. वैद्यकीय सल्ल्यानुसार मला बाहेर जाणे आणि गर्दीत मिसळणे यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यास नाईलाज आहे. मला खात्री आहे मी ठणठणीत बरा होउन साधारण नवीन वर्षात आपल्या भेटीस येईन, आपले प्रेम आणि आशीर्वाद असेच राहू द्या असं संजय राउत यांनी म्हटलं आहे.

***ठाकरे गटासाठी चिंताजनक-*** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थासह मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचं बिगुल लवकरच वाजणार आहे. गेल्या दोन तीन वर्षांपासून अनेक आव्हानांचा सामना करत असलेल्या शिवसेना ठाकरे गटासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची असल्याने पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंसह सर्व नेत्यांनी या निवडणुकीसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. मात्र ऐन निवडणुकीच्या काळात ठाकरे गटाची मुलुखमैदानी तोफ अशी ओळख असणारे संजय राउत २ महिने सार्वजनिक जीवनापासून दूर राहणार आहेत. त्यामुळे ठाकरे गटाची चिंता वाढली आहे.

## प्रगती जगताप राज्यसेवा परीक्षेत

याच दरम्यान त्यांच्या प्रकृतीत झालेला बिघाड, त्यातून आयसीयूत तिच्यावर काही महिने उपचारही सुरू होते. मात्र, आपल्या ध्येयाने पछाडलेल्या प्रगतीने अखेर राज्यसेवेत कमाल केली. आता तिला मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा महापालिकेत सहाय्यक आयुक्त या पदावर नियुक्ती मिळणार आहे.

आजारपण आणि वडीलांचे निधन हा कालावधी बराच कठीण होता. त्यामुळे नैराशेत गेले. मात्र, मित्र आणि परिवारांनी साथ दिली. त्यातून बाहेर पडले. आज यश मिळाले आहे. मात्र, ते बघण्यासाठी बाबा हयात नाहीत. त्यामुळे हे यश मित्र आणि कुटुंबियांना समर्पित करते अशी प्रतिक्रिया प्रगती जगताप यांनी दिली. राज्यसेवा परीक्षेत मिळालेले यश आनंददायी आहे. मात्र, सुरुवातीपासून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी अभ्यास करीत आहे. त्यामुळे राज्यसेवा परीक्षेत यश मिळाले असले तरी युपीएससीची तयारी सुरुच राहणार असल्याचेही ती म्हणाली.

## कार-ट्रक धडकेत एकाच

दुभाजकावर चढून दुसऱ्या बाजुला गेली. याचवेळी समोरून येणाऱ्या हायवा ट्रकची या कारला ०१ एएच ५७०० जबर धडक बसली. अपघातात कारमध्ये बसलेले पाचही व्यक्ती चार गंभीर जखमी झाले होते. जखमींना उपचारासाठी वणी येथे ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तिघांना मृत घोषीत केले. तर एका व्यक्तीवर उपचार सुरू असताना उपचारा दरम्यान मृत्यू झाला. तर इहाना हिला गंभीर अवस्थेत चंद्रपूर येथे रेफर केले. मात्र तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. अपघात होताच घटनास्थळा वरील लोक मदतीसाठी धावून आले. लोकांनी जखमींना बाहेर काढले. जखमींना वणीतील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. पुढील तपास ठाणेदार गोपाल उंबरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहे.

**कारचा समोरील भाग झाला चकनाचुर -**मिळालेल्या माहितीनुसार रियाज शेख हे व्यावसायिक ट्रक दुरूस्तीचे काम करीत होते. त्यांचे स्वत:चे गॅरेज होते. ते आपल्या मुलीला कार चालविण्याचं प्रशिक्षण देत होते. कार शिकवण्यासाठी ते आपल्या मुलीला घुग्गुस मार्गावर घेऊन गेले होते. दरम्यान, जन्नत हॉलजवळ मुलीचे कार चालवताना नियंत्रण सुटले. तिनं ब्रेकऐवजी एक्सीलेटर दाबलं.

'कार थेट दुभाजकावरून उसळून महामार्गाच्या विरूद्ध दिशेनं गेली. तसेच समोरून येणाऱ्या ट्रकला धडकली. कारचा समोरील भाग अक्षरश: चक्काचूर झाला.मुलीला कार चालविताना काळाने घाला घातल्यानं वणी शहरात शोककळा पसरली आहे. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेनंतर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली. सध्या पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

## राज्यातील प्रत्येक गरजू

नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. बच्चू कडू यांच्यासह शेतकरी नेते आणि शेतकऱ्यांनी याविषयीचा आवाज बुलंद केला. त्यांच्या या आवाजाने साक्षात वरुणराजा बरसला. जणू शेतकऱ्यांच्या या मागणीला वरुणराजानेही आपली साक्ष दिली. गुरुवारी मुंबईत भेटीचा मुहूर्त ठरला. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, राज्यातील प्रमुख मंत्री अधिकारी सह्याद्री अतिथीगृहावर एकवटले. शेतकऱ्यांसाठी अशा पद्धतीची ही पहिलीच मॅरेथॉन बैठक झाली. सरकारने आपल्या व्यूहरचनेतून कमीत कमी शेतकऱ्यांनी कर्जमाफी मिळेल अशी योजना आखली होती. पण, बच्चू कडू आणि शेतकरी नेत्यांनी ही व्यूहरचना भेदून काढली. राज्यातील प्रत्येक गरजू आणि पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळेल अशी योजना ठरविली. सरकारकडून ती मान्य करून घेतली. यातूनच ३० जून २०२६ची तारीख निश्चित झाली. या घोषणेनंतर शेतकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटले कारण ज्यांच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर होता, त्या लाखो शेतकऱ्यांना आता दिलासा मिळणार हा विश्वास पक्का झाला.

**शरद जोशींनंतर पहिल्यांदाच शेतकरी एकवटले-**

शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या अनेक संघटना गेल्या काही वर्षांत होत्या. पण, त्या एकत्र आल्या नाहीत. शरद जोशींनंतर पहिल्यांदाच त्या सर्वांना एकत्र करून, लाखो शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरवण्याची किमया फक्त बच्चू कडू यांनी साधली. त्यांच्या नेतृत्वाखाली नागपूर शहर ३० तास ठप्प राहिलं. महामार्ग, हायवे, शहराचे सर्व रस्ते 'शेतकऱ्यांच्या आवाजाने दणाणले शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी बच्चू कडू यांनी पुकारलेल्या 'महाएल्गार'च्या माध्यमातून पुन्हा एकदा महाराष्ट्राला शरद जोशींच्या काळाची आठवण करून दिली. शरद जोशी यांच्या काळात अशा पद्धतीचे आंदोलन होत होते. यानंतर विश्वासपात्र नेत्यांची उणीव निर्माण झाली. बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांचा हा विश्वास मिळविला. त्याचा परिणाम म्हणूनच नागपूरच्या वेशीवर लाखोच्या संख्येत शेतकरी आले. तसा हा धान कापणीचा काळ, कापूस वेचणीला आलेला, सोयाबीनची मळणी करायची आहे. प्रत्येक शेतकरी शेतात व्यस्त आहे. तरीही तो नागपुरात आला. बच्चू कडू यांच्या नेतृत्वावरील विश्वासातून आला. आपल्या मागण्यांसाठी बच्चू कडू यांच्या खांद्याला खांदा लावून लढला. यशही मिळविले. म्हणूनच सह्याद्रीवरील बैठकीनंतर बच्चू कडू यांनी हा लढा माझा एकट्याचा नव्हे तर तमाम शेतकरी नेते, माझ्या शेतकरी बांधवांचा होता.आमचे गुरू अ?ड. वामनराव चटप, राजू शेट्टी, डॉ. अजित नवले, महादेव जानकर, राजन क्षीरसागर, रविकांत तुपकर, ओबीसी नेते माजी खासदार हरिभाऊ राठोड, खासदार अमर काळे, माजी खासदार उमेश पाटील, सलील देशमुख तसेच हजारो कार्यकर्त्यांचा होता. या सर्वांचे बच्चू कडू यांनी आभार मानले. आज बच्चू कडू यांच्या माध्यमातून महाराष्ट्राला एक नवा शेतकरी नेता मिळाला आहे, अशा भावना राज्यभरातील गावागावांतून व्यक्त होऊ लागल्या आहेत.

**नागपूर विमानतळावर जंगी स्वागत!-**

महाएल्गार समितीचे सदस्य नागपूर विमानतळावर पोहोचताच शेकडो शेतकरी, शेतमजूर, मेंढपाळ, मच्छीमार, दिव्यांग बांधव यांनी त्यांचं ढोल-ताशांच्या गजरात स्वागत केलं. विमानतळ ते खापरी ग्रामपंचायतपर्यंत वाजतगाजत मिरवणूक निघाली. तेथे झालेल्या सभेत बच्चू कडूंनी सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानत म्हणाले 'हा विजय माझा नाही, हा विजय महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याचा आहे!' अशा भावना व्यक्त केल्या.

**अडीच हजार कार्यकर्त्यांवर गुन्हे; पण लढा सुरूच-**

या आंदोलनात सहभागी झालेल्या बच्चू कडू, राजू शेट्टी व महाएल्गार आयोजक समितीच्या अडीच हजार कार्यकर्त्यांवर नागपूर पोलिसांनी गुन्हे दाखल केले. गुन्हे दाखल झाले तरी आम्ही मागे हटणार नाही, असा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त ४

वाढवल्यामुळे ५५ हजार २१२ शेतकऱ्यांना ६६ हजार ३७३ हेक्टरसाठी ७९ कोटी रूपयांचा निधी प्राप्त होईल. राज्यातील विविध जिल्ह्यात खरीप हंगामात अतिवृष्टी, पूर यामुळे बाधीत झालेल्या शेतकऱ्यांना येत्या रब्बी हंगामाकरीता बियाणे व इतर अनुषंगिक बाबींकरीता विशेष मदत देण्यात येणार आहे. यात सप्टेंबर २०२५ मधील कालावधीमध्ये ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांची ५ लाख ४७ हजार ८७६ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यासाठी जिल्ह्याला ५४७ कोटी रूपयांची मदत मिळणार आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना येत्या रब्बी हंगामामध्ये १० हजार रूपये प्रति हेक्टरी मदत, अर्थसहाय देण्याचा निर्णय १० ऑक्टोबर रोजी घेण्यात आला आहे. ही मदत ३ हेक्टर पर्यतच्या मर्यादेत करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी भाजपाच्या सर्व आमदारांनी प्रथम जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरा केला. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव शासनाकडे सादर केले, त्यामुळे ही मदत मिळण्यास सुलभ झाले असल्याचे पत्रकार परिषदेत आ.प्रताप अडसड यांनी सांगितले.

**मुख्यमंत्री - पालकमंत्री यांचे मानले आभार -**

जिल्ह्यातील सर्व भाजपा आमदारांनी रविवारला मुख्यमंत्री व पालकमंत्री यांची नागपुरात भेट घेतली. दोन्ही मंत्री महोदयांनी राज्याच्या वित्त विभागाची चर्चा करून ३० ऑक्टोबर रोजी हे दोन्ही शासन निर्णय काढण्यात आले आहे. त्यानुसार शासनाने विशेष बाब म्हणून अमरावती जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांना १११७ कोटींचा मदतनिधी चा शासकीय परिपत्रक काढले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री, महसूल मंत्री, वित्त विभाग जिल्हा प्रशासनाचे भाजपाच्या सर्व आमदारांनी शुक्रवार ३१ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या पत्रकार परिषदेत आभार मानले. पत्रकार परिषदेत आ.उमेश यावलकर, आ.प्रताप अडसड, आ.प्रविण तायडे, आ.राजेश वानखडे उपस्थित होते.

## १५ नोव्हेंबरपासून नाफेडची

संस्थांमध्ये अचलपूर तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री संघ मर्यादित, अचलपूर, जयसिंग विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित, पथ्रोट, दर्यापूर तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, दर्यापुर, धारणी तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री संस्था मर्यादित, धारणी, नेरपिंगळाई विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित, नेरपिंगळाई, चांदुर रेल्वे विकास खंड सहकारी शेतकरी खरेदी विक्री समिती मर्यादित चांदुर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर तालुका सहकारी शेतकरी खरेदी विक्री समिती मर्यादित, नांदगाव खंडेश्वर, डॉ. बी. पी. देशमुख तिवसा तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री समिती मर्यादित तिवसा यांचा समावेश आहे.

विदर्भ को-ऑपरेटिव्ह उपअभिकर्ता संस्थांमध्ये विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन अमरावती, अंजनगाव सुर्जी तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, अंजनगाव सुर्जी, चांदूर बाजार सहकारी तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, चांदुर बाजार, शिंगणापूर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित, दर्यापूरला शिंगणापूर, दत्तापूर (धामणगाव) ?ग्रीकल्चर खरेदी विक्री संघ, धामणगाव रेल्वे, मोर्शी तालुका सहकारी शेतकरी खरेदी विक्री संघ, मोर्शी, वरुड तालुका सहकारी शेतकरी खरेदी विक्री संघ, वरुड यांचा समावेश आहे.

शेतकऱ्यांनी नजीकच्या खरेदी केंद्रावर नोंदणी करण्यासाठी कागदपत्रांसह अर्ज करावा. नोंदणीसाठी स्वतःचे आधारकार्ड, मोबाईल क्रमांक, चालु हंगामातील पीक पेरा नमुद केलेला सातबारा, नमुना आठ-अ, सामाईक सातबारा क्षेत्र असल्यास सर्वांचे आधारकार्डसह संमती पत्र, अद्यावत बँक पासबुकची झेरॉक्स कागदपत्रे आवश्यक आहे. हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन विक्रीकरीता शेतकऱ्यांनी चांगल्या दर्जाचे सोयाबीन असल्याची खात्री करावी. शासनाने ठरवलेल्या गुणवत्तेच्या मानकांमध्ये बसणारे सोयाबीन विक्रीसाठी आणावे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नाफेडच्या धान्य खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि जिल्हा पणन अधिकारी अजय बिसने यांनी केले आहे.

## आलिशान बुलेट बाइक

वय २४ अंजनगाव , संतोष भाऊराव शिंदे रां मूर्तिजापूर,अब्दुल अतिक अब्दुल रफिक रा अलीमनगर अमरावती या चारही आरोपींना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता आरोपीनी पाचही घरफोड्या केल्याचे कबूल केले तसेच त्यातील एक आरोपी अजूनही फरार आहे व सदर आरोपींनी चोरी केलेल्या पैकी ४ लाख ८९ हजार ६०० रुपयांचा चोरीचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात दिला.

सदर कारवाई उपविभाग पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सुरज बोंडे, सपोनी सुरज तेलगोटे पोलीस कर्मचारी जयसिंग चव्हाण, मोहसीन पठाण, शुभम मार्कंड, आकाश रंगारी, अमित घाटे, अंकुश सयाम, विशाल थोरात, प्रमोद चव्हाण, दिपाली तेलगोटे यांनी केली .

**चोरी करण्यासाठी बुलेट चा वापर-**

आरोपी अलिशान बुलेट बाइक वापरून परिसरात रेकी करून बंद घरे शोधत आणि दागदागिने,रोकड लंपास करत होते .सदर गुन्ह्यातील आरोपी घरपोडी करून चोरी केलेला माल इतर लोकांना विकून त्यातून मिळालेल्या पैशाची मोजमजा करीत असे व बुलेट सारख्या महागड्या गाडीवर बसून अंजनगाव सारख्या शहरात फेरफटका मारून बंद असलेले घरांची रेखी करून चोरी करत होते.

## जीएचआरयू अमरावतीत सायबर

विद्यार्थी कल्याण डीन डॉ. प्रशांत अवचट यांच्यासह इतर मान्यवरांनी वक्त्यांचा सन्मान केला. इंटरॅक्टिव्ह प्रश्नोत्तर सत्रात तपास तंत्र, पुरावा हाताळणी आणि सायबर सुरक्षेतील करिअर मार्गांवर चर्चा झाली.

डॉ. मंगेश ढोरे यांनी धन्यवाद ज्ञापित करताना समन्वयक डॉ. अमित गायकवाड आणि डॉ. ढोरे, प्राध्यापकवर्ग तसेच सहभागींना श्रेय दिले. या सत्राने सायबर सुरक्षेतील वैयक्तिक जबाबदारी मजबूत केली आणि धोक्यांचे ओळखणे, प्रतिबंध आणि अहवाल देण्यासाठी उपस्थितांना सक्षम केले, जे सुरक्षित डिजिटल समाजाच्या निर्मितीसाठी आवश्यक आहे.

## १०४ किलो गांजासह

निर्माण झाल्याने वाहनाची तपासणी केली. वाहनां मध्ये पायदानच्या खाली दोन नंबर प्लेट एमएच १७ एजे २२८३ व सीजी १० एबी २८४९ अशी मिळाली. चालकास अधिक सखोल विचारपूस केली असता त्याने सांगितले की, वाहनाच्या मागील बाजूला दोन्ही लाईटचे आत चालक व कंडक्टर साईटचे दरवाजाचे खाली पायदानच्या आतील बाजूस चेंबरचे आत तयार करण्यात आलेल्या छुप्या कप्प्यात गांजा लपवून ठेवलेला आहे. वाहनाची झडती घेतली असता आरोपींनी सांगितल्याप्रमाणे वाहनात ते पण खाकी टेपपट्टीत गुंडाळलेल्या अमली पदार्थ गांजाचे गुटखे१०४ किलो ८७९ ग्राम गांजा (२० लाख ६६ हजार ९६०) आणि बोलेरो प्रवासी वाहन ५ लाख ५० हजार असा एकूण २६ लाख १६ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाई मध्ये पोलीस अधीक्षक विशाल आनंद ,अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखेडे यांचे नेतृत्वात पीएसआय मुलचंद भांबुरकर, सागर हटवार, अमोल देशमुख, बलवंत दाभणे, भूषण पेठे, सुधीर बावणे ,मंगेश लाकडे, सचिन मसांगे, पंकज फाटे, दिनेश कनोजिया ,अरविंद गावंडे, महेश काळे, सायबर सेलचे सागर धापड, विकास अंजीर, शिवा शिरसाठ, कैलास भागडकर, संजय प्रधान, निलेश आवंडकर यांनी सहभाग घेतला.

**तस्करांची नवीन युक्ती -**गांजा तस्करी करताना पोलिसांना संशय येऊ नये म्हणून आरोपी नवनवीन तस्करी च्या युत्त्या करतात. ओडिसा राज्यातून मोठ्या प्रमाणात तस्करी सुरू आहे. बोलोरो वाहनात काही गोपनीय कप्पे बनवण्यात आले होते. तीन वर्षांपूर्वी सुद्धा ओडिशा येथून आणलेला ४३५ किलो गांजा वाहतूक करणारा मालवाहू मिनी ट्रक पकडला होता. दोन्ही आरोपांना पुढील कारवाई करता तिवसा पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे.

## ओला इलेक्ट्रिक दुचाकी

ग्राहकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर कंपनीला लेखी निवेदन दिले होते पण त्यावरही कोणतीही कार्यवाही केली नाही. या कंपनीचे लोकं ग्राहकांचे फोन नाही उचलत यांच्या सर्विस सेंटर चे नंबर कुठेही डिस्प्ले मध्ये नाही किंवा कोणत्याही नंबर ग्राहकांना मिळत नाही. ऑनलाइन कंप्लेंट केले असता कंपनी टोल फ्री नंबर सतत बिझी दाखवतो आणि ते रिसिव्ह करत नाही. ग्राहकांना मानसिक शारीरिक व आर्थिक फटका यामुळे बसत आहे. कंपनीची आरटीओ आणि जिल्हाधिकारी यांना तक्रार केले आहे. पण यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. कंपनीचे कर्मचारी हे ग्राहकांसोबत बरोबर बोलत नाही. एरिया सर्विस मॅनेजर उज्वल घोरमाडे हे कोणत्याही प्रकारचा रिस्पॉन्स देत नाही. यामुळे ग्राहक परेशान झाले आहे आणि त्यांनी कंपनीच्या शोरूम व सर्विस सेंटरला ताला ठोकण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील सर्व ओला इलेक्ट्रिक गाड्याच्या ग्राहकांना या दिवशी आपल्या समस्या घेऊन नवाथे चौक येथे उपस्थित राहण्याच आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषद मध्ये माधव अवघड, आशिष मेहत्रे ,दत्तात्रेय विचे उपस्थित होते.

## ब्रह्मा कुमारी विश्व

गरज आहे.' त्यांनी असेही सांगितले की, आरएसएसच्या १०० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त अमरावती जिल्ह्यातील सर्व केंद्रांवर १०० वर्षे १०० कार्यक्रम मोहिमेअंतर्गत वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. कार्यक्रमात सक्रिय सहभागी झालेल्या सर्व भगिनींचा पाहुण्यांनी सन्मान केला आणि त्यांना प्रोत्साहन दिले. संपूर्ण कार्यक्रमाचे सुरेख संचालन बी.के. तेजल दीदी यांनी केले. या कार्यक्रमाचे वातावरण अतिशय उत्साही, आध्यात्मिक ऊर्जा, प्रेम आणि सौहार्दाने भरलेले होते. शांतीचा अनुभव आणि सर्वांसाठी शुभेच्छा देऊन कार्यक्रमाचा समारोप झाला

## एमएसएमई उद्योगांच्या सर्वांगिण

या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या मुख्य अतिथी म्हणून बोलत होत्या. एमएसएमई विकास कार्यालयाचे सह संचालक विजय शिरसाठ, सह संचालक (उद्योग) निलेश निकम, एसएसएमई सहाय्यक संचालक मनीष झा, लिड बँक मॅनेजर नरेश हेडाऊ, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर, अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स विनोद कलंत्री यांच्यासह उद्योग क्षेत्रातील विषयतज्ज्ञ यावेळी कार्यशाळेला उपस्थित होते. विभागीय आयुक्त डॉ. सिंघल म्हणाल्या की, एमएसएमईजची प्रचंड आर्थिक क्षमता असूनही, या उद्योगांना त्यांच्या खर्च आणि स्पर्धात्मकतेच्या संदर्भात अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. एमएसएमई क्षेत्रात सक्षम वातावरण निर्माण करणे, तसेच अगदी तळाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी भारतीय एमएसएमईजची किंमत आणि स्पर्धात्मकता वाढविणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र सरकारव्दारे एक व्यापक उपक्रम हाती घेण्याची योजना आखण्यात आली आहे. यामुळे एमएसएमईजना बाह्य चढउतारांशी जुळवून घेणे आणि त्यांना जागतिक मानकांच्या बरोबरीने आणण्याचा प्रयत्न केल्या जाईल. उद्योग क्षेत्राच्या सर्वांगिण विकासासाठी तसेच अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी अशा पध्दतीच्या कार्यक्रमांचे आयोजन होत आहे, हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आगामी काळात अमरावती येथे विभागस्तरीय औद्योगिक विकास परिषदेचे आयोजन करण्याचा मानस असल्याचे विभागीय आयुक्तांनी सांगितले. तसेच उद्योग-व्यवसायांकरिता लागणाऱ्या कुशल मणुष्यबळासाठी अमरावती विद्यापीठात कौशल्य विकासाधारित पदवी, पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी पाऊले उचलली जातील, असेही त्यांनी सांगितले.

एसएसएमई नागपूरचे सह संचालक सिरसाठ म्हणाले, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (श्एर्ई) मंत्रालयाने 'विकसित भारत २०४७ च्या दृष्टिकोनातून एमएसएमई क्षेत्राला अधिक लवचिक आणि जागतिक मानकांनुसार सक्षम बनवण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी तीन-स्तरीय राष्ट्रीय सल्लामसलत कार्यक्रम सुरू केला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या या क्षेत्रातील उद्योजकांना भेडसावणाऱ्या खर्च आणि स्पर्धात्मकतेच्या आव्हानांवर थेट तळागाळातील उपाययोजना मिळवणे, हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात क्लस्टर-स्तरीय कार्यशाळांनी झाली आहे. देशभरातील विविध क्लस्टर (उद्योग समूह) आणि भागधारकांशी सल्लामसलत करून या कार्यशाळा आयोजित केल्या जात आहेत. खर्च व्यवस्थापन आणि स्पर्धात्मकतेशी संबंधित समस्यांवर एमएसएमईकडून थेट अभिप्राय (ईर्ाी्८) घेणे हा या कार्यशाळांच्या आयोजनामागील उद्देश असून एमएसएमईंना बाह्य चढउतारांशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे आणि त्यांना जागतिक मानकांच्या (उर्त्दे्त ऐ्ुर्ही) बरोबरीने आणणे हे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून धोरणे, कार्यक्रम, योजना आणि नियामक समर्थनासाठी उपयुक्त ठरतील अशा कृतीयोग्य शिफारसी गोळा करणे शक्य होईल, अशी माहिती सिरसाठ यांनी कार्यशाळेत दिली.

तळागाळापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत तीन-स्तरीय आराखड्याच्या माध्यमातून उद्योग धोरण तयार करण्यास मदत मिळेल. याअंतर्गत पहिल्या स्तरावर क्लस्टर कार्यशाळांच्या आयोजनातून स्थानिक स्तरावरील आव्हाने आणि शिफारसी तयार करणे, व्दितीय स्तरावर विभागीय परिषदांच्या माध्यमातून क्लस्टर स्तरावरून मिळालेले निष्कर्ष एकत्रित करून त्यांना उत्पादन/क्षेत्र-विशिष्ट ट्रेंड आणि प्राधान्यांमध्ये रूपांतरित करणे, तर तिसऱ्या स्तरावर राष्ट्रीय शिखर परिषदांच्या माध्यमातून विभागीय स्तरावरील शिफारसींचा अंतिम समावेश करून त्यांना धोरणात्मक निर्णय आणि नियामक समर्थनात परावर्तित करणे आदी महत्वपूर्ण बाबी पूर्ण केल्या जाईल. मंत्रालयाने या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व भागधारक आणि एमएसएमई प्रतिनिधींना सर्व स्तरीय क्लस्टर कार्यशाळेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले असून उद्योजकांना त्यांच्या क्लस्टर-विशिष्ट अंतर्दृष्टी, खर्चाच्या प्रमुख घटकांवरील अभिप्राय आणि व्यावहारिक उपायांवर चर्चा करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. हा उपक्रम भारतीय एमएसएमईंना केवळ टिकाऊच नव्हे, तर जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, अशी माहिती सहायक संचालक मनीष झा यांनी यावेळी दिली. या राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी (खर्चाचे घटक उदा. कर्ज खर्च, नियामक खर्च, तंत्रज्ञान खर्च इ.) उद्योजक-व्यवसायकांनी एमएसएमई मंत्रालयाच्या संबंधित पोर्टलला भेट देण्याचे आवाहनही एमएसएमई विभागाव्दारे करण्यात आले आहे.

## ॲड. बाळासाहेब आंबेडकर

मोर्चा काढण्यात आला होता. या घटनेनंतर 'राजकारण विदर्भाचे' या फेसबुक पेजवरून एक आक्षेपार्ह व्हिडिओ तयार करून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सागर भवते यांनी तक्रारीत केला. वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते यांना आलेल्या एका लिंकमध्ये हा व्हिडिओ होता. व्हिडिओमध्ये ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्याबाबत आक्षेपार्ह जातीवाचक शब्दांचा प्रयोग करण्यात आला आहे. हे कृत्य मानहानीकारक असून सामाजिक सलोखा बिघडवणारे आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत युवा आघाडी जिल्हा महासचिव सागर भवते यांनी स्वतः पोलीस निरीक्षक यांची भेट घेऊन तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यांनी 'राजकारण विदर्भाचे' या फेसबुक ग्रुपचे सर्व ॲडमिन (प्रशासक) तसेच व्हिडिओशी संबंधित सर्व व्यक्तींवर माहिती तंत्रज्ञान अधिनियम, ॲट्रॉसिटी कायद्यानुसार व इतर कायदेशीर कलमांखाली त्वरित गुन्हा नोंद करावा, अशी मागणी केली आहे.

वंचित बहुजन आघाडीने याप्रकरणी कठोर कारवाईची मागणी केली असून, या आक्षेपार्ह पोस्टमुळे समाजात कोणताही गैरसमज किंवा तणाव निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने तातडीने पाऊले उचलावीत, अशी मागणी केली आहे. तक्रार दाखल करतेवेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सदस्य प्रमोद मुंद्रे, विनोद खाकसे, युवा तालुका अध्यक्ष सचिन जोगे, मनिष खरे, अनिल सोनोने, नितीन थोरात, भुजंगराव वावरे, प्रविण निकाळजे, रोहित गवई, दिनेश गाडगे, शरद थोरात, मुस्ताक शाहा, प्रमोद गजरे सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

**(CJJD)** दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील
**किरकोळ (R.M.J.C.)क्र.१३६/२०२५ ने.ता.१७.११.२०२५**

राजेंद्र -- वि -- निरंक

अर्जदार : **१. राजेंद्र बाबाराव चावके**
**रा.खरडगांव, ता.नेर परसोपंत, जि.यवतमाळ**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**ज्याअर्थी मयत** बाबाराव मारोती चावके **यांचा मृत्यू दि.**०९.०७.२०१६ **रोजी वेणी गणेशपूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे. अ.नं.१ हा मयत यांचा मुलगा आहे. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात** मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ **अंतर्गत अर्ज सादर केला आहे.**

**त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस** सकाळी १०.३० **वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.**

**आज दिनांक १८ जुन सन २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय**
**नांदगाव खंडेश्वर**

# जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शनिवार, १ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधन भवनाचे ८ नोव्हेंबरला लोकार्पण

## राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, भिमराव आंबेडकर, आ. रोहित पवार यांची प्रमुख उपस्थिती

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

**सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात नवा अध्याय लिहिणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधन भवन या भव्य वास्तूचे लोकार्पण अखिल भारतीय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट चे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या हस्ते होत आहे. शनिवार, दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित या ऐतिहासिक सोहळ्यात अनेक मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती संस्थेच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठान चे अध्यक्ष प्रा. मुकुंद भारसाकळे यांनी दिली.**



या समारंभाला अखिल भारतीय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्यासोबत आ रोहित पवार, भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष भिमराव यशवंतराव आंबेडकर, पु भदन्त खेमधम्मो महाथेरो मुळावा, डॉ. सुगत वाघमारे उपस्थित राहणार आहेत. हा सोहळा प्रबोधन नगर, खडकी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधन भवन परिसरात पार पडणार आहे.

मागील महिन्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठानवर राष्ट्रध्वज फडकवण्यास जिल्हाधिकाऱ्यां कडून परवानगी मिळाली आहे.

या विशेष उपक्रमाचे उद्घाटन भिमराव आंबेडकर यांच्या शुभहस्ते होत आहे. तसेच २५ फुट उंची असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण आ रोहित पवार यांच्या हस्ते होईल. याशिवाय विपश्यना हॉलचे लोकार्पण पुज्यनीय भदन्त खेमधम्मो महाथेरो यांच्या हस्ते होईल. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठान, अकोला चे अध्यक्ष प्रा. मुकुंद भारसाकळे राहणार असून प्रा. विश्वनाथ कांबळे हे स्वागताध्यक्ष असतील. या सोहळ्याचे संपर्क समन्वयक प्रा.डॉ. गणेश बोरकर तथा संस्थेचे व्यवस्थापक तुषार खंडेराव राबवीत आहेत. कार्यक्रमाची जय्यत तयारी संस्थेचे सचिव अशोक इंगळे आणि कोषाध्यक्ष रमेश तायडे यांच्या मार्गदर्शनात सुरु असून या सोहळ्यात सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी प्रा. विश्वनाथ कांबळे, संस्थेचे सचिव अशोक इंगळे, कोषाध्यक्ष रमेश तायडे, संपर्क समन्वयक प्रा.डॉ. गणेश बोरकर, व्यवस्थापक तुषार खंडेराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड सोशल वर्कचे प्राचार्य डॉ . एच. बी. नानवाला यांची प्रमुख उपस्थिती होती.

# प्रभाग रचनेचा चेंडू हायकोर्टात

■ हिवरखेड नगरपरिषद मतदार यादीवर तब्बल ११४२ आक्षेप
■ निवडणुका वेळेवर होणार की लांबणार?
■ नागरिकांमध्ये चर्चेचा विषय

**■ धिरज बजाज ■**

हिवरखेड : हिवरखेड नगरपरिषद प्रभाग रचनेवरील आक्षेपांची दखल न घेतल्याने अखेर या प्रकरणाचा चेंडू थेट उच्च न्यायालयात पोहोचला आहे. यासंदर्भातील याचिकेवर १४ नोव्हेंबर रोजी नागपूर खंडपीठात दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार असून, या सुनावणीकडे हिवरखेड वासियांचे लक्ष लागले आहे.

नगरपरिषद स्थापन झाल्यापासून ही पहिलीच निवडणूक असल्याने, नागरिकांमध्ये उत्सुकता आणि तणाव दोन्हीही वाढले आहेत. प्रभाग रचनेतील अन्यायकारक बाबींबाबत माजी ग्रामपंचायत सदस्या सौ. वंदनाताई राजेश वानखडे यांनी थेट उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणात महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाचे सचिव, राज्य निवडणूक आयोगाचे सचिव, जिल्हाधिकारी अकोला आणि मुख्याधिकारी, नगरपरिषद हिवरखेड या चौघांना पक्षकार करण्यात आले आहे.

याचिकाकर्त्या वंदना वानखडे यांच्यावतीने अ‍ॅड. पायल कावरे न्यायालयात बाजू मांडणार आहेत. १४ नोव्हेंबर रोजी न्यायमूर्ती अनिल किलोर आणि रजनीश व्यास यांच्या खंडपीठासमोर ही याचिका सुनावणीस येणार आहे. या सुनावणीत शासन व स्थानिक प्रशासन आपली बाजू कशी मांडते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, हिवरखेड नगरपरिषदच्या प्रारूप मतदार यादीवर तब्बल ११४२ आक्षेप दाखल झाल्याने प्रशासनात चांगलीच खळबळ उडाली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात आक्षेप दाखल होणे हे अभूतपूर्व मानले जात असून, मतदार यादीत मोठा घोळ झाल्याचे स्पष्ट होत आहे.

आक्षेपांपैकी बहुतांश आक्षेप हे 'निवासी असलेल्या वार्डाऐवजी दुसऱ्या वार्डात नाव नोंदवले जाणे' किंवा 'एकाच व्यक्तीचे नाव दोन-तीन वार्डांच्या यादीत असणे' या प्रकारचे असल्याचे सूत्रांनी सांगितले. त्यामुळे या सर्व आक्षेपांचा निपटारा करताना नगरपरिषद प्रशासनाची चांगलीच दमछाक होत आहे. न्यायालयीन निर्णय आणि मतदार यादीवरील आक्षेप निवारणाच्या प्रक्रियेनंतरच हिवरखेड नगरपरिषद निवडणुकीची दिशा स्पष्ट होणार आहे. त्यामुळे निवडणुका वेळेवर होणार की पुढे ढकलल्या जाणार — याबाबत नागरिकांमध्ये तर्क-वितर्क सुरू आहेत.

# विद्याभारती शाळेत सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

वाशिम येथील विद्याभारती शाळेत भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त व भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नितेश मिटकरी तसेच प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे संचालक सुमित सुरेशराव मिटकरी व पर्यवेक्षक विजय गोटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल तसेच भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या योगदानावर व इंदिरा गांधी यांच्या कार्यावर शाळेचे पर्यवेक्षक विजय गोटे यांनी आपले विचार व्यक्त केले.पद्मिनी खराटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशाचे एकीकरण घडवले तर इंदिरा गांधींनी देशाच्या प्रगतीसाठी कठोर निर्णय घेतले. त्यांच्या कार्यातून देशभक्ती व नेतृत्वाची प्रेरणा मिळते.

# पातूर शहरात मुख्य मार्गावर वाहतुकीची कोंडी

**■ प्रतिनिधी | पातूर ■**

पातूर शहरातील मुख्य मार्गावर गेल्या काही दिवसांपासून वाहतुकीची तीव्र कोंडी निर्माण झाली असून, सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. सकाळी शाळा-कॉलेज तसेच दुपारी कार्यालय सुटण्याच्या वेळी रस्त्यावर शिस्तभंगाचे चित्र दिसत आहे. वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्याने शहरातील वाहतुकीचा ठप्पा बसतो आहे.



वाहतुकीतील या गोंधळामागे ट्राफिक पोलिसांचे दुर्लक्ष हे मुख्य कारण असल्याचे स्पष्ट झाले आहे. शहरातील प्रमुख चौकांवर वाहतूक नियंत्रणासाठी पोलिस दिसत नसल्याने वाहनचालक मनमानी पद्धतीने दोनचाकी, चारचाकी व मालवाहतूक वाहने रस्त्यावर उभी करीत आहेत. त्यामुळे वाहतुकीचा वेग पूर्णपणे कोलमडला आहे.

याशिवाय फूटपाथवर व्यापाऱ्यांचे अतिक्रमण वाढल्याने पादचारी नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या गोंधळामुळे अपघातांच्या घटनांमध्येही वाढ होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. गर्भवती महिला, वृद्ध नागरिक, विद्यार्थी आणि तातडीच्या कामांसाठी निघालेले लोक या कोंडीत अडकून हैराण झाले आहेत.

## ट्राफिक पोलिसांचे दुर्लक्ष, नागरिक त्रस्त

नागरिकांनी तातडीने ट्राफिक पोलिसांनी शहरातील मुख्य मार्गांवर गस्त वाढवावी, अतिक्रमणाविरोधात कारवाई करावी आणि वाहतूक नियोजन प्रभावीपणे राबवावे, अशी मागणी केली आहे.

**वाहतुकीच्या कोंडीमुळे तंटे वाढले ! :** पातूर शहराच्या मुख्य रस्त्यालगत अनेक दुकानदारांनी अतिक्रमण करून फूटपाथ व्यापले असून, वाहनधारकही मनमानी पद्धतीने वाहने उभी करीत आहेत. त्यामुळे दररोज वाहतूक कोंडीसह वाद-विवाद, तंटे वाढले आहेत. याकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्था प्रस्थापित करावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

# जिल्ह्यातील नगरपरिषद व नगर पंचायतींसाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

जिल्ह्यातील नगरपरिषद अकोट, मुर्तिजापुर, बाळापूर, तेल्हारा, हिवरखेड आणि नगरपंचायत बार्शिटाकळी यांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी अंतिम मतदार याद्या संबंधित नगरपरिषद व नगरपंचायत कार्यालयांच्या सूचना फलकांवर, त्यांच्या वेबसाईटवर, तसेच जिल्हाधिकारी अकोला यांच्या अधिकृत संकेतस्थळावर (akola.nic.in) दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे, अशी माहिती नपाप्रचे सह आयुक्त यांनी दिली.

# वाशिममध्ये सकारात्मक ऊर्जा व आध्यात्मिक विकासासाठी पिरॅमिडची स्थापना

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

शहरात सकारात्मक ऊर्जा प्रसारित करण्यासाठी तसेच आरोग्य व आध्यात्मिक प्रगतीसाठी दोन पिरॅमिडची स्थापना करण्यात येत आहे. या दोन्ही पिरॅमिड्सचे उद्घाटन दि. ९ नोव्हेंबर २०२५, रविवार रोजी सकाळी ९.०० वाजता होणार आहे.



पहिले पिरॅमिड १०ˆ १० फूट आकाराचे असून चिखली रोड, मंत्री पार्क ५ येथे सुमित खत्री, मनीष मंत्री आणि प्रतीक मंत्री यांच्या पुढाकाराने उभारण्यात आले आहे. येथे पुढे मेडिटेशन पार्क उभारण्याचीही संकल्पना आहे. दुसरे १२ˆ १२ फूट आकाराचे पिरॅमिड हरी ओम नगर, स्वागत लॉनसमोर, पुसद नाका येथे श्री रुपेशजी लढ्ढा यांच्या निवासस्थानी उभारण्यात आले आहे.या दोन्ही पिरॅमिड्सचे उद्घाटन पिरॅमिड मेडिटेशन स्पिरिचुअल सोसायटी मूव्हमेंट ऑफ इंडिया चे डायरेक्टर पी. व्ही. रामा राजू व देवयानी देवेश नौवगजे (नांदुरा) यांच्या शुभहस्ते होणार आहे. पिरॅमिड हा त्रिकोणी आकाराचा असून अत्यंत शक्तिशाली उर्जेचे केंद्र मानला जातो. त्याच्या शिखरबिंदूमुळे उर्जा आकृष्ट होऊन आसपासच्या वातावरणात सकारात्मक कंपने निर्माण होतात, ज्याचा शरीर व मनावर उत्तम परिणाम होतो. पिरॅमिडमध्ये बसून ध्यान केल्याने मानसिक, शारीरिक, भावनिक व आध्यात्मिक विकास, सकारात्मक ऊर्जेचा वाढ, आरोग्य सुधारणा, दीर्घकालीन त्रासांपासून दिलासा, तणाव व निद्रानाशावर फायदा, आत्मविश्वासात वाढ, विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती व एकाग्रता वाढ, पचनशक्ती सुधारणा, थकवा दूर होऊन ऊर्जा वाढ, कलाकारांच्या सृजनशीलतेत वाढ पिरॅमिड ध्यानामुळे मन शांत होते, विचारशक्ती वाढते आणि जीवनात सकारात्मक बदल घडण्यास मदत होते. या उपक्रमात पिरॅमिड स्पिरिचुअल सोसायटी मूव्हमेंट, वाशिम येथील सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे.

यामध्ये विशेषत रुपेश लढ्ढा, सुमित खत्री, संजय व्यास, अनिलजी सोमानी, डॉ. नारायण डाळे, रविंद्र बैतुळे, एकनाथ सुरेशे, रामदेव भाटी, महेशजी गुप्ता, आशिषजी केला, पंकज गाडिया, विजयजी हेंबाडे, दत्तभाऊ खोडके यांचा समावेश आहे.

# एकता, अखंडता आणि संकल्पाचा संदेश



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

भारताचे पहिले उपपंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आज दि.३१ ऑक्टोबर रोजी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

तसेच माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त (राष्ट्रीय संकल्प दिन) त्यांच्या प्रतिमेसही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात भारतीय एकात्मतेसाठी निश्चयपूर्वक धोरण आखून त्याची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या सरदार पटेल यांच्या स्मरणार्थ साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना एकता व अखंडतेची शपथ देण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

# प्री-मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी मुदतवाढ

**वाशिम :** नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील केंद्र पुरस्कृत प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनांच्या विविध प्रक्रियांमध्ये मुदतवाढ देण्यात आली आहे.

सुधारित वेळापत्रक पुढीलप्रमाणे अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख: १५ नोव्हेंबर २०२५ आयएनओ स्तर (एल१) तपासणीची अंतिम तारीख: २५ नोव्हेंबर २०२५ डीएनओ/एसएनओ स्तर (एल२) तपासणीची अंतिम तारीख: ५ डिसेंबर २०२५

ही मुदतवाढ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेण्यासाठी अधिक वेळ उपलब्ध व्हावा या उद्देशाने करण्यात आली आहे. वाशिम जिल्ह्यातील निवड झालेल्या टॉप क्लास शाळा/महाविद्यालयांनी, शैक्षणिक संस्था, विद्यार्थी आणि पालकांनी वरील वेळापत्रकानुसार अर्ज व आवश्यक तपासणी प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी.

# जऊळका ते अमानवाडी रस्ता त्वरित दुरुस्ती करिता धरणे आंदोलन



**मालेगाव :** जऊळका ते अमानवाडी रस्ता गेल्या पाच वर्षापासून नादुरुस्त असून या रस्त्यावर मोठ मोठाले खड्डे पडले आहेत, वारंवार शासनाकडे रस्ता दुरुस्तीची मागणी करूनही सार्वजनिक बांधकाम विभाग रस्ता दुरुस्त करत नाही केवळ रस्ता दुरुस्तीच्या निविदा काढून वेळ काढू पणा करत आहे याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ता सीता धंदरे व उमेश आंधळे यांच्या वतीने रस्ता त्वरित दुरुस्त करावा कारण सदर रस्त्यावर येत जात असताना वारंवार अपघात होऊन छोटे मोठे दुखापत होत आहे. त्याकरिता शासनाने पुढील आठ दिवसात रस्ता दुरुस्ती करावा अन्यथा मोठे आंदोलन करण्यात येईल असा इशारा देऊन एकदिवशीय रस्त्यावर बसून धरणे आंदोलन करण्यात आले यावेळी बहुतांश महिला व पुरुषांची उपस्थिती होती.

# रविवारी राज्यस्तरीय यादे रफी गित स्पर्धेची गायनपूर्व चाचणी

**वाशिम :** महान गायक स्व. महंम्मद रफी यांच्या जयंतीनिमित्त येत्या ३० डिसेंबर रोजी वाशिम येथे होवू घातलेल्या राज्यस्तरीय यादे रफी गीत स्पर्धेची गायनपूर्व चाचणी रविवार, २ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत पुसद नाका जवळील स्वागत लॉन येथे होणार असून या चाचणी स्पर्धेतुन कलावंतांचा स्पर्धेत प्रवेश निश्चित करण्यात येईल. तरी गायक कलावंतांनी या गायनपुर्व चाचणीत सहभाग घेण्याचे आवाहन नवनिर्माण फाऊंडेशन वाशिमच्या वतीने करण्यात आले आहे.

सामाजीक क्षेत्रात कार्यरत असलेल्या नवनिर्माण फाऊंडेशनच्या वतीने महान गायक स्व. महंम्मद रफी यांच्या जयंतीनिमित्त ३० डिसेंबर रोजी भव्य राज्यस्तरीय गितगायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत विजयी स्पर्धकांना हजारो रुपयांची बक्षीसे व स्मृतीचिन्ह देवून प्रतिष्ठीत मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार जाणार आहे. तसेच या स्पर्धेमध्ये स्व. गायक महंमद रफी यांचे सुपुत्र शाहीद रफी यांची विशेष उपस्थिती राहील व त्याच्या हस्ते विजयी स्पर्धकांना पुरस्काराचे वितरण केले जाईल. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी राज्यभरातून शेकडो स्पर्धक वाशिमला येतात. यावर्षी होणाऱ्या या स्पर्धेसाठी पुरुषगट व महिला गटासाठी हजारो रुपयांची लयलुट करण्यात आली आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी स्पर्धकांनी तीन गाण्यांची तयारी करुन येणे गरजेचे आहे.

## तहसीलदारावर लाचखोरीचे गंभीर आरोप

# ७० वर्षीय शेतकरी महिलेचे अन्यायाविरोधात उपोषण!

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

वाशिम तालुक्यातील उकळीपेन येथील ७० वर्षीय शेतकरी महिला रूख्माबाई वामन जमधाडे यांनी तहसीलदार निलेश पळसकर यांच्या विरोधात दोन लाख रुपयांची लाच घेतल्याचा गंभीर आरोप करत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. १४ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत उपोषण केले. मात्र उपोषण संपेपर्यंत जिल्हाधिकारी वाशिम यांनी कोणतीही कारवाई न केल्याने रूख्माबाई यांनी आता मंत्रालय, मुंबई येथील आझाद मैदानात ५ डिसेंबर रोजी उपोषणास बसण्याची चेतावणी दिली आहे.

### रूख्माबाई जमधाडे यांचे मंत्रालयात आंदोलनाची चेतावणी

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, संबंधित प्रकरण क. रा. मा. क. आर. टी.एस.-५९/ उकळीपेन/ ०१/ २०२३-२०२४ हे असून, तहसीलदार निलेश पळसकर यांनी अर्जदारांकडून लाच घेऊन निर्णय त्यांच्या बाजूने देत १९८६ पासून असलेल्या जमधाडे यांच्या खरेदीखताची नोंद बेकायदेशीरपणे रद्द केल्याचा आरोप आहे. तसेच तलाठी व मंडळ निरीक्षक यांनीही या प्रकरणात मौजे उकळीपेन, गट क्रमांक २९४ मधील ०.७४ गुंठे शेतीजमिनीची नोंद परस्पररित्या बदलून दिल्याचे जमधाडे यांनी म्हटले आहे. उपोषणादरम्यान वाशिममध्ये झालेल्या पावसामुळे रूख्माबाई यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले, तरीही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही. त्यामुळे त्यांनी हे उपोषण तात्पुरते स्थगित करून आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट निवेदन दिले आहे.



त्या निवेदनात त्यांनी तहसीलदार निलेश पळसकर यांना निलंबित करून त्यांची बदली गडचिरोली जिल्ह्यात करण्याची मागणी केली आहे. तसेच १ डिसेंबरपर्यंत कारवाई न झाल्यास त्या ५ डिसेंबर रोजी मंत्रालयात उपोषणास बसणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

> 'मी ७० वर्षांची असून न्यायासाठी लढते आहे. प्रशासनाने वेळेत कारवाई केली नाही तर मला पुन्हा उपोषणावर बसावे लागेल.'
>
> **- रूख्माबाई जमधाडे**

या निवेदनाची प्रत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि विभागीय आयुक्त अमरावती यांनाही पाठविण्यात आली आहे.या प्रकरणात प्रशासन कोणती पावले उचलते, याकडे आता जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३३२ ■ शनिवार, १ नोव्हेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# जिल्हा व्यवसाय सुधारण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना अधिक अधिकार

## -ईज ऑफ डुईंग बिझिनेस आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती

**मुंबई जनमाध्यम :** राज्यातील औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी आता जिल्हास्तरावरही निर्णयक्षमता वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा व्यवसाय सुधारणा कृती योजना २०२५ अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांना अधिक अधिकार देण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.सह्याद्री अतिथीगृह येथे 'ईज ऑफ डुईंग बिझिनेस' संदर्भात उद्योग विभागाचा आढावा घेण्यात आला. या बैठकीस मुख्य सचिव राजेशकुमार, उद्योग विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तर राज्यातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात व्यवसायसुलभता वाढविण्यासाठी १५४ सुधारणांचा समावेश असलेली कृती योजना राबवली जात आहे. या योजनेची अंमलबजावणी १४ ऑगस्ट २०२६ पर्यंत करण्यात येईल. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांसाठी चिंतन शिबिरे आणि विभागीय बैठकींचे आयोजन होणार आहे.औद्योगिक प्रगतीसाठी सहा विभागीं समित्या स्थापन करण्यात आल्या असून, त्या ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी आपला अहवाल सादर करतील. नाशिक विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या नेतृत्वाखाली ईज ऑफ डुईंग बिझिनेस सुधारणा समिती कार्यरत आहे. तर विजय सूर्यवंशी आणि जितेंद्र पापळकर अनुक्रमे औद्योगिक संसाधन वापर आणि भू-बँक प्रोत्साहनावर लक्ष केंद्रीत करत आहेत.महाराष्ट्राने ईज ऑफ डुईंग बिझिनेस २०२४' मूल्यांकनात लक्षणीय प्रगती साधली आहे. ४०२ पैकी ३९९ सुधारणा पूर्ण झाल्याने राज्याचा अंमलबजावणी स्कोअर ९९.२५ टक्क्यांवर पोहोचला आहे. या उपक्रमाचा अंतिम निकाल ११ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर होणार आहे. मैत्री २.०' प्रणालीद्वारे एकल खिडकी प्लॅटफॉर्म कार्यान्वित करण्यात येत असून, परवाने, अर्ज, तक्रार निवारण व पेमेंट प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत.मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या बिझिनेस रिफॉर्म ॲक्शन प्लॅन (बीआरएपी) अंतर्गत महाराष्ट्र २०१५ पासून सतत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यांपैकी एक राहिला आहे. आगामी काळात सर्व जिल्ह्यांतून औद्योगिक गती साध्य करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ते अधिकार दिले जाणार आहेत.



# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उमेदवारांची खर्च मर्यादा वाढवली

## -८ वर्षांनंतर झाली खर्च मर्यादेत वाढ; निवडणुकीत सुटणार उमेदवारांचा हात मोकळा

**वर्धा जनमाध्यम :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविणाऱ्या उमेदवारांसाठीच्या निवडणूक खर्च मर्यादेत सुधारणा करून वाढ करण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे. सन २०१६-१७ मध्ये ठरविलेल्यानंतर तब्बल आठ वर्षांनी ही मर्यादा पुन्हा एकदा बदलण्यात आली आहे. आगामी काळात लवकरच वर्धा जिल्ह्यातील नगरपरिषद, पंचायत आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुका होण्याची शक्यता असून या पार्श्वभूमीवर इच्छुकांसाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. या निवडणुकीत उमेदवारांचा हात आता मोकळा सुटणार असे चित्र दिसत आहे.

निवडणूक खर्चाचा हिशोब आयोगाने ठरविलेल्या मुदतीत आणि नमूद पद्धतीनुसार सादर करणे सर्व उमेदवारांसाठी अनिवार्य असेल. सुधारित खर्च मर्यादा येत्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना तत्काळ लागू झाल्या आहेत.

**नगरपरिषद/नगर पंचायत**

नगरपरिषद निवडणुकांमध्ये अ वर्ग नगराध्यक्षांसाठी १५ लाख आणि सदस्यांसाठी ५ लाख रुपये, ब वर्ग नगराध्यक्षांसाठी ११.२५ लाख आणि सदस्यांसाठी ३.५० लाख रुपये तर क वर्ग नगराध्यक्षांसाठी ७.५ लाख आणि सदस्यांसाठी २.२५ लाख रुपये खर्च मर्यादा राहील. नगरपंचायत निवडणुकांसाठी नगराध्यक्षांना ६ लाख आणि सदस्यांना २.२५ लाख रुपये खर्चाची परवानगी देण्यात आली आहे.

**जिल्हापरिषद/पंचायत समिती**

जिल्हा परिषद निवडणुकीत ९० ते ७० सदस्य असलेल्या विभागात जिल्हा परिषद सदस्यांसाठी ९ लाख रुपये आणि पंचायत समिती सदस्यांसाठी ७.५ लाख रुपये मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ६१ ते ७० सदस्यांच्या विभागात अनुक्रमे ७.५ लाख व ५.२५ लाख रुपये आणि ५० ते ६० सदस्यांच्या विभागात ६ लाख व ४.५ लाख रुपये इतकी मर्यादा असेल.

**ग्रामपंचायत**

ग्रामपंचायतींसाठी ७ ते ९ सदस्यांच्या ग्रामपंचायतींमध्ये सरपंचांसाठी ७५ हजार आणि सदस्यांसाठी ४० हजार रुपये मर्यादा ठेवण्यात आली आहे. ११ ते १३ सदस्यांच्या ग्रामपंचायतींमध्ये सरपंच १.५ लाख तर सदस्य ५५ हजार रुपये खर्च करू शकतील. १५ ते १७ सदस्यांच्या ग्रामपंचायतींमध्ये सरपंचासाठी २.६५ लाख व सदस्यांसाठी ७५ हजार रुपये मर्यादा ठेवण्यात आली आहे.

# कडू घास ; शेतकऱ्यांच्या हक्काची झुंज उदासीनतेच्या छायेत

**वर्धा जनमाध्यम :** अमरावती जिल्ह्यातून सुरू झालेल्या ट्रॅक्टर महा एल्गार आंदोलन गेल्या तीन दिवसांपूर्वी नागपूर येथील डोंगरगाव येथे प्रहारचे संस्थापक बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे आंदोलन पेटून उठले. कर्जमाफीसह सातबारा कोरा करण्याच्या मागण्यांसाठी हजारो शेतकरी रस्त्यावर उतरले. मात्र चर्चेच्या नावाखाली आश्वासनांच्या पोकळ गिऱ्या देत सरकारने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरवलं. सरकारने समिती स्थापन करून जून २०२६ पर्यंत कर्जमाफी देण्याचे सांगितले असले, तरी पुढचे आठ महिने रोज सरासरी तीन शेतकरी आत्महत्या करत असताना एवढ्या विलंबाचे कारण विचारत शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. अनेक शेतकरी संघटनांनी सरकारच्या या भूमिकेवर तीक्ष्ण टीका केली.बच्चू कडू व इतर नेते सरकारशी चर्चेसाठी गेले असता तीव्र भूमिका घेऊनही अखेर आंदोलन स्थगित करण्यात आले. आम्हाला तारीख मिळाली, एवढंच पुरेसं अशा वक्तव्यावरून चर्चेचा निकाल आधीच ठरलेला असल्याचं सूचित झालं. आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला तेव्हा समर्थकांमध्ये नाराजी पसरली. माध्यमांशी बोलताना बच्चू कडू हे स्वतःच निर्णयावर समाधानी नसल्याचे संकेत देत होते. राजकीय पटलावर या आंदोलनाकडे मोठ्या उत्सुकतेने पाहिले जात असताना, सरकारने साम-दाम-दंडाच्या पलीकडे जाऊन लोकशाही संस्थांचा वापर आंदोलन आवरण्यासाठी केला असल्याचेही आरोप झाले. न्यायालयाच्या आदेशानंतरही प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याने शेतकऱ्यांच्या भावनांना धक्का पोहोचल्याचं शेतकरी नेत्यांनी सांगितले. दरम्यान, दिवसरात्र शेताच्या बांधावर उभा राहणारा बळीराजा आज आर्थिक विवंचनेतून आत्महत्येचा मार्ग पत्करतो आहे. कर्ज, दुष्काळ आणि अपुऱ्या दरांच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी आजही मदतीच्या प्रतीक्षेत आहे. आणि सरकारकडून आलेली कर्जमाफीची गोड बातमी प्रत्यक्षात कडू घास ठरत आहे.



# एकतेचा संदेश देत तळेगावात वॉक फॉर युनिटी

## -सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त तळेगाव पोलिस विभागाचा उपक्रम



**तळेगाव जनमाध्यम :** लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून पोलिस स्टेशन तळेगाव द्वारे भारताची एकता आणि अखंडता एक देश, एक भारत, श्रेष्ठ भारत हा संदेश देण्यासाठी तळेगाव पोलिस स्टेशनच्या पुढाकाराने वॉक फॉर युनिटी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शहरातील विविध शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वॉक फॉर युनिटीमध्ये तळेगाव पोलिस दल, गृहरक्षक दलाचे सैनिक, मोहल्ला कमिटी, शांतता कमिटी सदस्य, व सर्व महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांचे विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. बस स्थानकापासून सुरू झालेली ही एकात्मता यात्रा शहरातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करुन रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक मंगेश भोयर यांनी सहभागी झालेल्या प्रत्येकाला सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

# राष्ट्रीय एकात्मतेत तरुण-तरुणींची महत्त्वाची भूमिका, ऋचा वगरकर मांजरखेडे

## राष्ट्रीय एकता दिनानिमित्त रन फॉर कंट्रीः

**देवळी जनमाध्यम :** आज देशाला साहसी, शिस्तबद्ध व समर्पित युवा पिढीची नितांत गरज आहे. भारत हा विविधतेने नटलेला देश असून एकता निर्माण करणे गरजेचे आहे अनं याकरिता तरुण तरुणींनी पुढाकार घ्यावा व आपला देश प्रगत बनवावा. राष्ट्रीय एकात्मतेत तरुण-तरुणीच महत्त्वाची भूमिका निभवू शकते, असे प्रतिपादन नागपूर आकाशवाणीच्या नैमैत्तिक उद्घोषिका तथा कवियत्री ऋचा वगरकर मांजरखेडे यांनी २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अंतर्गत महाविद्यालयातील एनसीसी विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या बक्षीस वितरण समारंभाला ३१ ऑक्टोबर रोजी केले.



राष्ट्रीय एकता दिनानिमित्त आयोजित रन फॉर कंट्री या दौडचो उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ सुनिता सोनारे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर तर प्रमुख अतिथी तथा वक्ते म्हणून कवयित्री ऋचा वगरकर मांजरखेडे, रोव्हर लीडर संतोष तुरक व पत्रकार गणेश शेंडे उपस्थित होते. एकता दिनानिमित्त सरदार वल्लभभाई पटेल व श्रीमती इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. एनसीसी छात्र सैनिकांसाठी चार किलोमीटर दौंडचे आयोजित करण्यात आले होते. यात मुलांच्या गटात कॅडेट भूषण ठोके, कॅडेट उदय काळे व साहिल गेडाम तर मुलींच्या गटात कॅडेट पायल नखाते, स्नेहा मडकाम व सलोनी अजमिरे यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय पुरस्कार प्राप्त केले.

पारितोषिक वितरण कार्यक्रमात प्रमुख वक्त्या ऋचा मांजरखोडे यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याची ओळख करून दिली व तरुणांनी राष्ट्रीय एकता निर्माण करण्याकरिता काय करावे याकरिता प्रेरणादायी भाषण दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन मोहन गुजरकर यांनी केले. संचालन अंडर ऑफिसर कोमल शितळे व मयूर पेटकर यांनी तर आभार प्रदर्शन कॅडेट सार्जंट मेजर कल्याणी लिखार हिने मानले. यशस्वीते करिता अंडर ऑफिसर रितेश बुटे ,रेंजर वैष्णवी शिरभाते, सर्जेंट निशांत शितळे, कॅडेट पायल चौके व एनसीसी छात्रसैनिकांनी अथक परिश्रम केले.

# येत्या आठ दिवसात न.प.निवडणुकीची घोषणा ?

## -निवडणूक आयोगाकडून आराखडा तयार; स्थानिक स्वराज्याच्या दोन टप्प्यात निवडणुका

**वर्धा जनमाध्यम :** राज्यभरात स्थानीक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वारे वाहत असून पाच ते सात वर्षांपासून रखडलेल्या निवडणुकांचा मुहूर्त सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे अधिक जवळ आला असून येत्या आठ दिवसात नगरपालिका निवडणुकीबाबत आचारसंहिता लागण्याची दाट शक्यता असून निवडणूक आयोगाने तसा आराखडा तयार केला आहे. तर जिल्हा परिषद, पंचायत समितीची निवडणूक घोषणा हिवाळी अधिवेशनात अथवा अधिवेशनानंतर होण्याची दाट शक्यता आहे. पहिल्या टप्प्यात नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुका होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.



गेल्या पाच ते सात वर्षांपासून महाराष्ट्रातील नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका झाल्या नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ च्या आत निवडणुका घेण्याबाबत निवडणूक आयोगाला आदेशीत केल्यानंतर आता निवडणूक आयोग या निवडणुका घेण्यासाठी तयारीला लागलेले आहेत. त्यामुळे राज्यभरात स्थानीक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वारे वाहताना दिसून येत आहे. आयोगाकडून जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे.

येत्या आठ दिवसात संभाव्य निवडणूक तारीख येण्याची दाट शक्यता आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीबाबत आयोगाने दोन टप्प्यात निवडणुका घेण्याचे ठरवले असल्याचे सुत्रांचे सांगणे आहे. पहिल्या टप्प्यात नगरपालिका आणि दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका होऊ शकतात. नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशन सुरू असताना अथवा अधिवेशनानंतर जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीची घोषणा होऊ शकते. निवडणूक आयोगाच्या हालचाली पाहता पक्षीय पातळीवर महायुती आणि महाविकास आघाडीतील पक्ष निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. इच्छूक आपआपल्या मतदारसंघात चाचपणी करत आहेत तर शहरी भागात वार्डा वार्डात इच्छुकांची बहुगर्दी दिसून येत आहे.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय एकता दिनाची शपथ

## सरदार वल्लभभाई पटेल यांना वान्मथी सी यांनी केले अभिवादन

**वर्धा जनमाध्यम :** भारताचे पहिले उपपंतप्रधान, गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त तसेच दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना राष्ट्रीय संकल्प दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



भारतीय एकात्मतेसाठी निश्चियपूर्वक धोरण आखून त्यासाठी पावले उचलणाऱ्या सरदार पटेल यांच्या जयंती निमित्त साजरा करण्यात येत असलेल्या राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांना वान्मथी सी यांनी एकात्मतेची शपथ दिली.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर, उपजिल्हाधिकारी श्रीपती मोरे, उपजिल्हाधिकारी अनील गावीत, अधिक्षक अनीकेत सोनवणे, संजय गांधी योजना विभागाचे बबिता आळंदे, पुनर्वसन विभागाचे तहसिलदार कौशल्याराणी पाटील, जिल्हा नाझर प्रशांत नवले यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.


# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा कालवे विभाग, वर्धा**

**ई-मेल** Iwed_wardha@rediffmail.com

## निविदा सुचना क्रमांक ०५/२०२५-२६

कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा कालवे विभाग, वर्धा हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामासाठी **ब-१** (टक्केवारी दराने) निविदा मागवित आहे. निविदा प्रपत्रे विभागीय कार्यालयात उपलब्ध राहतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा कालवे विभाग, वर्धा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा किंमत (रु.लक्ष) | ईसारा/ बयाणा रक्कम (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| १. | निम्न वर्धा प्रकल्प अंतर्गत निम्न वर्धा कालवे विभागीय कार्यालयावर सोलर पॅनल बसविणे व ईतर संलग्न कामे | ८.२३ | ८३००/- | ०३ महिने | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेमार्फत निर्गमित केलेले विद्युत ठेकेदारांचे अनुज्ञप्ती |

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कोरी निविदा प्रपत्र विक्री दिनांक | - | ३१.१०.२०२५ ते ०७.११.२०२५ वेळ १७.४५ वाजेपर्यंत, विभागीय कार्यालय, वर्धा |
| २) | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | - | १०.११.२०२५ वेळ १७.४५ वाजेपर्यंत विभागीय कार्यालय, वर्धा |
| ३) | निविदा उघडण्याचा दिनांक | - | ११.११.२०२५ वेळ १२.०० वा. (शक्य असल्यास) |
| ४) | कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. | | |

**(जिमाका-वर्धा/१४३/२०२५-२६)**

**स्वा/-**
**कार्यकारी अभियंता,**
**निम्न वर्धा कालवे विभाग,**
**वर्धा (पिंपरी)**

paper www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अतिवृष्टीमुळे बाधित शेतक-यांना मदतीसाठी २,५४० कोटी ९० लाख ७९ हजार निधी वितरणास मान्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित शेतक-याला तातडीने मदत देण्यास राज्य शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्यानुसार राज्यात जून ते सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे बाधित शेतक-यांना तत्काळ मदत करण्यासाठी २,५४० कोटी ९० लाख ७९ हजार इतका निधी वितरित करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.या बाबतचे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतक-याला मदत करु न त्याला पुन्हा उभे करण्यासाठी शासन संवेदनशीलपणे काम करत असून या मदतीमुळे नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतक-याला दिलासा मिळणार असल्याचा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी व्यक्त केला.

रब्बी हंगाम; बियाणांसह अनुषंगिक बाबीसाठी १७६५ कोटींवर मदत

राज्यात खरीप हंगाम, २०२५ मध्ये अतिवृष्टी,पूर या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतक-यांना येत्या रब्बी हंगामात बियाणे व अनुषंगिक बाबींची खरेदी करण्यासाठी मदत व्हावी यासाठी राज्य शासनाने विशेष मदत पॅकेज अंतर्गत प्रती हेक्टरी १० हजार रुपये प्रमाणे (तीन हेक्टर मर्यादेत) १,७६५ कोटी २२ लाख ९२ हजार इतका निधी वितरित करण्यास मान्यता दिली आहे.

जुलै ते सप्टेंबर २०२५ कालावधीमध्ये अतिवृष्टी व पुरामुळे बाधित शेतक-यांना मदत म्हणून येत्या रब्बी हंगामासाठी बियाणे व अनुषंगिक बाबींसाठी अतिरिक्त मदत मिळण्यासाठी पुणे, नाशिक व अमरावती विभागीय आयुक्त यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार ही मदत देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सातारा जिल्ह्यातील १४ हजार ६४३ शेतक-यांच्या ५ हजार ८०३.५५ हेक्टर क्षेत्रातील नुकसानीपोटी पाच कोटी ८० लाख ३६ हजार रु पये.

नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील १६ लाख ५९ हजार २९३ शेतक-यांच्या १२ लाख ११ हजार ५९४ हेक्टर क्षेत्रातील नुकसानीपोटी १२११ कोटी ५४ लाख ९० हजार रु पये.अमरावती जिल्ह्यातील चार लाख ९० हजार ९११ शेतक-यांच्या पाच लाख ४७ हजार ८७६.६५ हेक्टर क्षेत्रातील नुकसानीपोटी ५४७ कोटी ८७ लाख ६६ हजार रु पये निधी वितरणास मान्यता दिली आहे.जून ते सप्टेंबर २०२५ कालावधीत अतिवृष्टी व पूर यामुळे बाधित झालेल्या शेतपिकांच्या



नुकसानीपोटी नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे विभागातील जिल्ह्यात बाधित झालेल्या शेतक-यांना दोन ते तीन हेक्टर मर्यादित (वाढीव एक हेक्टरसाठी) १२० कोटी ३३ लाख ८७ हजाराची मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.यामध्ये वर्धा जिल्ह्यातील २१ हजार ३९२ शेतक-यांच्या १५ हजार ५१२.११ हेक्टरवरील बाधित क्षेत्रासाठी १३ कोटी २० लाख ३८ हजार रु पये वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

अमरावती बुलढाणा, वाशिम, अकोला, यवतमाळ जिल्ह्यातील ८६ हजार ५८२ शेतक-यांच्या ७१ हजार ३३३.९० हेक्टरवरील बाधित क्षेत्रासाठी ६१ कोटी ८१ लाख ६४ हजार रु पये वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील ६३ हजार ४१४ शेतक-यांच्या ४३ हजार १६२.३१ हेक्टरवरील बाधित क्षेत्रासाठी ४२ कोटी ४५ लाख ९३ हजार रु पये वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील दोन हजार ८९६ शेतक-यांच्या दोन हजार ५५९.६४ हेक्टरवरील बाधित क्षेत्रासाठी दोन कोटी ८५ लाख ९२ हजार रु पये वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

अतिवृष्टी, सततचा पाउस या नैसर्गिक आपत्तीमध्ये जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी अमरावती जिल्ह्यासाठी ५७० कोटी नउ लाख ८७ हजार, तर यवतमाळ, वाशिम, सोलापूर जिल्ह्यातील बाधित क्षेत्रासाठी ८५ कोटी २४ लाख १३ हजार अशी एकूण ६५५ कोटी ३४ लाखाची मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

यामध्ये अमरावती जिल्ह्यात दोन हेक्टर मर्यादेसाठी चार लाख ९० हजार ९११ शेतक-यांच्या चार लाख ८१ हजार ५०३.६५ हेक्टर क्षेत्रासाठी ४९० कोटी ४२ लाख ५२ हजार आणि दोन ते तीन हेक्टर मर्यादेत ५५ हजार २१२ शेतक-यांच्या ६६ हजार ३७३ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ७९ कोटी ६७ लाख ३५ हजार रु पये वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील ३३ हजार ४८७ शेतक-यांच्या ३८ हजार ९९३.४८ (दोन हेक्टर मर्यादेत) हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३३ कोटी १४ लाख ४६ हजार रु पये वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.वाशिम जिल्ह्यातील ३८ हजार ७३४ शेतक-यांच्या ४२ हजार १८७.५६ (दोन हेक्टर मर्यादेत) हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३६ कोटी ४० लाख ४४ हजार रु पये वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.सोलापूर जिल्ह्यातील १४ हजार ७९८ शेतक-यांच्या १४ हजार ९०७.१५ (दोन हेक्टर मर्यादेत) हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १५ कोटी ६९ लाख २३ हजार रु पये वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## संक्षिप्त

### सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधानांनी एकतेची शपथ घेतली



**एकतानगर, नर्मदा (गुजरात):** सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिन समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे त्यांना आदरांजली वाहिली. केवडिया येथील राष्ट्रीय एकता दिन परेडची पाहणी केली आणि सलामी घेतली. परेडमध्ये देशातील सर्व सुरक्षा संस्थांचे कर्मचारी सहभागी आहेत. परेडपूर्वी पंतप्रधान मोदींनी सुरक्षा दलाच्या कर्मचा-यांना राष्ट्रीय एकता आणि सुरक्षेची शपथ दिली. सरदार पटेल यांच्या १४७ व्या जयंतीनिमित्त एकता दिन समारंभात सहभागी होण्यासाठी पंतप्रधान मोदी आले आहेत.

### कोकाटेंचा अहवाल देण्यास पोलिसांनी मागितली चार दिवसांची मुदत

#### कोकाटे रमी व्हीडीओ प्रकरण


मुंबई : विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु असताना सभागृहात तत्कालीन कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा रमी खेळत असल्याचा कथित व्हीडीओ



व्हायरल झाला होता. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी हा व्हीडीओ समोर आणत सोशल मीडियावर तो व्हायरल केला होता. त्यानंतर कोकाटे यांनी रोहित पवार यांच्याविरोधात नाशिकच्या न्यायालयात अब्रू नुकसानीचा दावा दाखल केला आहे.आमदार रोहित पवार यांना कोकाटे रमी खेळत असतनाचा व्हीडीओ कुठून मिळाला? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. परंतु हा व्हीडीओ कोकाटेंना चांगलाच भोवला त्यांना कृषीमंत्री पद सोडावे लागले. शेतक-यांकडून मोठी टीका झाली. त्यामुळे त्यांनी रोहित पवारांवर थेट अब्रु नुकनानीचा दावा दाखल केला. या दाव्याच्या छाननीनंतर पोलिसांना न्यायालयाने याप्रकरणी तपास करण्यास फ्री हॅण्ड दिले होते. कोर्टाने या प्रकरणाचा सखोल तपास करु न ३० ऑक्टोबरपर्यंत अहवाल सादर करा, असे निर्देश पोलिसांना दिले होते. त्यानुसार पोलिसांनी याप्रकरणाचा तपास सुरु केला होता. याप्रकरणात कोर्टाने जुन्या सीआरपीसी २०२ कलमाप्रमाणे पोलिस चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यानुसार विधीमंडळात कोकाटेंचा व्हीडीओ कोणी काढला याचा तपास केला जाणार होता. मात्र, या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलिस विभागाने चार दिवसांची आणखी मुदत मागितली असून, ती न्यायालयाने मान्य केली आहे. न्यायालयाने आणखी चार दिवसांची मुदत पोलिसांना दिल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान चार दिवसांनी पोलिस या प्रकरणात न्यायालयापुढे नेमका काय अहवाल सादर करतात? पोलिसांच्या हाती नेमकं काय लागलयं? त्यावर न्यायालय काय आदेश देणार याकडे लक्ष लागून आहे.

### जरांगेंच्या आंदोलनाची हवा काढली?

**मुंबई :** मनोज जरांगे पाटील यांनी या २ नोव्हेंबर रोजी अंतरवाली सराटीत



नियोजन बैठक बोलावली होती. त्यात शेतक-यांची कर्जमाफी, नुकसान भरपाईविषयी तज्ज्ञांना बोलावले होते. पण बच्चू कडूंच्या आंदोलनामुळे त्यांनी ही बैठक रद्द केली. ते तातडीने नागपूरला या आंदोलनला पाठिंबा देण्यासाठी पोहचले. त्यांनी तिथे सरकारवर आपला विश्वास नसल्याचे जाहीर केले. त्यांनी हे आंदोलन चिरडण्यासाठी सरकारने डाव टाकल्याचा तिथेच इशाराही दिला. तर आज च्या सरकारच्या आश्वासनानंतर सरकारने शेतक-यांची फसवणूक केल्याची प्रतिक्रिया ही दिली. त्यांनी सरकारवर विश्वास नसल्याचे दाखवले. तर दुसरीकडे अनेक तज्ज्ञ मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला फूस लावण्यासाठीच सरकारने तातडीने आठ महिन्यांचा कालावधी पदरात पाडून घेतल्याचा दावा केला आहे. अनेक जणांना सरकारला सहजासहजी या मुद्यावर माघार घेउ द्यायला नको होती असे वाटत आहे. सरकारने कर्जमाफीविषयी निर्णय घेण्यासाठी एक तारीख जाहीर केली आहे. त्यात मनोज जरांगे हे आता कोणती भूमिका घेतात याकडे अनेकांचे लक्ष लागेल आहे. मनोज जरांगे पाटील हे पुन्हा शेतक-यांसाठी मैदानात उतरतील का, आणि शेतकरीही पुन्हा रस्त्यावर उतरेल का असा प्रश्न विचारण्यात येत आहे.

### समुद्र किना-यावर पुन्हा जेली फिश दिसल्या

**रत्नागिरी :** रत्नागिरीतल्या समुद्र किना-यांवर मोठ्या संख्येने जेली फिश आढळून आले आहेत. वादळी परिस्थिती, खोल समुद्रात सुटलेले वारे, समुद्रातील अंतर्गत



प्रवाहातील बदलामुळे या जेली फिश किनारी भागाकडे फेकल्या गेल्या आहेत. या जेली फिश जांभळ्या रंगाच्या सिंहाच्या आयाळाप्रमाणे असल्याने त्यांना लायन्स मेन असे देखील म्हटले जात आहे. दरम्यान किना-याच्या वाळूत रूतल्याने हजारो जेलीफिशचा मृत्यू झाला आहे. जेली फिश प्रचंड विषारी असतात, त्यांचा अंगाला स्पर्श होताच तीव्र वेदना होते, त्यामुळे या माशांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आलं आहे. साधारणपणे समृद्रात २० ते २५ वाव खोल हे जेली फिश आढळून येतात, ते कधीकधी समुद्राच्या पुष्ठ भागावर देखील तरंगतात. मोठ्या संख्येने जेली फिश समुद्राच्या किना-यावर आल्याने नागरिकांमध्ये दहशतीचं वातावरण निर्माण झाले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील आरे वारे, गणपतीपुळे, माडबन, सागरीनाटे, आंबोळगड, गावखडी, भाट्ये, आरेवारे, मालगुंड या किना-यांवर मोठ्या प्रमाणात जेली फिश आढळून आले आहेत, त्यामुळे नागरिकांना समुद्र किनारी न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### जुने हिशोब चुकते करणार

#### अजित पवार आणि शिंदेंच्या नेत्यांमध्ये जुंपली



**रायगड :** जिल्ह्यातील रोहा शहर पुन्हा एकदा राजकीय वादळाच्या केंद्रस्थानी आले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ खासदार सुनील तटकरे यांच्या बालेकिल्ला मानल्या जाणा-या या मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचा पक्षप्रवेश सोहळा नुकताच पार पडला. या पक्षप्रवेश सोहळ्यात कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. मंचावर उभे राहून आमदार दळवी यांनी तटकरे यांच्यावर जुने हिशोब चुकते करण्याची वेळ आल्याचे जाहीरपणे सांगितले.तटकरे यांचा हा फसवणुकीचा धंदा आहे. त्यांनी प्रत्येक निवडणुकीत गियर बदलला आणि आम्हाला पाठीमागून वार केला. नगरपालिकेचे सर्व रेक?र्ड, निधीचा प्रवाह, खर्चाचा हिशोब, हे सगळं आमच्याकडे आहे. येणा-या नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये आम्ही प्रत्येक आकड्याचा हिशोब जनतेसमोर मांडणार आहोत, असा इशारा देत त्यांनी रोह्यातील आगामी निवडणुकांच्या रणधुमाळीला सुरुवात करून दिली. महेंद्र दळवी यांनी यावेळी लोकसभा निवडणुकीबाबतही स्पष्ट भूमिका मांडली. या वेळी आम्ही सुनील तटकरे यांचे काम कदापि करणार नाही, असे सांगत त्यांनी तटकरे यांच्यासोबतच्या राजकीय नात्याला पूर्णविराम दिला. त्यांनी रोह्याच्या मतदारांना आवाहन करत म्हटले की, मला एक संधी द्या, मी तुमच्यासाठी काम करीन. गेल्या अनेक वर्षांत तटकरे यांनी फक्त स्वतःच्या फायद्याचाच विचार केला, पण रोहा शहर आणि जनतेच्या विकासाकडे दुर्लक्ष केले. त्यांच्या या वक्तव्याने तटकरे विरोधी मतदारांमध्ये उत्साह निर्माण झाला असून रोह्याच्या राजकारणात नव्या समीकरणांना सुरुवात झाल्याचे राजकीय विश्लेषक मानत आहेत. अनिकेत तटकरे यांनी पुढे बोलताना युवा नेतृत्वावर अप्रत्यक्ष टीका करताना म्हटले की, कालची पोरं आज येउन बोलतायत. ज्यांना ना वयाचा इतिहास माहित, ना राजकारणाचा भूगोल, तेही आमच्यावर बोटं ठेवत आहेत.

# निवडणूक आयोगाच्या विरोधात ठाकरे बंधू कोर्टात जाणार?

**मुंबई/प्रतिनिधी :** एकीकडे मतदारयाद्यांतील घोळावर मनसे (ग?च) आणि विरोधी पक्षांकडून मोर्चा काढण्यात येत असून दुसरीकडे कायदेशीर लढा लढण्यासाठीही पावले उचलली जात असल्याचं दिसतंय. निवडणूक आयोगाच्या विरोधात ठाकरे बंधू कोर्टात जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. येत्या दोन दिवसात त्यासंबंधी याचिका दाखल करण्यात येणार असून मतदार यादीमधील दोष पुराव्यासह कोर्टात सादर करणार असल्याची माहिती आहे.मतदार यादीतील घोळासंबंधी विरोधी पक्षाचे नेते कायदे तज्ज्ञांची भेट घेणार असून विविध पर्यायांची चाचपणी करण्यात येणार असल्याची माहिती आहे. विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या बैठकीतही त्यवर चर्चा झाली असून कोर्टात जाण्यासह निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याच्या पर्यायावरही चर्चा झाल्याची माहिती आहे. मोर्चात सहभागी होणा-या पक्षांनी मोर्चाची जोरदार वातावरणनिर्मिती केल्याचं दिसतंय. त्याचाच एक भाग म्हणून राज ठाकरेंनी गुरुवारी मुंबईत मनसे पदाधिका-यांचा मेळावा घेतला. यावेळी त्यांनी निवडणूक आयोग आणि केंद्र तसंच राज्य सरकारवर जोरदार तोफ डागली. हा मोर्चा दणदणीत झाला पाहिजे, असं सांगतानाच आपण स्वतः लोकलनं मोर्चासाठी जाणार असल्याचं ठाकरे म्हणाले.



मतदारयाद्या स्वच्छ केल्यानंतरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या, त्याला आणखी वर्ष लागलं तरी हरकत नाही, असं त्यांचं म्हणणं आहे. दरम्यान, सत्याच्या मोर्चाला कॉंग्रेसकडून मोजक्याच नेत्यांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. महाविकास आघाडी, मनसे आणि इतर विरोधी पक्षाच्या सत्याच्या मोर्चाला कॉंग्रेसकडून बाळासाहेब थोरात आणि विजय वडेट्टीवार हे कॉंग्रेसचे राज्यातील प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही या मोर्चाला उपस्थित राहणार असल्याचं सांगितलं आहे. मतचोरी, मतदार यादीतील घोळ, दुबार मतदार आणि निवडणुकांमधील गैरव्यवहाराच्या विरोधात विरोधक एकवटले आहेत. महाराष्ट्रातील महाविकास आघाडी आणि मनसे येत्या शनिवारी एकत्रितपणे, मुंबईत 'सत्याचा मोर्चा' काढणार आहेत. त्याबाबत वाय बी चव्हाण सेंटर येथे बैठक पार पडली. महत्त्वाची बाब म्हणजे या बैठकीला राज आणि उद्धव ठाकरे उपस्थित होते. नवी मुंबईतील मतदारयाद्यांमधील घोळ मनसेनं गेल्या काही दिवसांपासून चव्हाट्यावर आणल्याचं दिसून येतंय. पामबीच रोडवर २५० मतदारांची नोंदणी करण्यात आल्याचं समोर आलं. मात्र मनसेच्या रियालिटी चेकमध्ये त्यातला एकही मतदार त्या ठिकाणी आढळला नाही.



## इंदिरा गांधी यांच्या स्मृती दिनानिमित्त आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्र्यांचे अभिवादन

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवंगत प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांना त्यांच्या स्मृती दिनानिमित्त आणि भारताचे पहिले उप पंतप्रधान लोहपुरु ष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सार्ध शताब्दी जयंती यानिमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा शासकीय निवासस्थानी त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच भारतीय एकात्मतेसाठी निश्चियपूर्वक धोरण आखून त्यासाठी पावले उचलणा-या सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त आयोजित एकता दिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## देशातील सर्व शाळांत तिसरीपासून 'एआय'

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशातील सर्व शाळांमध्ये तिसरीपासून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि संगणकीय अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. यासाठी डिसेंबर २०२५ पर्यंत अभ्यासक्रमाचे साहित्य, हँडबुक आणि डिजिटल संसाधने तयार केली जाणार आहेत. एआय आणि संगणकीय अभ्यासक्रम शिकवण्यासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षणही दिले जाणार असल्याची माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दिली. राष्ट्रीय शालेय शिक्षण आराखडा २०२३ नुसार अर्थपूर्ण आणि समावेशक



अभ्यासक्रम तयार करण्यासाठी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसह सीबीएसई, एनसीईआरटी, केव्हीएस आणि एनव्हीएससारख्या संस्थांना केंद्रीय शिक्षण मंत्रालय सहकार्य करत आहे.यासाठीचा अभ्यासक्रम सुरू करण्याच्या तयारीसाठी २९ ऑक्टोबर २०२५ रोजी केंद्रीय शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी बैठक घेण्यात आली. यावेळी सीबीएसई, एनसीईआरटी, केव्हीएस, एनव्हीएस आणि इतर तज्ज्ञ उपस्थित होते. दरम्यान, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) एआय आणि सीटी अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी आयआयटी मद्रासचे प्रा. कार्तिक रमण यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञ समिती स्थापन केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि संगणकीय ज्ञान प्रशिक्षणाच्या माध्यमातून हळूहळू सार्वजनिक हितासाठी एआयचा वापर वाढवण्याचा उद्देश या संकल्पनेमागे आहे. शिवाय एआयमधील गुंतागुंतीच्या आव्हानांचे निराकरण करण्यासाठी तसेच एआयच्या नैतिक वापराच्या दिशेने टाकलेले एक नवीन परंतु महत्त्वपूर्ण पाउल आहे. कारण या तंत्रज्ञान प्रशिक्षणाची सुरुवात इयत्ता तिसरीपासून होईल, असे शिक्षण मंत्रालयाने म्हटले.

## जिल्हा व्यवसाय सुधारणेसाठी जिल्हाधिका-यांना जादा अधिकार देण्यात येणार-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यात जिल्हा व्यवसाय सुधारणा कृती योजना २०२५ राबविण्यात येत आहे. १५४ सुधारणांचा समावेश असलेल्या या उपक्रमाची अंमलबजावणी १४ ऑगस्ट २०२६ पर्यंत केली जाणार आहे. यात राज्यातील जिल्हाधिका-यांसाठी चिंतन शिबिर आणि विभागीय बैठकांचे आयोजन करण्यात येणार असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्याधिका-यांना अधिक अधिकार प्रदान करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी इज ऑफ डुईंग बिझनेस संदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस मुख्य सचिव राजेशकुमार तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तर दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्याच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी सहा विभागीय समित्या स्थापन करण्यात आल्या असून, त्या ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी आपले अहवाल सादर करतील. यातील नाशिक विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या नेतृत्वाखाली ईज ऑफ डुईंग बिझनेस सुधारणा समिती कार्यरत आहे, तर विजय सूर्यवंशी (कोकण विभाग) आणि जितेंद्र पापळकर (छत्रपती संभाजीनगर विभाग) अनुक्रमे औद्योगिक संसाधन वापर आणि भू-बँक प्रोत्साहन या विषयांवर लक्ष केंद्रित करत आहेत.बैठकीदरम्यान राज्यातील ईज ऑफ डुईंग बिझनेस प्रगती, अंमलबजावणी केलेल्या सुधारणा तसेच आगामी उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. महाराष्ट्राने ईज ऑफ डुईंग बिझनेस २०२४ मूल्यांकनात लक्षणीय प्रगती साधली असून ४०२ पैकी ३९९ सुधारणा पूर्ण झाल्या आहेत. त्यामुळे राज्याचा अंमलबजावणी स्कोअर ९९.२५ टक्क्यांवर पोहोचला आहे. महाराष्ट्राला यापूर्वी ईज ऑफ डुईंग बिझनेस २०२०-२१ मध्ये अचिव्हर आणि ईओडीबी २०२२ मध्ये टॉप अचिर्व्हर म्हणून गौरविण्यात आले होते. ईज ऑफ डुईंग बिझनेस २०२४ चा अंतिम निकाल ११ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर होणार आहे.ईज ऑफ डुईंग बिझनेस अंतर्गत भूखंड आणि बांधकाम परवाने, कामगार सुधारणा, उपयुक्तता आणि तपासणी प्रणाली तसेच नियामक सुलभीकरण ही प्रमुख लक्ष्यकेंद्रीत क्षेत्रे आहेत. त्याचबरोबर मैत्री २.० द्वारे संपूर्ण एकल-खिडकी परिसंस्था कार्यान्वित करण्याची योजना आहे. त्याचबरोबर सिंगल साइन-ऑन, परवान्यांची स्थिती, सामान्य अर्ज फ?र्म, एकत्रित पेमेंट, डॅशबोर्ड्स, तपासणी, तक्रार निवारण आणि वापरकर्ता अभिप्राय यासारखे आवश्यक मॉड्यूल्स मैत्री २.० मध्ये समाविष्ट असणार आहेत.

## सर्वोच्च न्यायालयाने मोकळा केला मार्ग, 'लागा कामाला'

### नितीन गडकरींचे अधिका-यांना निर्देश

**नागपूर/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर फुटाळा तलावातील फाउंटेन आणि बांधकाम प्रकल्पाच्या कामांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या निर्णयानंतर आता कामांना गती देण्याचे स्पष्ट निर्देश केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी प्रशासनाला दिले आहेत. शुक्रवारी, ३१ ऑक्टोबर रोजी गडकरी यांच्या निवासस्थानी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत त्यांनी संबंधित अधिका-यांना लागा कामाला असा आदेश दिला. या बैठकीला माजी आमदार सुधाकर कोहळे, जिल्हाधिकारी विपिन इटनकर, नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित चौधरी, महाराष्ट्र राज्य



पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे (एमएसआयडीसी) व्यवस्थापकीय संचालक ड?. ब्रिजेश दीक्षित, फाउंटेन प्रकल्पाच्या कलादिग्दर्शक अभिनेत्री रेवती तसेच महामेट्रोचे प्रकल्प संचालक राजीव त्यागी उपस्थित होते.गडकरी यांनी बैठकीत आर्थिक आणि तांत्रिक बाबींचा सखोल आढावा घेत, फाउंटेनचे काम तात्काळ पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले. काम पुन्हा सुरू करताना नव्याने येणा-या खर्चाचा अचूक अंदाज घ्या आणि जर काही दुरुस्ती आवश्यक असेल तर ती तत्काळ पूर्ण करा, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच, आधी बसवलेल्या पण आता खराब झालेल्या केबल्सचा इतर प्रकल्पांमध्ये पुनर्वापर करता येईल का, हेही तपासण्यास सांगितले.

## अकोला येथील शेतक-यांना विमा रकमेचे पैसे मिळाले

**मुंबई/प्रतिनिधी :**अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यात शेतक-यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून खरीप हंगाम २०२४ मध्ये ९.४५ कोटी रूपये नुकसानभरपाई मिळाली आहे. शेतकरी ओळखपत्रानुसार कमीत कमी १००४ रूपये नुकसान भरपाई देण्यातआली. ५ ते २७ रूपये शेतक-यांच्या खात्यावर जमा झाल्याच्या बातम्या काही वृत्तपत्र, वृत्तवाहिन्यावर प्रसारित होत आहेत, त्या वस्तूस्थितीला धरून नसल्याचा खुलासा अकोला जिल्हा अधीक्षक कृषी अधिका-यांनी दिला आहे. अकोट तालुक्यातील कुटासा परिसरातील दिनोडा, मरोडा, कावसा व रेल या गावातील शेतक-यांच्या खात्यात पीक विमा योजनेअंतर्गत नुकसान भरपाई म्हणून शेतक-यांना १००० रूपयांपेक्षा कमी रक्कम दिलेली नाही.

## टीईटीविरोधात 9 नोव्हेंबरपासून राज्यव्यापी आंदोलन

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्या नेतृत्वाखाली राज्यातील सर्व शिक्षक संघटनांनी टीईटी परीक्षा आणि १५ मार्च २०२४ च्या अन्यायकारक शासननिर्णयाविरोधात राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनाचा पहिला आणि मुख्य टप्पा म्हणून ९ नोव्हेंबरला राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर शिक्षकांचा मूक मोर्चा काढण्याचा निर्णय मुंबई येथे झालेल्या सर्व शिक्षक संघटनेच्या राज्यस्तरीय बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मध्यवर्ती संघटनेचे राज्याध्यक्ष केशवराव जाधव होते. बैठकीत २४ नोव्हेंबर २०२५ रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथे होणा-या आंदोलनाला मध्यवर्ती संघटनेचा सक्रिय पाठिंबाही जाहीर करण्यात आला. संघटनेने यापूर्वी ४ ऑक्टोबरला होणारा मूक मोर्चा शिक्षणमंत्री पंकज भोयर यांनी १ ऑक्टोबर रोजी नागपूर बैठकीत दिलेल्या आश्वासनानंतर स्थगित करण्यात आला होता. मात्र, शासनाने अद्याप टीईटी विरोधात सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली नाही व टीईटीसंदर्भात शासनाने शिक्षकांच्या बाजूने कोणतीही भूमिका न घेतल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक संघटनांनी पुन्हा एकत्र येउन ९ नोव्हेंबरला सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर भव्य मूक मोर्चाचे आयोजन केले आहे. .या बैठकीस केशवराव जाधव, प्रसाद पाटील,चिंतामण वेखंडे, प्रसाद म्हात्रे,राजेश सुर्वे, सतीश कांबळे, श्रीकांत टिपूगडे, साजिद अहमद, सुभाष मस्के, शिवाजी इंगळे, अविनाश भोसले, प्रल्हाद बल्लाळ, भरत मडके, सुरेंद्र गायकवाड आदी संघटना प्रतिनिधी उपस्थित होते.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# वेतनवाढीचा नवा अध्याय

केंद्रीय मंत्रिमंडळाने आठव्या वेतन आयोगाला अधिकृत मंजुरी देऊन त्याच्या अटी-शर्ती निश्चित केल्या. या बातमीचा देशभरातील सरकारी कर्मचाऱ्यांना आनंद होणे स्वाभाविक आहे. पुढील १८ महिन्यांमध्ये आयोग शिफारसी सादर करणार असून, या आयोगाचा लाभ ५० लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि ६९ लाख निवृत्ती वेतनधारकांना होणार आहे. यावर्षी जानेवारीत आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेची घोषणा करण्यात आली होती; परंतु त्याची कार्यकक्षा निश्चित करण्यास दहा महिने लागले.बिहारमधील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्राने वेतन आयोगाच्या मंजुरीची घोषणा केल्यामुळे हा राजकीय लाभ घेण्याचा प्रकार आहे, अशी टीका होईल; परंतु देशात कुठे ना कुठे निवडणुका होतच असतात. शिवाय प्रत्येक आयोगाची एक विशिष्ट मुदत असते आणि त्या वेळापत्रकानुसारच त्या त्या वेळी आयोग स्थापन केला जात असतो. केंद्र आणि राज्य शासन या दोन्ही पातळ्यांवर कर्मचाऱ्यांचे वेतन निश्चित करण्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात निर्माण करण्यात आलेली एक प्रशासकीय व्यवस्था अथवा यंत्रणा म्हणजे 'वेतन आयोग'. केंद्रीय वेतन आयोगाचा स्वीकार पुढे विविध राज्य शासनांतर्फेही बहुतांश केला जातो. भारतीय राज्यघटनेत वेतन आयोगासंबंधी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे वा कलमे नाहीत. वेतन आयोग केंद्र शासनाकडे केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसंबंधीच्या शिफारसी करतो.शिफारसींचा अभ्यास करून केंद्र शासन वेतनवाढीबद्दलचा निर्णय जाहीर करते. केंद्रात वेतनवाढ लागू होताच वेगवेगळ्या राज्यांतील शासकीय कर्मचारीही पगारवाढीच्या मागणीसाठी अनेकदा रस्त्यावर उतरतात. अशावेळी केंद्राकडून राज्य कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन आयोगानुसार करण्यात आलेल्या शिफारसी लागू करण्याबाबत राज्यांना सुचवले जाते. आता आठव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनंतर केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात वाढ केली जाईल आणि त्याचा लाभ लाखो केंद्रीय कर्मचारी व निवृत्ती वेतनधारकांना होईल, असे केंद्रीय महिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटले आहे. वेतन आयोग म्हणजे केवळ वेतनरचना नव्हे, तर भत्ते, निवृत्ती वेतन आणि महागाई भत्ता यांचाही आढावा वेतन आयोग घेत असतो. दर दहा वर्षांनी केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाची पुनर्रचना करण्यासाठी नवा आयोग स्थापन केला जातो. २०१६ मध्ये लागू झालेल्या सातव्या वेतन आयोगानंतर गेली काही वर्षे केंद्रीय कर्मचारी वेतनवाढीची मागणी करत होते. सततची भाववाढ त्याचप्रमाणे मुलांच्या शिक्षणावरील तसेच वाहतुकीवरचा खर्च वाढलेला आहे. दैनंदिन खर्चातच एकूण वाढ झाली आहे. आगामी काळात आठवा वेतन आयोग १४ ते १८ टक्के किंवा ३० ते ३४ टक्के वेतनवाढ सुचवेल, असा अंदाज जाणकारांनी व्यक्त केला आहे.मध्यम स्तरांवरील पदावर असलेल्या कर्मचाऱ्यांना किमान १५ हजार ते १९ हजार रुपये प्रतिमहिना वेतनवृद्धी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अर्थात, आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी १ जानेवारी २०२६ पासूनच होऊ शकते. वेतन सुधारण्यासाठी वापरण्यात येणारा 'फिटमेंट फॅक्टर' किती असेल, यावर वेतनात होणारी वाढ अवलंबून असते. हा फॅक्टर १.८३ राहिला, तर प्रभावी वेतनात (इफेक्टिव्ह सॅलरी) १४ टक्के वाढ होऊ शकते. हा फॅक्टर २.१५ असल्यास वेतनात ३४ टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. 'फिटमेंट फॅक्टर' २.४६ असावा, अशी शिफारस झाल्यास वेतनात तब्बल ५४ टक्क्यांची वाढ होऊ शकते, असा अंदाज आहे. 'फिटमेंट फॅक्टर' म्हणजे वेतन आयोगाद्वारे सरकारी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात सुधारणा करण्यासाठी वापरला जाणारा गुणक. सध्याची महागाई आणि इतर घटकांचा विचार करून या गुणकाची निश्चिती केली जाते. कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे सापेक्ष मूल्य राखणे आणि वेतन आयोगाच्या शिफारसी लागू झाल्यावर पगारात योग्य सुधारणा करणे, हा यामागील उद्देश असतो.सातव्या वेतन आयोगाने 'फिटमेंट फॅक्टर' २.५७ असा निश्चित केला होता, हे लक्षात घेतले पाहिजे. याचा अर्थ, आता कर्मचाऱ्यांच्या पगारात घसघशीत वाढ होण्याची शक्यता आहे; मात्र २०२३-२४ पासून केंद्र सरकारचा पेन्शनवरील खर्च पगारापेक्षा जास्त झाला आहे. येत्या केंद्रीय अर्थसंकल्पात पगारावर १.६६ लाख कोटी रुपये, तर पेन्शनवर २.७७ लाख कोटी रुपये खर्च होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. २०२३-२४ पूर्वी पगाराचा खर्च हा पेन्शनपेक्षा खूप जास्त होता. २०२२-२३ आणि २०२३-२४ दरम्यान सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारावरील खर्चात १ लाख कोटी रुपयांची घट झाली. मुळात कर्मचाऱ्यांचीच संख्या कमी होऊन आऊटसोर्सिंग वाढवल्याने हे घडले असावे. पगारावरील ओझे कमी झाले असले, तरी केंद्र शासनाच्या आस्थापनांवरील खर्चात वाढच होत आहे. २०१७-१८ ते २०२५-२६ दरम्यान केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ३२ ते ३७ लाखांच्या दरम्यान राहिली आहे; परंतु पगार खात्यातील वाटप स्थिर राहिले आहे, तर भत्त्यांवरील खर्च २०२३-२४ पासून लक्षणीयरीत्या वाढला आहे. 'पगार खात्या'त आता महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इ. भत्ते समाविष्ट नाहीत, जे २०२३-२४ पासून भत्ते खात्यात (प्रवास खर्च वगळून) समाविष्ट केले गेले आहेत. याचा अर्थ, एकूण शासकीय खर्च कमी झालेला नाही, तर तो वेगवेगळ्या श्रेणींमध्ये पुनर्वर्गीकृत करण्यात आला आहे. आठव्या वेतन आयोगाच्या शिफारसी २०२७ किंवा २०२८ पासून लागू होण्याची शक्यता आहे. सरकार वेतन आयोग लागू करण्यासाठी जितका जास्त वेळ घेईल, तितकेच मूळ वेतनाच्या तुलनेत महागाई व इतर भत्त्यांचे प्रमाण वाढेल. एकीकडे दुष्काळ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी यामुळे शेतकऱ्यांची हलाखी वाढत आहे. सरकारी कामाचा अनुभव लक्षात घेता प्रशासनातील गतिमानता आणि भ्रष्टाचारमुक्त कारभाराच्या सर्वसामान्यांसह सर्वच घटकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत, हे लक्षात घ्यावे लागेल. या पार्श्वभूमीवर, सरकारी कर्मचाऱ्यांना समाजातील इतर वर्गापेक्षा अधिक लाभ मिळत असल्याने या अपेक्षापूर्तीचे आव्हानही आहे. नव्या आयोगासोबत नवी वेतनवाढही मिळणार असल्याने कर्मचारीवर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे.

# इन्फ्रावर वाढता भार, पण आव्हाने कायम

**गेल्या दहा वर्षापासून भारतातर्फे पायाभूत सुविधांच्या विकासासाठी दर वर्षी दहा लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद केली जाते. एकीकडे लोकांना कामे होत असल्याचे दिसत असले, तरी विकसित देशांच्या तुलनेत भारत मागे आहे. २०४७च्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात प्रवेश करताना समोर ठेवलेले उद्दिष्ट गाठायचे असेल, तर पायाभूत सुविधा क्षेत्रांसमोर सध्या असलेल्या आव्हानांवर मात करावी लागेल'**




सार्वजनिक पायाभूत सुविधा आर्थिक विकासाचा कणा आहेत. जगातील प्रमुख अर्थव्यवस्था असलेल्या भारताने गेल्या दशकात पायाभूत सुविधांच्या विकासात लक्षणीय प्रगती केली आहे. भारतातील एकूण पायाभूत सुविधा गुंतवणूक लक्षणीयरीत्या वाढली आहे. त्यात सार्वजनिक आणि खासगी क्षेत्राचे योगदान विकासाच्या गतीला आकार देत आहे. भारताचा एकूण पायाभूत सुविधांचा खर्च वेगाने वाढला आहे. २०२३-२४ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात दहा लाख कोटी रुपयांहून अधिक तरतूद करण्यात आली होती. पंतप्रधान गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन (एनएमपी) रेल्वे आणि रस्ते मार्गासह विविध मंत्रालयांना एकत्र आणण्यासाठी डिझाइन केला आहे. त्यामुळे पायाभूत सुविधा प्रकल्पांचे एकात्मिक नियोजन आणि समन्वित अंमलबजावणी सुनिश्चित होईल. या उपक्रमाचे उद्दिष्ट वाहतुकीच्या विविध पद्धतींमध्ये लोक, वस्तू आणि सेवांच्या हालचालीसाठी अखंड आणि कार्यक्षम कनेक्टिव्हिटी प्रदान करणे, शेवटच्या मैलापर्यंत कनेक्टिव्हिटी वाढवणे आणि प्रवासाचा वेळ कमी करणे हे आहे. या प्रकल्पात ४४ केंद्रीय मंत्रालये आणि ३६ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे आणि ऑक्टोबर २०२४ पर्यंत एकूण १,६१४ डेटा लेयर्स एकत्रित करण्यात आले होते. पंतप्रधान गती शक्ती नियमांचे पालन करणाऱ्या विविध मंत्रालयांकडून १५.३९ लाख कोटी रुपयांच्या २०८ प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्पांचे मूल्यांकन करण्याचे लक्ष्य साध्य करण्यात आले आहे. भारताचा जागतिक बँक 'लॉजिस्टिक्स परफॉर्मन्स इंडेक्स' (एलपीआय) रँकिंग २०१८ मध्ये ४४ वरून २०२३ मध्ये ३८ व्या स्थानावर आला आहे.

### राष्ट्रीय लॉजिस्टिक धोरण

पंतप्रधान गती शक्तीला पूरक म्हणून सप्टेंबर २०२२ मध्ये राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरण सुरू करण्यात आले. आतापर्यंत २६ राज्यांनी त्यांची राज्यस्तरीय लॉजिस्टिक्स धोरणे अधिसूचित केली आहेत. भारतातील महामार्ग आणि रस्ते हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे रस्ते नेटवर्क आहे. त्याची एकूण लांबी एक लाख ४६,१४५ किलोमीटर आहे. भारत सरकारने राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्प (एनएचडीपी), ईशान्येकडील प्रदेशासाठी विशेष जलद रस्ते विकास कार्यक्रम (एसएआरडीपी-एनई) आणि इतर अनेक चालू प्रकल्पांसह भारतमाला परियोजनेसारख्या प्रमुख कार्यक्रमांद्वारे राष्ट्रीय महामार्ग नेटवर्कचा विस्तार आणि बळकटीकरण करण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. भारताचे राष्ट्रीय महामार्ग नेटवर्क २००४ मध्ये ६५ हजार ५६९ किलोमीटरवरून २०१४ मध्ये ९१ हजार २८७ किलोमीटर आणि २०२४ मध्ये एक लाख ४६ हजार १४५ किलोमीटर पर्यंत वाढले. चार किंवा अधिक लेन असलेल्या राष्ट्रीय महामार्ग विभागांची लांबी २०१४ मध्ये १८,३७१ किलोमीटरवरून २०२४ मध्ये २.६ पटीने वाढून ४८,४२२ किलोमीटरपर्यंत पोहोचली. 'ऑपरेशनल हाय-स्पीड कॉरिडॉर' २०१४ मधील ९३ किलोमीटरवरून २०२४ मध्ये २,१३८ किलोमीटरपर्यंत वाढली. राष्ट्रीय महामार्ग बांधकामाचा वेग २०१४-१५ मध्ये १२.१ किलोमीटर प्रतिदिन होता, तो २०२३-२४ मध्ये २.८ पटीने वाढून ३३.८ किलोमीटर प्रतिदिन झाला. भांडवली खर्च (खासगी गुंतवणुकीसह) २०१३-१४ मधील ५३ हजार कोटी रुपयांवरून ५.७ पटीने वाढून २०२३-२४ मध्ये तीन लाख एक हजार कोटी रुपयांवर पोहोचला.

### आर्थिक कॉरिडॉरची कल्पना

२०१७ मध्ये सुरू झालेल्या भारतमाला प्रकल्पात अंदाजे २६ हजार किलोमीटर लांबीच्या आर्थिक कॉरिडॉरचा विकास करण्याची कल्पना आहे. शहरांमधून जाणारी वाहतूक कमी करण्यासाठी आणि लॉजिस्टिक कार्यक्षमता वाढवण्यासाठी बाह्यवळण रस्ते आणि उन्नत कॉरिडॉरचा विकास करण्याची योजना आहे. नोव्हेंबर २०२४ पर्यंत या प्रकल्पांतर्गत एकूण १८,९२६ किलोमीटर रस्ते पूर्ण झाले आहेत. भारतमाला परियोजनेचा भाग म्हणून, ३५ मल्टीमोडल लॉजिस्टिक्स पार्कचे जाळे विकसित करण्याचे नियोजन आहे. त्यातील एकूण गुंतवणूक अंदाजे ४६ हजार कोटी रुपये आहे. ते एकदा कार्यान्वित झाल्यानंतर अंदाजे ७०० दशलक्ष टन मालवाहतूक करण्यास सक्षम असेल. भारत सरकारने २००० मध्ये दारिद्र्य निर्मूलन धोरणाचा भाग म्हणून प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजना सुरू केली होती. २००६-२००७ मध्ये या योजनेंतर्गत एक लाख सात हजार ३७० किलोमीटर रस्ते पूर्ण झाले. त्याचा एकूण खर्च १०,७६९ कोटी रुपये होता. २०१४-१५ मध्ये ४१९, ३५८ किलोमीटर रस्ते पूर्ण झाले. त्यासाठी एकूण एक लाख ३० हजार १४९ कोटी खर्च आला आणि २०२४-२५ मध्ये ७७१,९५० किलोमीटर रस्ते पूर्ण झाले. त्यासाठी तीन लाख ३१ हजार ५८४ कोटी रुपये खर्च आला. वाढत्या मागणीमुळे आणि सरकारच्या सहाय्यक धोरणांद्वारे तसेच विकासाच्या वचनबद्धतेमुळे भारताचे विमान वाहतूक क्षेत्र वेगाने वाढत आहे. या गतिमान परिवर्तनामुळे भारत जागतिक विमान वाहतूक परिसंस्थेत तिसरा मोठा देशांतर्गत विमान वाहतूक बाजार बनला आहे.

२०१४ मध्ये भारतात कार्यरत विमानतळांची संख्या ७४ होती. सप्टेंबर २०२४ पर्यंत ही संख्या १५७ पर्यंत वाढली. भारतात १५ टक्क्यांपेक्षा जास्त वैमानिक महिला आहेत. हे प्रमाण जागतिक सरासरीच्या पाच टक्क्यांपेक्षा जास्त आहे. १७ नोव्हेंबर २०२४ रोजी पहिल्यांदाच एकाच दिवसात पाच लाखांपेक्षा जास्त देशांतर्गत हवाई प्रवाशांची संख्या वाढून एक नवीन विक्रम प्रस्थापित झाला. जून २०१६ मध्ये 'फ्लाइंग ट्रेनिंग ऑर्गनायझेशन' (एफटीओ) ची संख्या २९ होती. डिसेंबर २०२४ पर्यंत ही संख्या ५७ ठिकाणी वाढून ३८ झाली. प्रादेशिक कनेक्टिव्हिटी योजना (आरसीएस), २०१६ मध्ये सुरू करण्यात आलेला 'उडान' पूर्वीच्या वेगळ्या समुदायांना आवश्यक हवाई प्रवास सुविधा प्रदान करण्याचा आणि विद्यमान हवाई पट्ट्या आणि विमानतळांना पुनरुज्जीवित प्रादेशिक आर्थिक विकासाला चालना देण्याचा उद्देश आहे. दहा वर्षांच्या ऑपरेशनल योजनेसह सर्व भारतीयांना विमानप्रवासाची समान सुविधा सुनिश्चित करणे हे 'उडान'चे उद्दिष्ट आहे. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत १४७.५३ लाख प्रवाशांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. उडान योजनेअंतर्गत आतापर्यंत २.९३ लाखांहून अधिक उड्डाणे चालवण्यात आली आहेत. १३ हेलिपोर्ट आणि दोन जल विमानतळांसह ८८ विमानतळांना जोडणाऱ्या ६१९ आरसीएस मार्गांवर ऑपरेशन्स सुरू झाली आहेत.

### जहाज बांधणी उद्योगाची भूमिका

भारतातील सागरी क्षेत्रात बंदरे, जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती आणि अंतर्देशीय जलवाहतूक प्रणालींचा समावेश आहे. भारतात सरकारी मालकीची एकूण बारा प्रमुख बंदरे आणि अंदाजे २१७ लहान आणि मध्यवर्ती बंदरे आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय जहाज बांधणी उद्योगाने भारताच्या अर्थव्यवस्थेच्या सागरी क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. देशाच्या आकारमानाच्या अंदाजे ९५ टक्के आणि मूल्याच्या ७० टक्के व्यापार सागरी वाहतुकीद्वारे केला जातो. २०१४ मध्ये प्रति वर्षी ८००.५ दशलक्ष टन असलेली कार्गो हाताळणी क्षमता २०२४ मध्ये १,६३० दशलक्ष टन झाली. २०१४ च्या तुलनेत ही वाढ ८७ टक्के आहे. २०१४ मधील ४४ व्या स्थानाच्या तुलनेत भारत आंतरराष्ट्रीय शिपमेंट श्रेणीत बाविसाव्या स्थानावर पोहोचला आहे. मोठ्या बंदरांचा टर्नअराउंड टाइम (टीआरआय) २०१३-१४ मधील अंदाजे ९४ तासांवरून २०२३-२४ मध्ये फक्त ४८.०६ तासांवर आला आहे. २०१४-१५ च्या तुलनेत सरासरी जहाज बर्थ आउटपुटमध्ये ५२ टक्क्यांची वाढ झाली आहे. २०१४-१५ च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये समुद्री क्रूझसाठी पर्यटकांची संख्या ३.०८ लाख आणि दीपगृहांसाठी १२.३ लाख झाली आहे. भारतीय रेल्वेने चार नोव्हेंबर २०२४ रोजी एकाच दिवसात तीन कोटींहून अधिक प्रवाशांची वाहतूक करून ऐतिहासिक टप्पा गाठला. या दिवशी, भारतीय रेल्वेने १२०.७२ लाख गैर-उपनगरीय प्रवाशांची वाहतूक केली. यामध्ये १९.४३ लाख आरक्षित प्रवासी आणि १०१.२९ लाख अनारक्षित गैर-उपनगरीय प्रवासी होते. त्याचप्रमाणे, उपनगरीय वाहतुकीने विक्रमी १८० लाख प्रवाशांचा आकडा गाठला. या सर्व प्रगतीनंतरही या क्षेत्रातील आव्हाने कायम आहेत. त्यांचा वेध घ्यायला हवा.

**प्रा. सुखदेव बखळे**

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दी महोत्सव नुकताच पार पडला. त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनेक कार्यकर्त्यांनी महाविद्यालय स्तरावर शाखा स्थापन करण्यासाठी मोहीम राबविली; परंतु त्या मोहिमेला मराठवाड्यातून काही जिल्ह्यात विरोध झाला. काही विद्यार्थी संघटनांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या त्या मोहिमा बंद पाडण्याचा प्रयत्न केला. नांदेडमध्ये भाजपचे खासदार अशोक चव्हाण यांच्या संस्थेतील एका प्रसिद्ध महाविद्यालयासमोर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विद्यार्थी शाखेतर्फे विद्यार्थी संघटना वाढविण्यासाठी टाकलेला तंबू काही तासातच काढावयास लावण्यात आला. हा प्रकार कोणी केला? याचीही वरिष्ठांकडून चौकशी होणे आवश्यक आहे.**

# मराठवाड्यात सौदेबाजीचे प्रदर्शन

छत्रपती संभाजीनगरमध्ये वंचित बहुजन आघाडीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विरुद्ध मोठा मोर्चा काढला. या मोर्चातून विषारी टीका करण्यात आली. जातीपातीचे राजकारण करून फूट पाडण्याचा प्रकार मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या गोष्टीला समाजातील अनेकजण बळी देखील पडत आहेत. ही भविष्यात चिंतेची बाब मानली जात आहे. मराठवाड्यातील हा मोर्चा चर्चेचा विषय ठरला. शासनाविरुद्ध तसेच सत्ताधाऱ्याविरुद्ध जेव्हा-जेव्हा मोर्चा निघतो तेव्हा त्या मोर्चा मागे एक छुपी शक्ती असते. त्या छुप्या शक्तीचा शोध घेणे आवश्यक आहे. एकीकडे बच्चू कडू यांचे आंदोलन शेतकऱ्यांना सोबत घेऊन होत आहे. त्या आंदोलनात देखील मराठवाड्यातील अनेक शेतकऱ्यांचा समावेश आहे. एवढेच नव्हे तर शेतकऱ्यांचे अनेक नेते त्या आंदोलनात सहभागी आहेत. शेतकरी, मराठा विरुद्ध ओबीसी असे आंदोलन उभारून काही राजकीय पक्ष स्वतःची पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

स्वतःच्या शक्तीचे प्रदर्शन करून अनेक नेते शासनासोबत सौदेबाजी करत असतात. हे प्रकार उघडपणे होत नसले तरी मुंबईत गेल्यावर थेट मुख्यमंत्र्यांसोबत चर्चेच्या नावाखाली अशा प्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जातो. नांदेडमध्ये देखील 'आरक्षण टिकविण्यासाठी सत्ता हातात द्या', असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केले. त्यांच्यासमवेत ओबीसीचे लक्ष्मण हाके हे देखील उपस्थित होते. ओबीसींचा एल्गार मोर्चा या नावाखाली नांदेडमध्ये आंदोलन करण्यात आले. ओबीसी, भटके विमुक्त, बलुतेदार तसेच इतर मागासवर्गीय समन्वय समितीच्यावतीने नांदेडमध्ये मोर्चा काढण्यात आला. महाराष्ट्र शासनाने २ सप्टेंबर २०२५ रोजी काढलेला शासनादेश रद्द करावा, या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. मागणी पूर्ण नाही झाली तर नागपूर किंवा मुंबईला मोठे आंदोलन उभारावे



लागेल असे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यावेळी म्हणाले. ओबीसी समाजाला तेलंगणात ६२% आरक्षण लागू आहे. तर महाराष्ट्रात केवळ २७% च का? असा प्रश्न शासनाला विचारा अशी चिथावणीदेखील या आंदोलनातून देण्यात आली. अनेकदा तेलंगणातून रसद पुरवठा केल्यावर मराठवाड्यात आंदोलने होतात, असे दबक्या आवाजात बोलले जाते. यापूर्वीही तेलंगणातील माजी मुख्यमंत्री के. सी. आर यांनी मराठवाड्यात स्वतःचा पक्ष स्थापन केला होता; परंतु नंतर त्यांच्या पक्षाची हवाच निघून गेली. मुळात नांदेडचे असलेले; परंतु तेलंगणात स्थायिक झालेल्या काही मोठ्या व्यापाऱ्यांनी नांदेडला आंदोलनासाठी रसद पुरवठा केल्याचे सांगितले जात आहे. स्वतः आर्थिकदृष्ट्या भक्कम असल्याने केवळ एखाद्या पक्षाला उचकावून देण्याचे काम करण्यासाठी तसेच काही राजकीय पुढारी जवळ आहेत हे दाखविण्यासाठी व्यापारी मंडळींनी स्वतःचे हात मोकळे सोडले आहेत.महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती निवडणुकीत आपली सत्ता यावी या उद्देशातून अनेक राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. लोकांना कशा पद्धतीने जमवायचे जेणेकरून आपल्या मागे मोठा मॉब आहे हे दाखविण्यासाठी शेतकरी, विद्यार्थी तसेच जातीपातीचे राजकारण समोर केले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार या तिघांनी आपापल्या पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी कामाला लागा असा संदेश दिलेला आहे. किंबहुना मराठवाड्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दौरे वाढले आहेत. त्यांच्या दौऱ्यात अनेकजण अजित पवार गटात प्रवेश करीत आहेत. काँग्रेसमध्ये असलेले अनेकजण पक्ष सोडून त्यांच्या मागे जात आहेत, तर राष्ट्रवादीच्या काहींनी काँग्रेसमध्ये प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत प्रवेश केला आहे. नांदेड जिल्ह्यात झालेले हे दोन्हीही नेत्यांचे पक्षप्रवेश सोहळे केवळ सत्तेतील अदलाबदलीसाठी झाल्याचे सांगितले जाते. येत्या महिन्याभरात मराठवाड्यात बऱ्याच उलथापालथी दिसून येतील. सत्ता मिळविण्यासाठी अनेकजण या पक्षातून त्या पक्षात उड्या मारत आहेत. पक्षप्रवेश सोहळे, आंदोलन व शक्तिप्रदर्शन या सर्वामागे स्वतःचे इप्सित साध्य करून घेणे हे एवढेच ध्येय काही पक्षांसमोर राहिले आहे, हे नाकारून चालणार नाही.

**डॉ. अभयकुमार दांडगे**

## भाऊबंदकी नात्यातील वस्तुस्थिती

भाऊबंदकी हा शब्द बऱ्याच दिवसापासून ऐकत होतो. सुरुवातीला चांगल्या अर्थाने वापरतात असं वाटत होते. परंतु ज्या परिवारात वितुस्ट, ताण तणाव आहे त्या संदर्भात वापरतात हे लक्षात आले. सख्खे रक्ताचे नाते असताना तणाव आहे, अशा संदर्भात हा शब्द वापरला जातो. सख्खा रक्ताचे नाते असताना असा अर्थ का घ्यावा म्हणून संपर्कात येणाऱ्या परिवारांचा जवळून परिचय करून घेत असता, असे लक्षात आले की बहुतांश कुटुंबात भावाभावामध्ये ताण तणाव, वीतृष्ठ आहे. त्यामुळे पुढील पिढीमध्येही त्याचे प्रतिबींब उमटताना दिसतात. एकाच रक्ताचे गणगोत आपल्या परंपरेने चालत आलेल्या व्रत, उत्सव, सन, घरातील धार्मिक कार्यक्रम यात एकत्र येत असतात. काही दिवस एकत्र राहतात. बरेचदा लोक लाजेस्तव एकत्र येतात . मनाने नाही,शरीराने एकत्र येतात. हे चित्र बऱ्याच घरी दिसते. पुढली पायरी म्हणजे चुलत भाऊ, चुलत बहिणी, आते बहीणी, आते भाऊ एकत्र येण्याचे प्रमाण फार कमी आहे. एकमेकाकडे मुक्कामी जाणे दुर्मिळच आहे. यात अपवाद फारच कमी आहे. ज्याचे सुमधुर संबध आहेत.याच्या अगदी विरुद्ध अनुभव मामा मावशीकडे जाण्याचं प्रमाण जास्त आहे. हे जाण्याने वरपांगी नसून औपचारिक नसून जिव्हाळ्याचे आहे. त्याचप्रमाणे साठ भाऊ, साळी, साळे, यांच्याकडे जाण्याचे प्रमाण बऱ्यापैकी आहे. नवीन पिढीमध्ये तेच जानवते. मावस भाऊ, मावस बहिणीकडे जाण्याचे प्रमाण अधिक आहे. हे औपचारिक नाही तर जीव्हाळा म्हणून आहे. त्यामुळे त्यांच्या सुना जावई यांचे पण संबंध सुमधुर आहे. जाणे येणे पण अधिक आहे हे खूप चांगली गोष्ट आहे. आवश्यकही आहे यात अपवाद फारच कमी आहे.आर्थिक परिस्थितीतुन भेदभाव होतो काय? हे चित्र बदलायला हवे.

**विलास भास्करवार**
वर्धा मो. ९३७१८९५५ २४

# वणीजवळ काळाने घेतले एकाच कुटुंबातील चार जीव

## घुग्घुस रोडवरील भीषण अपघातात वडील व तीन मुलींचा मृत्यू चार वर्षांची भाची नागपुरात जीवासाठी लढतेय

**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी - वणी शहरातील भीमनगर परिसरात राहणाऱ्या रियाज शेख यांच्या कुटुंबावर काळाने अक्षरशः घाला घातला आहे. शुक्रवारी सकाळी त्यांच्या स्कोडा कारचा ट्रकला झालेल्या भीषण धडकेत वडील आणि तीन मुलींचा जागीच मृत्यू झाला, तर चार वर्षांची भाची सध्या नागपूर येथे मृत्यूशी झुंज देत आहे. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण वणी हादरून गेलं आहे.

ही दुर्घटना शुक्रवारी (दि. ३१ ऑक्टोबर) सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास वणी-घुग्घुस मार्गावरील लालगुडा गावाजवळील ओम नगरी परिसरात घडली. रियाज शेख (वय ५५) हे वणीतील लाल पुलिया परिसरात गॅरेज चालवत होते. सुटीचा दिवस असल्याने त्यांनी आपल्या तीन मुली आणि भावाच्या मुलीला घेऊन कार शिकवण्यासाठी बाहेर पडले होते. रियाज यांच्या स्कोडा कारचा (MH-01-AH-5700) प्रवास काही अंतरातच मृत्यूच्या खाईत गेला. प्राप्त माहितीनुसार, रियाज यांची मोठी मुलगी



लियाबा (वय २०) ही कार चालवीत होती. लालगुडा परिसरातील वळणावर कार अचानक डिव्हायडरवरून घसरली आणि समोरून येणाऱ्या ट्रकला जोरदार धडक बसली. धडकेचा आवाज इतका भीषण होता की परिसरातील लोक घटनास्थळी धावत आले. कारचे पुढील भाग अक्षरशः चेंदामेंदा झाले होते. स्थानिक नागरिकांनी मदतकार्य करत जखमींना बाहेर काढले व त्यांना तातडीने वणी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी रियाज यांची तीन मुली लियाबा (२०), मायरा (१७) आणि अमिरा (१४) यांना मृत घोषित केले. वडील रियाज शेख यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर उपचार सुरू होते, परंतु काही तासांत त्यांनीही प्राण सोडले.

रियाज यांचा भावाची चार वर्षांची मुलगी अत्यवस्थ असून तिला चंद्रपूर मार्गे नागपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या अपघातात एकाच कुटुंबातील चार जीव गेल्याने वणी शहरात शोककळा पसरली आहे. भीमनगर परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून सर्वत्र "एकाच क्षणात संपलेलं संपूर्ण कुटुंब" अशी हळवी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. घटनेची नोंद वणी पोलीस ठाण्यात करण्यात आली असून ठाणेदार गोपाल उंबरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# जि. प. व पं.स. सौरऊर्जा आधारित जलशुद्धीकरण संयंत्र सुविधा



## शाश्वत ऊर्जा विकासासाठी राज्य शासन प्रयत्नशील : पालकमंत्री संजय राठोड

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : जि. प. व पंचायत समित्यांच्या इमारतीत सौरऊर्जा आधारित जलशुद्धीकरण संयंत्र कार्यान्वित झाल्याने ग्रामीण भागातून कार्यालयात येणा-या नागरिकांसाठी शुद्ध पेयजलाची सोय झाली आहे. शाश्वत ऊर्जा विकासासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून, विविध योजना- उपक्रम हाती घेतले आहेत, असे प्रतिपादन राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी आज येथे केले.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेतून सौर उर्जेवर चालणारे जलशुद्धीकरण संयंत्र जिल्हा परिषद मुख्य कार्यालयाबरोबरच १४ पंचायत समितींमध्ये बसविण्याच्या कामाचे लोकार्पण आज पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विधानसभा सदस्य अनिल उर्फ बाळासाहेब मांगुळकर, विधानसभा सदस्य संजय देरकर, जिल्हाधिकारी विकास मीना, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. संतोष धोत्रे, कार्यकारी अभियंता ग्रा.पा. पु. विभाग जि. प. निलेश काळबांडे आदी उपस्थित होते. या कामांमध्ये जि. प. मुख्यालयाबरोबरच दारव्हा, दिग्रस, नेर, घाटंजी, उमरखेड, महागाव, पुसद, बाभूळगाव, कळंब, झरीजामणी, आर्णी, मारेगाव, यवतमाळ, राळेगाव पं. स. आदींचा समावेश आहे. या कामाची एकूण किंमत 13 लक्ष 33 हजार रू. आहे.

पालकमंत्री राठोड म्हणाले की, सौर आधारित जलशुद्धीकरण संयंत्रांमुळे सातत्यपूर्ण स्वच्छ व थंड पाणीपुरवठ्याबरोबरच वीज खर्चात बचत, प्रदुषण मुक्त ऊर्जा, पर्यावरण संवर्धन आदी लाभ मिळणार आहेत. 1 हजार एलपीएच जल शुद्धीकरण संयंत्रामुळे प्रशासकीय कामानिमित्त जिल्ह्यातील ग्रामीण भागातून येणा-या जनतेला लाभ मिळेल. ऑन-ग्रीड प्रणालीमुळे दिवसभर अखंड वीज पुरवठा उपलब्ध राहतो व जलशुद्धीकरण प्रक्रिया अखंड सुरू राहते. सौर ऊर्जेचा वापर केल्यामुळे पारंपरिक वीज खर्चात लक्षणीय घट होऊन शासनाचा आर्थिक भार कमी होणार आहे. निर्माण होणारी अतिरिक्त सौर वीज विद्युत मंडळाला परत देऊन त्यातून महसुली लाभ मिळतो. सोलर ऑन-ग्रिड प्रणालीद्वारे दरमहा अंदाजे 5 हजार ते 7 हजार इतकी वीज बचत होणार आहे. सौर प्रणाली दीर्घकाळ टिकाऊ असून देखभाल खर्च अत्यल्प आहे.

# "आवाज उठवला म्हणून देशद्रोह ?"

## रोहन रामटेके यांना न्याय मिळावा मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - यवतमाळ शहरातील सामाजिक कार्यकर्ते रोहन दिलीप रामटेके यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या देशद्रोहाच्या गुन्ह्याचा निषेध करत आज दिनांक ३१ ऑक्टोबर (शुक्रवार) रोजी यवतमाळ शहरातील नागरिकांनी एकत्र येत जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या मार्फत गृहमंत्री,महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर केले. या निवेदनात रोहन रामटेके यांच्यावर दाखल केलेला देशद्रोहाचा गुन्हा तत्काळ मागे घेण्यात यावा,अशी ठाम मागणी करण्यात आली असून या घटनेविरोधात शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रोहन रामटेके हे गेल्या काही वर्षांपासून यवतमाळ शहर व जिल्ह्यातील रस्त्यांची दुरवस्था,आरोग्य यंत्रणेतील त्रुटी,शिक्षणातील दुर्लक्ष आणि प्रशासनातील उदासीनता या जनजीवनाशी निगडित प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत आहेत.शाळांमध्ये शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेसमोर मोर्चा काढला होता.या घटनेवरील सोशल मीडियावरील त्यांच्या भाष्याला देशद्रोह मानून पोलिसांनी दाखल केलेली कारवाई ही अवास्तव आणि चिंताजनक असल्याचे निवेदनात



नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे ही कारवाई अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारी असल्याचे नागरिकांचे मत आहे. सामाजिक माध्यमांद्वारे लोकांच्या प्रश्नांवर भाष्य करणाऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जारी करावीत. निवेदन सादरीकरणावेळी वातावरण भावनिक झाले होते.यावेळी रोहन रामटेके यांचे वडील दिलीप रामटेके,पत्नी मनीषा रामटेके,बहीण पल्लवी रामटेके, तसेच लहान मुलगा आणि मुलगी उपस्थित होते.कुटुंबियांच्या डोळ्यांत अश्रू होते,तर उपस्थित नागरिकांनी "आवाज दाबला जाणार नाही,न्याय मिळालाच पाहिजे!" अशी भावना व्यक्त केली. या निवेदनावेळी राजमुद्रा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नितीन मिर्झापूरे, शहर काँग्रेस अध्यक्ष प्रा.डॉ.बबलू उर्फ अनिल देशमुख,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवी ढोक, ॲड.जयसिंग चव्हाण,कॉम्रेड सचिन मनवर, शेतकरी आंदोलक प्रा.पंढरी पाठे, संघपाल बारसे,शुभम शेंडे,ॲड.राहुल पाटील,मोबीन शेख,विनोद दोंदल, कपिल लांजेवार,श्याम बजाज,राजू राजगुरे, कृष्णा पुसनाके, निकेश पवार,प्रफुल मुंडलवार, आकाश चमेडिया,ओम कुदळे, अमन राऊत,हेमंत भोयर, गोपाल काकडे, धीरज आडे,सदा शिंदे, पियुष महल्ले, मंगला सोयाम, विद्या परचाके, आदी नागरिक उपस्थित होते. निवेदन देताना उपस्थितांनी भावनिक शब्दांत सांगितले,"हा लढा फक्त रोहन रामटेके यांचा नाही,तर प्रत्येक सामान्य नागरिकाच्या आवाजाचा आहे. भूक,बेरोजगारी,रस्ते,पाणी,आरोग्य या वास्तवावर प्रश्न विचारणे जर देशद्रोह ठरत असेल,तर लोकशाहीचा अर्थच हरवेल. अशा कारवायांनी समाजात भीती नव्हे, तर असंतोष वाढतो." नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडून न्याय आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त रन फॉर युनिटी मॅरेथॉन संपन्न



**जनमाध्यम प्रतिनिधी**

ढाणकी - भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री तसेच भारताचे लोहपुरुष म्हणून उपाधी असलेले सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या ३१ ऑक्टोबर 2025 रोजी जयंती निमित्त पहिल्यांदाच पोलीस स्टेशन बिटरगावच्या वतीने ठाणेदार पांडुरंग शिंदे यांच्या नेतृत्वात रन फॉर युनिटी मॅरेथॉन चे संविधान चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते ठाकरे चौक ढाणकी पर्यंत आयोजित करून सदर मॅरेथॉन मध्ये ढाणकीतील सर्व व्यापारी असोसियन चे पदाधिकारी, शांतता समिती सदस्य, युवा मोहाला समिती सदस्य, पोलीस मीत्र सर्व राजकीय पदाधिकारी पत्रकार बांधव, प्रतिष्ठित नागरिक, योगा गुरुप यांना सहभाग घेण्यासाठी आमंत्रीत करताच पूर्ण ढाणकीकर यांनी संविधान चौक येथे एकत्रित येत या मॅरेथॉन मध्ये दौड घेऊन ढाणकी मध्ये राष्ट्रीय एकता दिनाचा संदेश आणि थीम "एक भारत, श्रेष्ठ भारत" चा संदेश दिला.

# आ. तोडसाम यांनी गरीब विध्यार्थ्यांलाआर्थिक मदत करत दिले माणुसकीचे दर्शन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



आर्णी - शिका,संघटित व्हा, संघर्ष करा,असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असंघटित आणि अशिक्षित समाजाला आवाहन करत शिक्षणाचे महत्व पटवून दिले होते त्याप्रमाणे शिक्षणाचे महत्व ओळखून केळापूर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार प्रा. श्री राजु तोडसाम यांनी कायम गरीब,वंचितआणि शोषित, गरजू लोकांना शिक्षण, व आरोग्यासाठी मदत करत असतात.

त्याचाच प्रत्यय आज जिल्ह्यातील झरी जामणी तालुक्यातील समीर सोयाम नामक गरीब विध्यार्थ्याला आपल्या निवासस्थानी बोलवून उच्च शिक्षणासाठी पन्नास हजार रुपयाची मदत देत माणुसकीचे दर्शन दिले. माणुसकी जपणाऱ्या लोकभिमुक आमदाराने झरी जामणी ता. झरी जि. यवतमाळ येथील समीर नागेश्वर सोयाम या विद्यार्थ्यांला योगिता डेंटल कॉलेज रत्नागिरी येथे BDS चे शिक्षण घेत असतांना आर्थिक अडचण भासत असल्याचे लक्षात येताच आमदार साहेबांनी समीरला 50 हजार रुपये आर्थिक मदत देऊन त्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवला. खरंच शिक्षणाप्रति प्रेम, गांभीर्य आणि प्रामाणिक मदत करण्याची भूमिका प्रा. राजु भाऊ तोडसाम यांच्या मध्ये दिसून येते. आपल्याला अडचणीच्या वेळी फुल नाही तर फुलांची पाखळी म्हणून आमदार साहेबांनी जी आर्थिक मदत केली त्याबद्दल झरी येथील सोयाम परिवाराने आमदार तोडसाम यांचे आभार मानले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर, आम आदमी पार्टीचा निर्धार



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - आम आदमी पार्टीने यवतमाळ जिल्ह्यातील सर्व नगर परिषद, नगर पंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. यवतमाळ शहरातील रस्ते, सांडपाणी, प्रकाशव्यवस्था, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, मोकाट प्राणी त्रास, तसेच नगरपरिषद शाळांची दयनीय अवस्था या स्थानिक प्रश्नांवर पक्ष निवडणूक लढवणार आहे.

जिल्हाध्यक्ष वसंतराव ढोके यांनी सांगितले की, शहराच्या विकासासाठी आणि व्यवस्था परिवर्तनासाठी हा लढा असून, जनतेने वारंवार सत्ता दिली तरीही शहरातील स्थिती बदललेली नाही. भ्रष्टाचार, कमिशनखोरी आणि निष्क्रिय प्रशासनामुळे जनता त्रस्त झाली आहे.

आम आदमी पार्टी पारदर्शक प्रशासन, भ्रष्टाचारमुक्त शासन आणि विकासाभिमुख व्यवस्था उभी करण्यासाठी कटिबद्ध आहे. यवतमाळ नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी पक्षाचे ५० टक्क्यांहून अधिक उमेदवार निश्चित झाले असून, लवकरच यादी जाहीर होणार आहे. पत्रकार परिषदेत गुणवंत इंदूरकर, विलास वाडे, ॲड. मनीष माहुलकर, गोपाल गावंडे, अविनाश धनेवार, प्रशांत देवकते, अशोक कारमोरे, नागेश्वर भुते, सचिन शेळके आणि यश गुल्हाने उपस्थित होते.

# वेचक



## बाभूळगाव पोलीस विभागातर्फे सरदार वल्लभ भाई पटेल जयंती निमित्त जनजागृती यात्रा

बाभुळगाव - भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जयंती निमित्त बाभूळगाव येथे एकता अखंडता संकल्प जनजागृती चे आयोजन येथील बस स्थानकावर दौड आयोजित करून करण्यात आले. यात पोलीस निरीक्षक एल.डी. तावरे, सहायक पोलीस निरीक्षक हेमंत चौधरी, पोलीस उपनिरीक्षक धर्मासिंग उईके, प्रेस क्लबचे अध्यक्ष आरिफ अली, प्रवीण लांजेकर, कल्पक वाईकर, अनिकेत पोहकार, चुडामन मदारे, दिलीप वाघमारे, नरेंद्र बोबडे, सुनील एंडे, सुभाष काशेट्टीवार, मयूर शर्मा, निखिल तातेड, दीपक आसकर, अर्णव अहिरे, सर्व पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील, प्रताप विद्यालयाचे शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी सहभागी झाले होते.

## जिल्हाधिकारी कार्यालयात सरदार वल्लभभाई पटेल व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना अभिवादन



यवतमाळ : देशाचे पहिले गृहमंत्री आणि लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जयंतीनिमित्तआणि देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन कार्यक्रम झाला. जिल्हाधिकारी विकास मीना यांनी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या, तसेच माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. निवासी उपजिल्हाधिकारी अनिरूद्ध बक्षी यांनी, तसेच सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी पुष्प वाहून अभिवादन केले. सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरी करण्यात येते. या निमित्ताने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली. जिल्हाधिकारी कार्यालयातील अनेक अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

## जि.प. प्राथमिक शाळेत शिक्षकाची नियुक्ती करा हो साहेब

पुसद : तालुक्यातील नाईकनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत गेल्या दोन-तीन महिन्यांपासून शिक्षक नसल्यामुळे. शिक्षकाअभावी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे वालतुर तांबडे येथिल ग्रामपंचायतीचे सदस्य वैकुल चंदूसिंग राठोड व काही ग्रामस्थ यांनी यवतमाळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्याकडे दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे. नाईकनगर केंद्र,चोंढी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा ही वर्ग एक ते पाचवीपर्यंत आहे. जवळपास दोन महिन्याअगोदर तत्कालीन मुख्याध्यापक यांची इतर ठिकाणी बदली झाली होती. आज रोजी नाईकनगर येथील जि.प. शाळेत वर्ग एक ते पाच साठी एकच शिक्षक कार्यरत आहे. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व क्रीड़ा दोन्ही क्षेत्रात प्रचंड प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळेला तातडीने शिक्षकाची नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा या निवेदनाची दखल न घेतल्यास आम्हास लोकशाही मार्गाचा अवलंब करावा लागेल असे ही निवेदनात नमूद केले आहे.

## शेख फयाज शेख रहेमत यांचे दुःखद निधन



ढाणकी : शेख फयाज शेख रहेमत (42) पत्रकार रा. ढाणकी यांची दिनांक 31ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास हृदय विकाराने निधन झाले. ते सायंकाळ दैनिक यवतमाळ मार्मिक चे ढाणकी प्रतिनिधी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, वडील, एक मुलगा व दोन मुली असा परिवार आहे.

# उमरखेड एमआयडिसीत सबस्टेशन मंजूर !

## उमरखेड शहरासाठी २७ ट्रान्सफॉर्मरची प्रशासकिय मान्यता ! आ. वानखेडे व भाजपा नेते नितिन भुतडा यांच्या प्रयत्नाला यश

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड : उमरखेड शहराला काहिदिवसा अगोदरच 10 MVA चे दोन रोहित्र मिळाले होते त्यापाठोपाठ आता स्थानिक एमआयडिसी साठी सबस्टेशन मंजूर झाले असून ४ कोटी रुपयाचे शहरात विविध प्रभागात २७ ट्रान्सफार्मरला प्रशासकिय मान्यता मिळाल्याने येत्या काळात उमरखेड शहराची विज समस्या जवळपास निकाली निघण्याची शक्यता असून यासाठी पाठपुरावा करणारे आ वानखेडे व भाजपा नेते नितिन भुतडा यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले आहे.

येथील एमआयडिसी मध्ये बरेचसे उद्योग , लघू कारखाने असून त्यांना विजेअभावी त्रस्त व्हावे लागत होते. अनेक वर्षापासूनची त्यांची मागणी अखेर आ. वानखेडे नितिन भुतडा यांच्या सरकारकडे केलेल्या सतत पाठपुराव्यामुळे सबस्टेशनला मंजूरात मिळाली आहे. या होणाऱ्या सबस्टेशनचा फायदा एमआयडिसी सोबतच परिसरातील शेतकऱ्यांनाही होणार आहे . उमरखेड शहराचा विचार केला तर शहरात अतिरिक्त लोड हा उपलब्ध असलेल्या सध्याच्या तिन ठिकाणच्या स्टेशनवर पडून अनेकवेळा लोड सहन न झाल्याने ट्रान्सफार्मर जळण्याचे प्रकार घडत होते. आता शहरातील सबस्टेशन येथे २ ट्रॉन्सफार्मर,आंबेडकर पुतळा, जामा मस्जिद, पत्तेवार, रहिम नगर कब्रिस्तान, कमेला नगर, चरडे नगर, ताज मस्जिद, शाह कॉलनी , व्दारका नगर , नाग चौक, नाथनगर, फतेमा कॉलनी, बाळू पाटील नगर , बुद्ध विहार , बैल बाजार, भंडारी ऑईल मिल , यादव नगर, रहिम नगर कॉलनी, राम मंदीर, रामकृष्ण कॉलनी , रेणुका नगर, शिवाजी वार्ड, श्रद्धा नगर, संजोग भवन ,जुना कोर्ट एरिया , साई श्रद्धा नगर या २७ ठिकाणावर ट्रान्सफार्मर बसविण्याची प्रशासकिय मान्यता मिळाली आहे . हे २७ ठिकाण संपूर्ण शहरातील वेगवेगळ्या प्रभागातील असल्याने हे ट्रान्सफॉर्मर बसल्यानंतर शहरातील विज समस्येवर निश्चितच मात होणार असल्याने नागरिकांना विजेचा त्रास होणार नाही आहे. विज समस्येबाबत आमदार किसन वानखेडे यांच्या सोबत भाजपा नेते नितिन भुतडा यांनी ऊर्जा राज्य मंत्र्याकडे,पालकमंत्री संजय राठोड व मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे आग्रही भुमिका मांडल्यानेच शहरातील २७ ठिकाणावर ट्रान्सफार्मर बसविण्याची मान्यता मिळाली असल्याने अनेकांनी त्यांचे स्वागत केले आहे.

# महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती अर्ज तात्काळ निकाली काढावेत

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांनी सामाजिक न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर न केल्याने विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित आहेत. या प्रलंबित अर्जांचे तात्काळ निराकरण करण्याचे आवाहन समाजकल्याण अधिकारी श्रीमती मंगला मून यांनी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रदाने यांसारख्या विविध शिष्यवृत्ती योजनांच्या अनुषंगाने महाडीबीटी प्रणालीबाबत मार्गदर्शन व अडचणी सोडविण्याकरिता बैठक घेण्यात आली. यावेळी विविध शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. श्रीमती मून यांनी सांगितले की, अनुसूचित जाती प्रवर्गातील 1,623 शिष्यवृत्ती अर्ज हे महाविद्यालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. संबंधित महाविद्यालयांनी https://mahadbt.maharashtra.gov.in/login/login या संकेतस्थळावर आपले लॉगिन तपासून, शासन निर्णय व निकषानुसार पात्र अर्ज मंजूर करावेत आणि अपात्र अर्ज नाकारावेत, असे त्यांनी निर्देश दिले. सन 2025–26 शैक्षणिक वर्षासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज स्वीकृती 1 जुलै 2025 पासून सुरू झाली असून, 17 जुलै 2025 रोजी सर्व प्राचार्यांची कार्यशाळा घेण्यात आली होती. तरीदेखील आतापर्यंत केवळ 2,700 अर्जांची नोंदणी झाली आहे. मागील वर्षी (2024–25) एकूण 10,632 अर्ज नोंदवले गेले होते, मात्र अजूनही 7,000 विद्यार्थी अर्ज भरण्यापासून वंचित आहेत, असेही त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी एनपीसीआय बँक-आधार लिंक करून ऑनलाईन अर्ज भरावा आणि सर्व आवश्यक कागदपत्रांसह तो महाविद्यालयात सादर करावा, असे आवाहनही करण्यात आले. अर्जासंबंधी कोणत्याही तक्रारींसाठी हेल्पलाईन क्रमांक 022-49150800 वर संपर्क साधण्याचे सूचित करण्यात आले आहे. शासन निर्णय दिनांक 8 जानेवारी 2019 नुसार, प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या अभ्यासक्रमांच्या शिक्षण शुल्क मंजुरीसंबंधी प्रस्ताव संबंधित सक्षम शैक्षणिक विभागाकडे पाठवावा आणि त्याची एक प्रत समाजकल्याण कार्यालयास सादर करावी, जेणेकरून प्रलंबित शुल्क मंजुरीसाठी योग्य पाठपुरावा करता येईल. जिल्ह्यातील कोणताही मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहू नये, त्यासाठी सर्व महाविद्यालयांनी आपापल्या स्तरावर तातडीने कार्यवाही करावी.

# वाई (मेंढी) ते कलगाव रस्त्यांचे काम रखडल्याने ग्रामस्थाचा पुसद सार्वजनिक बांधकाम विभागापुढे ठिय्या आंदोलन !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रातील दिग्रस तालुक्यातील वाई मेंढी ते कलगाव या मुख्य रस्त्याचे काम संबंधित कंत्राटदारास काम मंजूर आहे. तरीही बांधकाम में. चिद्दरवार कंट्रक्शन कंपनी लि. पुसद यांनी मागील बारा महिन्यापासून वेळकाढूपणा करुन रखडत ठेवल्याने हा रस्त्यांचे काम लवकरात लवकर सुरू करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालय समोर ग्रामस्थांनी ठिय्या आंदोलन केले आहे.

यावाबत प्राप्त माहिती अशी की, पुसद सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर कार्यकारी अभियंता तसेच उपविभागीय अभियंता यांच्या समक्ष कंत्राटदाराला बोलावून आज दि.३१ ऑक्टोबर रोजी वाई मेंढी ते कलगाव या मुख्य रस्त्याचे काम तात्काळ सुरू करून कंत्राकदाराला काळ्या यादीत टाकण्यासाठी गावातील ग्रामस्थांकडून ठिय्या आंदोलन करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कंत्राटदाराला वाई मेंढी ते कलगाव या रस्त्याच्या कामासाठी कोटींचा निधी मंजूर झाला आहे. परंतु मागील बारा महिन्या पासून या रस्त्यावर



मोठा गीट्टा( ४० एम एम) अंथरून ठेवून काम सबंधित कंत्राटदराने जाणीवपूर्वक अपूर्ण अवस्थेत ठेवले आहे.त्यामुळे या मार्गावरील गावांच्या ग्रामस्थांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. गावातील ग्रामस्थांना व आजारी असलेल्या वृध्दांना तसेच गर्भवती माता भगिनींना व रुग्णांना या रस्त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी रस्ता खराब असल्यामुळे नाहकत्रास सहन करावा लागत आहे तर एकीकडे खराब रस्त्यामुळे शेतकऱ्यांचा शेतातील ऊसाचे पीक तोडणीला आले असताना कारखानदार तोडणी करण्यास मनाई करत आहे त्यामुळे शेतकरी सुद्धा या अपूर्ण असलेल्या रस्त्यामुळे अडचणीत आला आहे. त्यामुळे या गावातील ग्रामस्थांचे जीवनमान धोक्यात आल्याने तसेच संबंधित कंत्राटदाराने जाणीवपूर्वक हा रस्ता अर्धवट ठेवल्यामुळे या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकून तात्काळ कारवाई करावी तसेच ह्या रखडलेल्या रस्त्याचे काम तात्काळ सुरू करावे याकडे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी वाई मेंढी येथील सरपंच, उपसरपंच यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांच्या उपस्थितीत पुसदच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले आहे. यावेळी पुसद सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता महेश माथुरकर, उपविभागीय अभियंता उमांकात कांबळे, कंत्राटदार जयंत चिद्दरवार यांच्या उपस्थितीत उपविभागीय अभियंता यांनी रस्त्याचे काम पूर्ण होईल, असे लेखी पत्र दिले. त्यानंतर आंदोलन तात्पुरते ग्रामस्थानी स्थगित केले आहे.यावेळी वाई(मेंढी) येथील समस्त ग्रामस्थ सरपंच हरीओम गायमुखे, उपसरपंच शरद परंडे, राहुल राऊत, कालिदास मोरे, सुदाम इंगोले, प्रल्हाद चोपडे, रामेश्वर डवले, बबन इंगोले, गणेश मोरे, नरेंद्र पाईकराव, विश्वनाथ भापले, शंकर डवले, ज्ञानेश्वर वानखेडे, रामराव ढोक, उमेश वाघ, रामकृष्ण पांडे, ज्ञानेश्वर भिसे आदी नागरिक उपस्थित होते.

# राज्यस्तरीय आंध आदिवासी उपवर-वधू परिचय मेळावा उत्साहात संपन्न !



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी पुसद-सांडवा-मांडवा रोडवरील शिवकमल मंगल कार्यालय येथे आदिवासी समाजाच्या एकतेसाठी आणि भावी पिढीच्या उज्वल भविष्यासाठी आयोजित राज्यस्तरीय आंध आदिवासी उपवर-वधू परिचय मेळावा हा कार्यक्रम हजारो आदिवासी बांधवांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण आणि यशस्वीपणे पार पडला.

या मेळाव्यात शेकडो उपवर-वधूंच्या परिचय मेळाव्याला उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माधव वैद्य माजी,से.नी.उपायुक्त समाज कल्याण तर उद्घाटक तुकाराम भिसे मुख्य, लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ, होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सौ.जनाबाई डुडेळे माजी जिल्हाध्यक्ष, नांदेड, भारत टारपे सहाय्यक विक्रीकर आयुक्त, चंद्रपूर, पवन खंदारे शिक्षणाअधिकारी नागपूर, प्रकाश झळके उपअभियंता ग्रामसडक योजना, वाशिम,सूर्यभान बेले सेवानिवृत्त विक्रीकर आयुक्त, वाशिम,रमेश खरोडे गटविकास अधिकारी, प्रा.डॉ.संजय डाखोरे, डॉ. नामदेव सरकुंडे तालुका आरोग्य अधिकारी पुसद,शामराव व्यवहारे आदिवासी सेवक, प्रा. पंडित काळे, प्रा. डॉ.गणेश माघाडे, गणपत गव्हाळे सर, सुरेश धनवे, किरण मिरासे, गायकवाड साहेब, देविदास डाखोरे, गजानन फोपसे इत्यादी मान्यवर मेळाव्यात उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदिवासी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य ट्रेड युनियनचे राज्याध्यक्ष लक्ष्मण टारफे यांनी केले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### विद्यापीठात सरदार वल्लभभाई पटेल जयंती व इंदिरा गांधी पुण्यतिथी कार्यक्रम

**अमरावती -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारताचे प्रथम गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून, तर भारताच्या प्रथम महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी 'राष्ट्रीय संकल्प दिवस' म्हणून झाली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी उपस्थितांना 'राष्ट्रीय एकता दिवस' व 'राष्ट्रीय संकल्प दिवसाची' प्रतिज्ञा देवून सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले तसेच विद्यापीठातील कर्मचारी मोठा संख्येने उपस्थित होते. संचालन तसेच वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्याबद्दल माहिती प्रभारी जनसंपर्क अधिकारी डॉ. धनंजय पाटील यांनी दिली.



### मनपामध्ये इंदिरा गांधी पुण्यतिथी व सरदार वल्लभभाई पटेल जयंती

**अमरावती -**महानगरपालिकेत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी आणि भारताचे लोहमनुष्य सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त हारार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते इंदिरा गांधी आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. हा कार्यक्रम महानगरपालिका कॉन्फरन्स हॉलमध्ये पार पडला.हारार्पण कार्यक्रमानंतर राष्ट्रीय एकता दिनानिमित्त सर्व उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय एकता शपथ घेतली.या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखापरीक्षक श्यामसुंदर देव, मुख्यलेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, उपअभियंता सुहास चव्हाण, प्रधानमंत्री आवास योजनेचे उपअभियंता लक्ष्मण पावडे, उद्यान निरीक्षक श्रीकांत गिरी, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, शिवा फुटाणे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### आकाशवाणी अमरावतीचा 'सर्तकता जनजागृती' उपक्रम

**अमरावती-**चांदुर रेल्वे तालुक्यातील बासलापूर या गावात 'सर्तकता जनजागृती सप्ताहा' च्या निमित्ताने आकाशवाणी अमरावतीच्या पुढाकाराने एका महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात आकाशवाणी अमरावतीचे प्रसारण अधिकारी आशिष गावंडे यांच्या प्रास्ताविकाने झाली. भ्रष्टाचारमुक्त समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने स्वतःपासून बदलाची सुरुवात करणे आणि आपले काम प्रामाणिकपणे करणे किती आवश्यक आहे,प्रत्येकाने आपल्या कामाप्रती निष्ठा राखल्यास भ्रष्टाचाराचे निर्मूलन करणे शक्य आहे. यानंतर कार्यक्रम प्रमुख भैय्यालाल टेकाम यांनी उपस्थित ग्रामस्थांना भ्रष्टाचार रोखण्यासाठी कटिबद्ध राहण्याची सामूहिक शपथ दिली.या प्रसंगी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी सरपंच सुरेंद्र पवार, उपसरपंच मोना खडसे, सदस्य अमोल आखरे, पोलिस पाटील रामेश्वर गोंगे यांनी उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधत भ्रष्टाचारमुक्त व पारदर्शक प्रशासनासाठी सामूहिक जबाबदारीची भावना जोपासण्याचे आवाहन केले. आकाशवाणी अमरावतीने यानिमित्ताने ग्रामस्थांच्या विशेष मुलाखती ध्वनिमुद्रीत केल्या असून, लवकरच त्या 'सर्तकता जनजागृती विशेष कार्यक्रम' म्हणून प्रसारित केल्या जाणार आहेत.या कार्यक्रमाला ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, स्थानिक मान्यवर निलेश खड़से, गजानन बोबड़े, राजू चर्जन, शरद खड़से, जगदीश होले, रमन धवणे, अजय चौधरी, सुधाकर यावले, गणेश गडलिंग, गजानन खेरडे आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्तकता आणि प्रामाणिकतेचा संदेश गावोगावी पोहोचवण्यासाठी आकाशवाणी अमरावतीचा हा उपक्रम एक प्रेरणादायी उदाहरण ठरला आहे.

## दुर्गवाडा येथे स्वच्छता व वृक्षारोपण उपक्रम



**मोर्शी/वार्ताहर**

दुर्गवाडा ग्रामपंचायतच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामस्वच्छता व वृक्षारोपण अभियान उत्साहात पार पडले. वाढत्या वृक्षतोडीमुळे बिघडणारा पर्यावरणीय समतोल लक्षात घेऊन पर्यावरण संवर्धन व नैसर्गिक सौंदर्य जपण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

सरपंच विलास इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत कार्यालयापासून दोन्ही बाजूंनी रस्त्यालगत १७० ग्रीन टरमेरीया शोकेस वृक्ष ट्री गार्डसहित लावण्यात आले. या उपक्रमात लोकसहभाग व श्रमदानचे विशेष योगदान दिसून आले.अंगणवाडीतील चिमुकल्या मुलांसह स्वच्छतेबाबत जनजागृती रॅली काढण्यात आली. त्यानंतर ग्रामस्थांनी श्रमदान करून रस्त्यांची स्वच्छता केली.या अभियानात उपसरपंच अमोल सोलोव, सदस्य पुंजाराम चव्हाण, रोजगार सेवक मंगेश गहरवाल, अंगणवाडी सेविका मनोरमा महल्ले, मदतनीस बबीता कोरे, सीआरपी लता जगताप, बँक सखी ज्योती ढोंगे, आशा वर्कर दीपा कुंबरे, तसेच शारदा भजन मंडळातील सदस्य, माजी सरपंच आशाबाई गहरवाल, आणि सामाजिक प्रबोधनकार पुरुषोत्तम राऊत व सुनील ढोंगे आदींसह मोठ्या संख्येने महिला व पुरुष ग्रामस्थ उपस्थित होते.या उपक्रमामुळे गावात स्वच्छतेबाबत जनजागृती वाढली असून, वृक्षलागवडीमुळे पर्यावरण संवर्धनाचा संदेश सर्वत्र पसरला आहे.


# वीजबिलांच्या ग्राहक नावातील बदल अर्जांना स्वयंचलित मंजूरी

## डिजिटल ग्राहकसेवेत महावितरणचे आणखी एक पाऊल पुढे

**अमरावती/का.प्र.**

दर्जेदार व तत्पर ग्राहकसेवेसाठी महावितरणने वीजबिलांच्या ग्राहक नावातील बदल (र्ण्हि दर्ेस) करण्याच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजूरी देण्यास सुरवात केली आहे. आवश्यक कागदपत्रे अपलोड करून प्रक्रिया शुल्काचा भरणा केल्यानंतर केवळ तीन ते सात दिवसांमध्ये वीजबिलावरील ग्राहक नावामध्ये बदलाची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. यापूर्वी या प्रक्रियेस कृती मानकानुसार एक महिन्याचा कालावधी लागत होता.

राज्याचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांनी वीजग्राहकांना तत्पर व घरबसल्या सेवा देण्यासाठी महावितरणच्या डिजिटल सेवेत ग्राहकाभिमुख बदल करण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी बिलावरील ग्राहक नावात बदल (Change of Name) करण्याच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजूरी देण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी नुकतीच ऑनलाइन प्रणाली विकसित व कार्यान्वित करण्यात आली आहे.खरेदी-विक्री, वारसा हक्क किंवा इतर कारणांमुळे घर किंवा इतर मालमत्तेच्या मालकीमध्ये बदल झाल्यानंतर वीजबिलाच्या ग्राहक नावात बदल करण्यासाठी अर्ज करण्यात येतो. या प्रक्रियेसाठी महावितरण मोबाईल ॲप व ै.र्ंप्मिदस.ग्ह या संकेतस्थळावर वीजग्राहकांना 'लॉग-इन'द्वारे ऑनलाइन अर्ज सादर करणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे व प्रक्रिया शुल्क (ईदमेग्हु इा) भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. ग्राहकांचे अर्ज, छाननी व मंजूरी या प्रक्रियेसाठी मा. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या कृती मानकांप्रमाणे एक महिन्याचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. आता महावितरणकडून या अर्जांना स्वयंचलित मंजूरी मिळत



असल्याने नावात बदल करण्याची कार्यवाही केवळ तीन ते सात दिवसांमध्ये पूर्ण होणार आहे.ग्राहक नावात बदल करण्याचा ऑनलाइन अर्ज व अपलोड केलेल्या कागदपत्रांची संबाधित उपविभाग कार्यालयाकडून तपासणी होईल. त्यात काही त्रुटी आढळल्यास संबंधित ग्राहकांना लगेचच नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे कळविण्यात येईल. सोबतच ग्राहक नावात बदल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याचा संदेशही ग्राहकांना पाठविण्यात येईल. ग्राहक नावात बदल करण्याच्या अर्जांना स्वयंचलित मंजूरी मिळणार असल्याने प्रामुख्याने घरगुती ग्राहकांसह इतर ग्राहकांना महावितरणच्या डिजिटल सेवेचा तत्पर लाभ होणार आहे.

महावितरणने याआधी लघुदाब वर्गवारीतील सर्व औद्योगिक, व्यावसायिक, घरगुती व इतर ग्राहकांच्या १५७ केडब्लूपर्यंत वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित पद्धतीने मंजुरी देण्यास प्रारंभ केला आहे. त्याचा वीजग्राहकांना मोठा लाभ झाला आहे. गेल्या महिन्याभरात २४६० औद्योगिकसह ४ हजार १६४ वीजग्राहकांनी एका क्लिकवर वीज भारामध्ये तब्बल २२ हजार किलोवॅटने वाढ केली आहे. त्यानंतर आता वीजबिलांवरील ग्राहक नावात बदल करण्याची मंजूरी स्वयंचलित केल्याने डिजिटल ग्राहकसेवेत महावितरणने मोठी आघाडी घेतली आहे.

# शहराची प्लास्टिक मुक्ततेकडे वाटचाल



**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिका आणि यंग मार्वल सर्विसेस एलएलपी यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी अमरावती शहरातील प्रमुख व्यापारी केंद्र असलेल्या संत कँवरराम मार्केट परिसरात प्लास्टिक बंदीबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचा उद्देश नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम, पर्यावरणावर होणारा परिणाम आणि प्लास्टिकमुक्त शहराच्या निर्मितीकडे वाटचाल या विषयांबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता.

महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांसह यंग मार्वल सर्विसेस एलएलपीच्या स्वयंसेवकांनी मार्केट परिसरातील प्रत्येक दुकानात भेट देऊन व्यापाऱ्यांशी संवाद साधला. प्लास्टिकमुळे निर्माण होणारा कचरा, नाल्यांमध्ये होणारे अडथळे, प्रदूषणाचा वाढता धोका आणि प्लास्टिक जाळल्यास होणारे विषारी परिणाम या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.या जनजागृती मोहिमेत प्लास्टिकमुळे माती, पाणी आणि हवेवर होणारे परिणाम सांगताना अधिकारी म्हणाले की, 'प्लास्टिक हे विघटन न होणारे पदार्थ असल्यामुळे ते शेकडो वर्षे पर्यावरणात टिकून राहते.

# कर्मचाऱ्यांमुळेच विद्यापीठाचा देशभरात नावलौकीक : कुलगुरू

## विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्याना सन्मानपूर्वक निरोप

**अमरावती/का.प्र.**

कोणतेही कौशल्य प्राप्त करण्याकरीता दिर्घकाळ लागतो व विद्यापीठातील कर्मचारी अथक परिश्रमाने कौशल्यप्राप्ती करुन प्रत्येक कार्य विद्यापीठासाठी निष्ठा, प्रेम आणि समर्पण भावनेने करतात. त्यामुळेच विद्यापीठाचा देशभरात नावलौकीक आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी सामान्य प्रशासन विभागाचे उपकुलसचिव मंगेश वरखेडे, महाविद्यालयीन विभागाच्या सहा. कुलसचिव डॉ. साक्षी ठाकुर, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, सत्कारमूर्ती उमेश लांडगे, श्रध्दा लांडगे, शिला राऊत, श्री. राऊत, प्रभारी जनसंपर्क अधिकारी डॉ. धनंजय पाटील उपस्थित होते.

पुढे बोलतांना कुलगुरू म्हणाले, कर्मचा-यांवरील कामाचा ताण पाहता, तो कसा कमी करता येईल यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत, तव्दतच बाह्ययंत्रणेव्दारे कर्मचा-यांच्या भरतीसाठी प्रयत्न सुरू आहेत व लवकरच ही समस्या सुटेल



असे अश्वासन सुध्दा कुलगुरूंनी यावेळी दिले व सत्कारमूर्तींना भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी उमेश लांडगे, शिला राऊत यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन, सत्कार करण्यात आला.

प्रमुख अतिथी डॉ. प्रवीण रघुवंशी म्हणाले, एकाचवेळी सर्व प्राधिकारणाच्या निवडणुका घेणारे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ महाराष्ट्रात पहिले विद्यापीठ आहे. तसेच कर्मचारी सुध्दा अतिशय निष्ठेने व अचुकपणे आपापली कामे करतात. अविरत कामामुळेच माणसाची ओळख होते असे सांगून त्यांनी दोन्ही सत्कारमूर्तींना भावी आयुष्याकरीता शुभकामना दिल्या. यावेळी सत्कारमूर्ती उमेश लांडगे, शिला राऊत यांनी आपल्या सेवा काळातील अनुभव सांगतांना सहकारी कर्मचा-यांकडून मिळालेल्या प्रेम, स्नेहभावाबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच उपकुलसचिव मंगेश वरखेडे, सहा. कुलसचिव डॉ. साक्षी ठाकुर, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अजय देशमुख यांनीही मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्ज्वल भविष्याच्या व दिर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्यात.विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ.अविनाश असनारे, कोषाध्यक्ष राजेश एडले, संचालक प्रवीण पडोळे यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन प्रभारी जनसंपर्क अधिकारी डॉ. धनंजय पाटील यांनी, तर आभार कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक रमेश जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, माजी कुलसचिव डॉ.तुषार देशमुख, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड यांच्यासह विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

# रन फॉर युनिटी राष्ट्रीय एकात्मता, शिस्त आणि देशभक्तीचा संदेश देणारा उपक्रम-दिनेश दहातोंडे

## नांदगाव पेठ पोलीस स्टेशनतर्फे उत्साहवर्धक आयोजन

**नांदगाव पेठ/वार्ताहर**

'रन फॉर युनिटी ही केवळ एक धावस्पर्धा नाही, तर ती देशातील प्रत्येक नागरिकाला राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि बंधुभावाची जाणीव करून देणारा प्रेरणादायी उपक्रम आहे. सरदार पटेल यांच्या विचारांची ताकद म्हणजे एकता, शिस्त आणि संघटनशक्ती असल्याचे प्रतिपादन नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांनी केले. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त, नांदगाव पेठ पोलीस स्टेशनच्या वतीने 'रन फॉर युनिटी' हा राष्ट्रप्रेम, एकात्मता आणि बंधुत्वाचा संदेश देणारा भव्य उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.




समाजातील विविध घटकांचा सहभाग लाभलेल्या या उपक्रमाने नांदगाव पेठ परिसरात देशभक्तीचा उत्साह जागवला. यावेळी तीन किलोमीटर अंतराची धाव स्पर्धा उत्साहात पार पडली. विविध वयोगटातील नागरिक, विद्यार्थी, खेळाडू, महिला आणि पोलीस कर्मचारी यांनी एकत्रितपणे सहभागी होत समाजात ऐक्याचा आणि शिस्तीचा आदर्श निर्माण केला.या प्रसंगी पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पीएसआय प्रदीप शहाणे, पीएसआय प्रवीण नवलकर यांच्यासह पोलीस कर्मचारी संजय देऊळकर, सुनील सोळंके, वैभव सवाईकर, राजीक खान, राजा खान, विजय आळे, अमित ढोले, शितल चक्रनारायण, सरिता वानखडे, माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार, प्रा. मोरेश्वर इंगळे, राजन देशमुख, मनोज मोरे, सचिन इंगळे, संजय चौधरी आणि मोनू राठोड यांनी संयोजनात सक्रिय सहभाग घेतला. 'रन फॉर युनिटी' मध्ये शालेय विद्यार्थ्यांपासून ते जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांचा सहभाग दिसून आला. अनेक पालक आपल्या मुलांसह धावले, ज्यातून एकतेचा आणि आरोग्यदायी जीवनाचा सुंदर संदेश देण्यात आला. धावपटूंनी देशभक्तीपर गाण्यांच्या तालावर आणि भारतमातेच्या जयघोषात मॅरेथॉन पूर्ण केली.यावेळी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमादरम्यान पोलीस बंधू आणि नागरिक यांच्यातील आपलेपणा, शिस्त आणि परस्पर विश्वासाचे सुंदर दर्शन घडले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी सहभागी धावपटूंना प्रमाणपत्रे प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. काही विद्यार्थ्यांना त्यांच्या सहभागासाठी प्रोत्साहनपर पुरस्कारही देण्यात आले.

# उपमुख्यमंत्र्यांचा अॅड.प्रमोदसिंह गड्रेल यांनी केला सत्कार



**अचलपूर/वार्ताहर**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आज अमरावती दौरा झाला. यावेळी शिवसेना (शिंदे गटाचे) जिल्हाप्रमुख ॲड. ठाकुर प्रमोदसिंह गड्रेल यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ नेते अरुण पडोले, ॲड.ठाकूर श्यामसिंह गड्रेल, विनोद गोखले, नितीन चंदेले आदी जिल्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थितीत होते.

यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हाप्रमुख ॲड. ठाकुर प्रमोदसिंह गड्रेल यांच्यासह उपस्थितीत नेते मंडळी, पदाधिकाराशी सवांद ही साधला आहे. जिल्ह्यात राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रम, आरोग्य शिबिराचे माहिती सुद्धा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ॲड. ठाकुर प्रमोदसिंह गड्रेल यांनी दिली. जिल्ह्यातील नेते मंडळींशी सवांद साधल्याने सामान्य कार्यकर्त्याचा कार्याची दखल घेतल्याने मोठा उत्साह कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाला आहे.

# दी.अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बंद असलेले वीज बिल भरणा केंद्र आजपासून सुरू

## आ.प्रवीण तायडे यांच्या पाठपुराव्याची फलश्रुती, १५ हजार ग्राहकांना मिळाला दिलासा

**अचलपूर (प्रतिनिधी)-** दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अचलपूर शाखेत अचलपूर शहरातील ग्राहक महावितरणचे वीजेचे बिल भरायचे. पण गेल्या दोन महिन्यापासून अचलपूर शहरातील माळवेशपुरा येथील दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सायबर अटॅक चे कारण समोर ठेऊन वीजेचे बिल भरणा केंद्र बंद झाले होते. यामुळे अचलपूर शहरातील जवळपास १५ हजार महावितरण चे ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. यासंदर्भात दैनिक जनमाध्यम मध्ये विविध वृत्त ही प्रकाशित झाले. याची तत्काळ दखल घेत अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र बकाल यांच्या शी याविषयाबाबत चर्चा केली आणि आ.प्रवीण तायडे यांनी केलेल्या पाठपुराव्याची फलश्रुती म्हणून अचलपूर शहरातील दी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत आज पासून विजेचा बंद असलेला विज बील भरणा केंद्र सुरू झाले आहे .एकीकडे गेल्या २ महिन्यात वीज बिल भरणा केंद्र बंद असल्याने बील भरण्यासाठी नागरिकांना परतवाडा महावितरण कार्यालयात जावे लागत होते. यामुळे परतवाडा शहरातील महावितरण कार्यालयात पूर्वीच ग्राहकांची गर्दी असल्याने तासनतास रांगेत उभे



राहण्याची वेळ ग्राहकांवर आली होती . पण यातून मुक्तता होऊन नागरिक आज वीज भरणा केंद्रावर मोठ्या संख्येने बील भरण्यासाठी नागरिक आले होते. नागरिकांना मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे .अचलपूर शहरात जवळपास महावितरण चे १५ हजार ग्राहक आहेत .यात हात मजुरी करून कुटुंबाचे पालनपोषण करणाऱ्या ग्राहकांची संख्या अधिक आहे .एकीकडे महावितरण चे मुख्य कार्यालय परतवाडा शहरात आहे .यामुळे अचलपूर शहर व ग्रामीण भागातील ग्राहक वीज बिल भरण्यासाठी या बँकेत जात असतात. पण सायबर अटॅक चे कारण समोर ठेऊन हा वीज बिल भरणा केंद्र बंद झाल्याने ग्राहक त्रस्त झाले होते .यामुळे ग्राहकांना या वीज बिल भरणा केंद्र आज पासून सुरू झाल्याने मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे.याबाबत नागरिकांनी आ.प्रवीण तायडे यांचे आभार मानले आहे.

मी यासंदर्भात महावितरण चे अभियंता शी संपर्क साधून संपूर्ण माहिती घेतली होती. अचलपूर शहरातील दी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सुरू असलेला वीज बिल भरणा केंद्र पुर्वरत सुरू करण्यातही तत्काळ संबधित अधिकारी यांच्या शी चर्चा केली होती. वीज बिल भरणा केंद्र बंदमुळे ग्राहकांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत होता. या बाबत नागरिकांच्या तक्रारी ही आल्या. तत्काळ संबधित अधिकारी यांच्या शी चर्चा केली होती आणि आज पासून अचलपूर शहरातील दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत वीज बिल भरणा केंद्र सुरू झाले आहे. असे प्रकार पुन्हा होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना राबविण्याचे निर्देश ही दिले आहे.

**-आ.प्रवीण तायडे,** अचलपूर मतदारसंघ.

# 'युरेशियन ब्राईनेक' आणि पक्षी संम्मेलन



**बो**री बाभळीच्या एका पट्टयातून बाहेर पडत नाही तोच राखी तित्तराच्या कतितर, कतितर अशा कर्कश आवाजाने आमचे स्वागत केले. पुढ्यात एके ठिकाणी पाच सहा फुट उंचीचे झाडाचे खोड दिसले. हे पुनर्ररोपण केलेले पिंपळ झाडाचे खोड होते. हा बुंध्याचा खालील भाग असावा जवळपास ७०-८० वर्षाच्या पिंपळ वृक्षाचा. येथे त्या यशस्वीपणे पुनर्ररोपण केलेल्या खोडाला आता कोवळी कोवळी पालवीही फुटू लागली होती. पिंपळाचा जीवन जगण्याचा हा संघर्ष अचंबित करणारा होता. त्या खोडावरील एका अनोळखी पक्ष्याने माझे लक्ष वेधले. कधी तो खोडातील कीडे-किटके शोधून खात होता. तर कधी शांतपणे आभाळाकडे बघत होता. हा पक्षी होता युरेशियन ब्राईनेक, हा पक्षी होता.

अमरावती येथे दि. १ व २ नोव्हेंबर रोजी होणा-या तिस-या अखिल भारतीय आणि ३८ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनानिमित्तष्ठ स्थलांतरीत पक्ष्यांच्या निरीक्षणासाठी भल्या पहाटे अमरावतीच्या छत्री तलावावर माझी पावले पडली. हेमंत ऋतुचा पहिला महिना म्हणजे मार्गशीर्ष थंड आणि गात्रांना शांतविणारे वातावरण. छाया प्रकाशाचे नाट्य आणि त्यातून प्रवीत होणारे रमणीय भ्रांतीजल आणि यात आढळून येणारी पशुपक्ष्यांमधली जीवनाची भीषण ओढ. बोरी-बाभळीच्या झाडांच्या शांत सावलीतून तलावाच्या काठावर पोहोचलो. पाण्याच्या काठावरील चिखलाच्या भागात एका सुंदर रंगाच्या पक्ष्याने लक्ष वेधले. जवळ जावून पाहातो तो तो होता सावळा कमळपक्षी Bronze wing Jacana एक सोडून दोन नर पक्षी होते. गवत आणि चिखलातील किडे-किटके खाण्यात ते गुंग होते. मला मात्र त्याच्या रंगसंगतीने भूरळ पाडली होती. निसर्गाने पक्ष्यांच्या नरांमध्ये किती सुंदरता प्रदान केली आहे ! पाणकोंबडीच्या आकाराच्या या पक्ष्याचे डोके चमकदार काळे, मान आणि छाती, पाठ आणि पंख हिरवट तपकिरी रंगाची होते. तपकिरी लाल रंगाचे आखूड शेपूट. तर डोळ्यापासून ते मानेची मागील बाजू असा एक शुभ्र पांढरा पट्टा जातो. मला तर या सावळा कमळ पक्ष्याने मोहिनी घातली होती. काठाकाठाने पुढ निघालो. सोबतीला पक्षी अभ्यासक श्री सुरेश खांडेकर होते. छत्री तलावात हळदीकुंकू, वारकरी इ. पक्ष्यांची मांदियाळी होती. तलावाच्या मध्यात लालसरी पक्ष्यांच्या लाल रंगामुळे तलावाचा मध्यभाग कसा गुलावी रंगात लालकुंडा सारखा दिसत होता. नानाविध पक्ष्यांच्या नानाविध आवाजाने तलावाला जणू कंठ फुटला होता. आकाशात एखादृया शिकारी पक्षृयाची उपस्थिती देखील तलावातील पाणपक्ष्यांच्या हालचाली लक्ष वेधून घ्यायची. शेकडो पक्षी आपआपला जीव कसा वाचविता येईल या कृतीत



दिसत होते. यात जो पक्षी निष्काळजीपणा करेल त्याला शिकारी पक्षी आपल्या घट्ट पंजात उचलून नेतो. जीवन-मरणाचा संघर्ष क्षणाक्षणाला प्रत्येत पक्ष्याला, प्रत्येक जीवाला करावा लागतो. तलावाच्या काठाकाठाने दूरपर्यंत जावून आलो. शेकाट्या तूतवार, कंठेरी चिखल्या, ब्राम्ही डक, नदी सुरय इ. पक्ष्यांची रेलचेल होती. पक्षी निरीक्षकांसाठी हा तलाव म्हणजे एक पर्वणीच असते. नेहमी प्रमाणे आज मीही त्याचा लाभ घेतला. दोन-तीन तास तलावावर भटकंती झाल्यानंतर परत तलावाच्या उत्तरेकडच्या काठावर आलो. तेथून बोरी बाभळीच्या एका पट्टयातून बाहेर पडत नाही तोच राखी तित्तराच्या कतितर, कतितर अशा कर्कश आवाजाने आमचे स्वागत केले. पुढ्यात एके ठिकाणी पाच सहा फुट उंचीचे झाडाचे खोड दिसले. हे पुनर्ररोपण केलेले पिंपळ झाडाचे खोड होते. हा बुंध्याचा खालील भाग असावा जवळपास ७०-८० वर्षाच्या पिंपळ वृक्षाचा. येथे त्या यशस्वीपणे पुनर्ररोपण केलेल्या खोडाला आता कोवळी कोवळी पालवीही फुटू लागली होती.. पिंपळाचा जीवन जगण्याचा हा संघर्ष अचंबित करणारा होता. त्या खोडावरील एका अनोळखी पक्ष्याने माझे लक्ष वेधले. कधी तो खोडातील कीडे-किटके शोधून खात होता. तर कधी शांतपणे आभाळाकडे बघत होता. युरेशियन ब्राईनेक आकाराने हा पक्षी ब्राम्ही मैनेएवढा असून वरचा भाग हिरव्या भू-या रंगाचा आहे. त्यावर काळ्या रंगाची धार असून चोच




खंजीरासारखी आहे. या पक्ष्याची विशेषत: म्हणजे तो आपले डोके १८० च्या कोनात फिरवू शकतो. सडक्या लाकडातील किडे-किटकं तो खातो. युरोप आणि आशिया भागात समशीतोष्ण भागात यांची विण होते. हे पक्षी हिवाळ्यात आफ्रिका व इराण मूधन भारतात येतात. या पक्ष्याच्या युरेशियन ब्राईनेक आणि रेड-थ्रोटेड ब्राईनेक या दोनच प्रजाती आहेत. हा पक्षी मला प्रथमच दिसल्यामुळे आनंद झाला होता. चैतन्य पसरले होते. त्याची मनसोक्त छायाचित्रेही घेतली. आणि परतीकडे पावले वळली. छायाप्रकाश, स्तब्धता व नाद, खरे व कल्पित बेमालूमपणे एकात एक मिसळून जाते. या चतत्कारिक त्रिवेणी संगमातच मार्गशीर्षाचे रहस्य दडले आहे.

येत्या १ व २ नोव्हेंबर रोजी अमरावती येथे ३ रे अखिल भारतीय व ३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन होत आहे. या पक्षी संमेलनात पक्षी जीवनासंबंधी झालेले नवीन संशोधन आणि पक्ष्यांच्या संरक्षण, संवर्धनासंबंधी होणारे प्रयत्न याविषयी तज्ञांचे सादरीकरण वगैरे वर प्रकाश टाकल्या जाईल. चांगले काम करणा-यांना पुरस्कारही दिले जातील. पक्षिमित्रांच्या भेटीगाठी होतील. दोन दिवसानंतर आपआपल्या घराकडे परततील ते पुढील वर्षीच्या संमेलनात हजेरी लावण्यासाठी. माझ्या मते यापुढील पक्षिमित्र संमेलन केवळ पक्षी या विषयावर न राहाता त्यात जंगल आणि जंगलातील इतर वन्यजीवांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी होणारे प्रयत्न इ. विषयीसुध्दा उहापोह झाला पाहिजे. महाराष्ट्रात ताडोबातील मानव वन्यजीव संघर्ष आता शिगेला पोहचला आहे. अशा विषयावर चर्चा, व्याख्याने झाली पाहिजे. जंगलाच्या जनजागृतीसाठी मनापासून काम करणा-यांचाही यथोचित आदर, सन्मान झाला पाहिजे. कामाचे सादरीकरणही झाले पाहिजे. त्यासाठी या संम्मेलनाचे नाव महाराष्ट्र पक्षी मित्र तथा अरण्यमित्र संम्मेलन असे ठेवावे. नाही तर स्वतंत्र असे महाराष्ट्र अरण्यमित्र संम्मेलन दरवर्षी घेण्यात यावे. कारण जंगल आहे म्हणून पक्षी आहेत. आणि पक्षी आहेत म्हणून जंगल आहे. शेतातील पिकांवर रासायनिक फवारे मारल्याने अनेक पक्षी मारल्या जातात. किंवा प्रजननासाठी त्यांची शारिरिक क्षमता कमी होते. पक्षी कमी झाल्याने शेतातील पिकांवर येणारे कीडे-किटके कोण खाणार? यासाठी कीटकांना आकर्षित करणारे लहान लहान झाडं शेतात विशिष्ट अंतरावर लावल्या गेले पाहिजे. म्हणजे किटके इतर पिकांवर कमी जातील. तसेच दुसरा उपाय म्हणजे पिक काढतांना कमीत कमी १० टक्के पिक तसेच राहू दिले पाहिजे. यामुळे उरलेल्या पिकांवर पक्षी आपले पोट भरतील व त्यांची कुळे वाढतील. पक्ष्यांची संख्या वाढल्याने शेतातील पिकांवरील कीडे-किटके ते संपवून टाकतील आणि नियंत्रण ठेवल्या जाईल. तीन चार दशकांपूर्वी शेतकरी हा यशस्वी प्रयोग करायचे. पक्षी हे शंतक-यांचे मित्र आहेत, याची जनजागृती झाली पाहिजे. अमरावतीच्या ३८ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संम्मेलनाकडून माझी एवढील प्रामाणिक इच्छा आहे. युरशियन ब्राईनेक हा पक्षी मला गेल्या चार दशकांच्या पक्षी निरिक्षणात प्रथमच दिसला असल्याने माझा आनंद व्दिगुणीत झाला होता. त्याची मनसोक्त छायाचित्रेही मिळाली आणि माझी पावले परतीकडे वळली. दुर्गाताई भागवत यांनी सांगितल्या प्रमाणे छायाप्रकाश, स्तब्धता व नाद, खरे व कल्पित बेमालूमपणे एकात एक मिसळून जाते. या चतत्कारिक त्रिवेणी संगमातच मार्गशिर्षाचे रहस्य दडले आहे.

३ ऱ्या अखिल भारतीय आणि ३८ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनास शुभेच्छा.

**प्र.सु.हिरुरकरल**
अमरावती
मो. ९८२२६३९७९८



# निसर्गाचा लहरीपणा

**मा**णसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे. कारण सध्या निसर्गाचा लहरीपणा वाढत चालला आहे. निसर्गाच्या लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पुर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते. निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे.

उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. आताही पहा ना नोव्हेंबर महिना सुरू झाला तरी पावसाने विश्रांती घेतली नाही. नोव्हेंबर महिन्यातही राज्यातील अनेक भागात पाऊस सुरू आहे. आंध्रप्रदेश आणि ओडिशाच्या समुद्र किनाऱ्यावर मोंथा नावाचे चक्रीवादळ धडकले आहे. या चक्रीवादळाने राज्यातच नाही तर देशात मुसळधार पावसाचा अदाज वर्तवला जात आहे. सहा महिने झाले तरी पाऊस थांबायचे नाव घेत नाही. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे ते आता ४० अंशावर गेले आहेत. अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. आता हेच पहा नोव्हेंबर महिन्यात पूर्वी कडाक्याची थंडी पडत असे आता मात्र नोव्हेंबर महिना उजाडूनही थंडीचा साधा लवलेशही नाही. जून मध्ये येणारा पाऊस जुलै संपत आला तरी दडी मारतो आणि आला तर असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो. मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे. अर्थात या बदलत्या हवामानाला आणि निसर्गाच्या लहरीपणास ग्लोबल वॉर्मिंगला जबाबदार धरले जात आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंगची समस्या उदभवते. ग्लोबल वॉर्मिंगची समस्या दिवसेंदिवस वाढत जाईल असा इशारा जागतिक हवामान खात्याने दिला आहे त्यामुळे यापुढे हवामानात बदल हे होतच राहणार आणि त्यामुळे निसर्गाचा लहिरपणा देखील वाढणार आणि तीच चिंतेची बाब आहे अर्थात हवामानातील बदल आणि त्यामुळे होणारी निसर्गाची अवकृपा ही केवळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे होत आहे. निसर्गातील बदलाला जितके ग्लोबल वॉर्मिंग जबाबदार आहेत तितकेच आपण म्हणजे मानव देखील जबाबदार



आहोत. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभारली. बेसुमार वृक्षतोड केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन केले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. निसर्गावर अतिक्रमण करून निसर्गावर अन्याय केला. नदी नाल्यांचा मार्ग बदलला. या सर्व कारणांमुळे पृथ्वीवरील हवामान बदलत आहे. सजीवांना विशेषतः मानवाला जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते. मात्र मानवाच्या चुकांमुळे स्वार्थामुळे हवेत घातक रसायनांचे आणि प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे जंगलाखालील एकूण क्षेत्र २० टक्क्यांपेक्षा खाली आले आहे त्याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. हवामान बदलामुळे निसर्गाचा लहरीपणा वाढला आणि निसर्गाने आपल्यावर अवकृपा करण्यास सुरवात केली. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के नागरिक शेती आणि त्याला पूरक असणारे व्यवसाय करतात. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसत आहे. बदलत्या हवामनमुळे कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यामुळे अनेकांनी शेती करणेच बंद केले आहे तरुण वर्गाने गाव सोडून थेट शहर गाठले आहे. परिणामी गावे ओसाड होत आहे तर शहरांची लोकसंख्या वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर देखील होत आहे. हवामान बदलामुळे श्वसनाचे आणि इतरही आजार वाढत आहे. निसर्गाचा लहरीपणाचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी आणि सजीवांवर देखील होत आहे एकूणच निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवरच होत आहे. निसर्गाची जर अशीच अवकृपा राहिली तर त्याचा परिणाम केवळ आपल्यालाच नाही तर येणाऱ्या पिढीला देखील भोगावा लागेल म्हणून या बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणाऱ्या निसर्गाच्या अवकृपेची मानवाने गंभीर दखल घ्यायला हवी. हवामान बदलामुळे होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन मानवाने आतापासूनच सकारात्मक पावले उचलायला हवीत. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत केवळ आपल्यालाच नाही तर संपुर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# थकीत शेतकऱ्यांना त्वरित नवीन कर्जवाटप करण्याचे आदेश सर्व बँकांना द्यावेत.

**आ**पल्या सरकार ने शेतकयांचा ७/१२ कोरा करण्याचे आश्वासन ३० जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याची घोषणा काल (३०.१०.२०२६) करण्यात आली आहे. महाराष्ट्र सरकारचे व शेतकरी आंदोलनाचे नेतृत्व करणारे माजी मंत्री, बच्चू भाऊ कडू व आंदोलनात सहभागी शेतकऱ्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

यंदा ची परिस्थीती अत्यंत विकट आहे. सुल्तानी संकटा (MSP न मिळण्याचे सोबत यंदा प्रचंड अस्मानी संकट आहे. महाराष्ट्र सरकारने दुष्काळाच्या पार्श्वभुमीवर जाहीर केलेली ३१००० (एकतीस हजार कोटी ची मदत ही, दर्या ये खसखस सारखीच आहे. था वर्षी शेतकयांनी कर्जमाफीच्या आशेने बँकेचे कर्ज भरले नाही, म्हणून बँकांनी त्यांना कर्ज दिले नाही. या थकीत कर्जदारांनी सावकार व कृषी सेवा केंद्रा कडून कर्ज घेऊन या खरीपाची शेती केली.ती अस्मानी संकटाणे पूर्ण नष्ट झाली. विदर्भात मराठवाड्या सारखी अतिवृष्टी नाही तरी उत्पादन नाही, एकरी एक विंटल सोयाबीनचे उत्पादन ही नाही कापसाची तिच स्थीती आहे. बाजारात MSP पण नाही. कर्ज परत कसे करणार?

शेतकयांवर दुहेरी बोझा आहे. बँकेचे थकीत कर्ज व सावकार-कृवी सेवा केंद्राचा बोझा, त्यामुळेच त्यांना आजच दिलासा हवा आहे. हा दिलासा



कर्ममाफीतून मिळाला असता यात शंकाच नाही. परंतू आता आपण ३० जून २०२० पर्यंत ती पुढे ढकलली आहे. या पार्श्वभूमीवर मला आपणास एक विनती कलामची आहे आपण गंभीरपणे विचार करावा -

महाराष्ट्र सरकार ने दुष्काळा सारखी स्थीती आहे हे जाहीर केले आहे. कर्ज वसूली थांबवली आहे. दुष्काळाच्या सर्व नियम लागू करण्याची पण घोषणा या पूर्वीच जाहीर झाली आहे. दुष्काळ जाहीर होतो तेव्हां कर्ज वसूली थांबते ती आपण थाबवलेली आहे. जून्या कर्जाचे हप्ते पाहून नवीन कर्ज देण्यात येते. मला आपणास व सर्व शेतकरी नेत्यांना विनंती करायची आहे. सर्व थकीत कर्जदारांना त्वरित नवीन कर्ज देण्याचे आदेश दिले तर त्यांना आजच प्राणवायू मिळेल जो त्यांना हवा आहे. ३० जून २०१६ पर्यंत आपण (सरकार) त्यांचे कर्ज भरणारच आहे म्हणजेच त्यानंतर त्यांच्यावर फक्त नवीन कर्जाचे बोझा राहील व आपण नेमलेली श्री-परदेशीजी यांची समिती त्यातून मुक्त कसे व्हायचे याचा मार्ग सुचवेल

चांगले पीक चांगले भाव ।
तरच गावात उरणार नाही गरीबीजा वाव ॥

**विजय जावधिया**
शेतकरी संघटना पार्टी

# बिहार विधानसभा निवडणूक २०२५: 'सुशासन' विरुद्ध 'इंडिया'

**बि**हार विधानसभा निवडणूक २०२५ राज्याच्या राजकारणासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. ६ नोव्हेंबर आणि ११ नोव्हेंबर २०२५ रोजी मतदान होणार असून, मतमोजणी १४ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे. ही निवडणूक प्रामुख्याने दोन प्रमुख आघाड्यां भोवती फिरत आहे: पुरोगामी लोकशाही आघाडी (एन डी ए) आणि भारतीय राष्ट्रीय विकास समावेशी आघाडी (इंडिया). या निवडणुकीत बिहारच्या मागील राजकीय इतिहासाचा संदर्भ, वर्तमान नेतृत्वाचे यश-अपयश आणि मतदारांचा बदलता कल महत्त्वाचा ठरणार आहे.

या निवडणुकीतील लढत थेट आणि बहुआयामी असेल. दोन्ही आघाड्यांची रचना आणि त्यांच्या समोरची आव्हाने वेगळी आहेत.पुरोगामी लोकशाही आघाडीत भारतीय जनता पक्ष (भाजप), जनता दल युनायटेड (जेडीयू), आणि लोक जनशक्ती पार्टी (लोजपा) आहेत. एन डी ए ची आघाडी अनुभवी आणि अधिक एकसंध दिसत आहे. मुख्यमंत्री नीतीश कुमार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामाबद्दल सामान्य मतदारांमध्ये असलेले समाधान या आघाडीची प्रमुख ताकद आहे. दोन्ही नेत्यांनी विकासाचा आणि सुशासनाचा मुद्दा प्रभावीपणे मांडला आहे.




नीतीश कुमारांचे 'सुशासन' आणि दारूबंदीचे धोरण, विशेषतः महिला मतदारांमध्ये, एन डी ए ला महत्त्वपूर्ण फायदा मिळवून देत आहे.भारतीय राष्ट्रीय विकास समावेशी आघाडी (इंडिया) आघाडीत राष्ट्रीय जनता दल (आरजेडी), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (काँग्रेस), कम्युनिस्ट पक्ष आणि विकासशील इंसान पार्टी (व्हीआयपी) (मुकेश सहानी यांचा पक्ष). ही आघाडी अनेक अंतर्गत आणि बाह्य आव्हानांना तोंड देत आहे. प्रमुख समस्यांमध्ये जागावाटपावरून असलेले मतभेद, नेतृत्वावरचे प्रश्नचिन्ह आणि आरजेडी च्या सर्वोच्च नेतृत्वाशी संबंधित कायदेशीर अडचणी यांचा समावेश आहे. राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांच्यात जागा वाटपावरून मतभेद झाल्याचे वृत्त आघाडीच्या एकजुटी साठी हानिकारक ठरत आहे.२००५ पूर्वी बिहारमध्ये कायदा व सुव्यवस्थेची स्थिती अत्यंत गंभीर होती, ज्याला राजकीय परिभाषेत 'जंगलराज' म्हणून ओळखले जात होते. या काळात गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराचे प्रमाण अधिक होते. २००५ पासून राज्याचे मुख्यमंत्री झालेले नीतीश कुमार यांनी (मध्ये जीतनराम मांझी यांचा अल्पकाळ वगळता) या 'जंगलराज'ला आळा घालण्यात महत्त्वपूर्ण यश मिळवले. भ्रष्टाचारावर नियंत्रण आणि गुंडगिरी कमी केल्यामुळे त्यांना 'सुशासन बाबू' म्हणून ओळख मिळाली. त्यांच्या काळात सरकारी शाळांचे नूतनीकरण आणि आरोग्य केंद्रांचे पुनरुज्जीवन मोठ्या प्रमाणात झाले. महिला सशक्तीकरण साठी त्यांनी सायकल योजना सुरू केली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, दारूबंदी लागू केली. या दारूबंदीचे ८१टक्के हून अधिक महिलांनी स्वागत केले आहे, जो एन डी ए साठी महिला मतदारांना आकर्षित करणारा सर्वात मोठा आधारस्तंभ आहे. 'इंडिया' आघाडीसमोरील मोठे अडथळे आणि अंतर्गत संघर्षसध्याच्या निवडणुकीत 'इंडिया' आघाडीची अवस्था या निवडणुकीत फारशी चांगली नसल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. याचे मुख्य कारण लालु कुटुंबातील अंतर्गत द्वंद

राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालू प्रसाद यादव यांनी त्यांचे मोठे पुत्र तेज प्रताप यादव यांना पक्षातून बाहेर काढले आहे. यानंतर, तेज प्रताप यादव यांच्या नेतृत्वाखालील जनशक्ती जनता दलाने बिहार निवडणुकीसाठी २१ उमेदवारांची घोषणा केली आहे, ज्यामुळे आरजेडीच्या पारंपरिक मतांमध्ये फूट पडून पक्षासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.जमिनीच्या बदल्यात नोकरी' प्रकरणातून लालू यादव आणि त्यांच्या कुटुंबीयांविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात आरोपपत्र दाखल झाले आहे. या कायदेशीर अडचणींमुळे आरजेडीची प्रतिमा आणि विश्वासार्हता आणखी खालावण्याची शक्यता आहे.निवडणूक आयोग निवडणुकी निष्पक्ष आणि पारदर्शक व्हाव्यात यासाठी मतदार यादी पडताळणी मोहीम राबवत आहे. या महत्त्वपूर्ण मोहिमेच्या विरोधात राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांनी १६ दिवसांची यात्रा काढली होती. या यात्रेत इंडिया आघाडीचे नेते सहभागी झाले होते, मात्र त्यांचा उद्देश केवळ विरोध करणे इतकाच होता. यामुळे 'इंडिया' आघाडीकडे रचनात्मक आणि सकारात्मक अजेंडा नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे.सध्याच्या राजकीय स्थितीनुसार, एन डी ए आघाडी अधिक एकसंध आणि मजबूत दिसत आहे. मतदारांचा कल स्पष्टपणे एन डी ए कडे झुकलेला दिसत आहे, याचे प्रमुख कारण नीतीश कुमारांचे 'सुशासन' आणि दारूबंदी आहे. घोडा मैदान जवळ आहे जनता कोणाला सत्तेवर बसविते ते येणाऱ्या चौदा तारखेस कळेल.

**अविनाश देशपांडे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला जिल्हा विशेष

# मळसूर, माळराजुरा ग्रामपंचायतीत खातेनिहाय चौकशीची मागणी

## तत्कालीन सचिवांवर अपहाराचा गंभीर आरोप

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या मळसूर व माळराजुरा ग्रामपंचायतीत तत्कालीन सचिव जे. एस. मुसळे यांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता व निधी अपहार केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी मळसूर येथील सामाजिक कार्यकर्ते शुभम थिटे यांनी दिनांक २४ ऑक्टोबर रोजी पातुर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीत म्हटले आहे की, तत्कालीन सचिवांनी ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता विविध योजनांतील साहित्याची निविदा किंवा दरपत्रक न मागविता खरेदी दाखविली. खरेदीसंबंधी आवश्यक साठा



पुस्तके, मोजमाप पुस्तके, रॉयल्टी पावत्या, टेस्ट रिपोर्ट, तसेच जीएसटी आणि आयकर भरण्याचे कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत, असेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तसेच ग्रामसभेची मंजुरी न घेता कामे राबविणे, अपंग कल्याण निधीतील पाच टक्के रक्कम न वापरणे, ग्रामपंचायत हद्दीतील जमिनींचे फक्त शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर हस्तांतरण करून महसूल बुडविणे, तसेच अतिक्रमणधारकांना बेकायदेशीर मालकीहक्क नोंदी देणे असे गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आले आहेत. या सर्व अनियमित व्यवहारांचा उल्लेख संबंधित ऑडिट अहवालातदेखील करण्यात आला असल्याचे तक्रारीत स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सचिव जे. एस. मुसळे यांना तात्काळ निलंबित करून अपहार रकमेची वसुली करावी तसेच त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

**ग्रामपंचायत निधीचा गैरकायदेशीर वापर! :** गावाच्या विकासासाठी शासनाकडून ग्रामपंचायतींना लाखो रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येतो. मात्र, या निधीचा गैरकायदेशीर वापर करून उधळपट्टी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून संबंधित तत्कालीन सचिवाविरुद्ध कडक कारवाई व फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# पीक विमा तक्रारींबाबत 'एसएओं'चे स्पष्टीकरण

**अकोला :** अकोला जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम कमी मिळण्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. पीक विम्याची रक्कम कमी मिळाल्याच्या तक्रारींची चौकशी केली असता काही बाबी समोर आल्या आहेत. शेतकऱ्यांना विमा रक्कम वितरित करताना स्थानिक नैसर्गिक आपत्ती, काढणी पश्चात नुकसान व पीक कापणी प्रयोगाच्या आधारे आलेल्या उत्पन्नाच्या आधारावर आदी जोखमीच्या बाबींच्या आधारावर वितरित करण्यात येते. सध्या शेतकऱ्यांना मिळालेली रक्कम पीक कापणी प्रयोगात आलेल्या उत्पन्नाच्या आधारे मिळालेली आहे.

# बार्शिटाकळी नगरपंचायत, बार्शिटाकळी

## निविदा सुचना

नगरपंचायत बार्शिटाकळी सार्वत्रिक निवडणूक-२०२५ करिता लागणारे खालील कामे / साहित्याचा पुरवठा करण्याकरीता इच्छुक नोंदणीकृत/अनुभवी कंत्राटदाराकडून/पुरवठा धारकाकडून व्दिलिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदेतील कामांचा कालावधी हा नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक- २०२५ प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत असेल. कोरे निविदा फॉर्म दरपत्रक दिनांक ३१/१०/२०२५ ते दिनांक- ०३/११/२०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत सबंधीत विभागाकडून प्राप्त करता येईल. तरी इच्छुकांनी आपली सिलबंद निविदा दिनांक- ०४/११/२०२५ ला दुपारी ०३:०० वाजेपर्यंत नगरपंचायत कार्यालयात सादर करावी.

| अ. क्र. | कामाचे/ साहित्याचे नाव | अनामत रक्कम | निविदा फार्म किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | निवडणूकीकरीता मंडप डेकोरेशन व लाऊड स्पिकरद्वारे जाहीरात कार्यक्रमप्रसंगी बिछायत व लाऊड स्पिकर व्यवस्थेकरीता साहित्याचे किराया दर सादर करणे. | १०००/- | ५००/- | निवडणूक संपेपर्यंत |
| २ | कार्यालयीन कामाचेप्रसंगी व निवडणुकीमध्ये जेवण, नाश्ता, चहा, पाणी बॉटल पुरविण्याकरीता दर सादर करणे. | १०००/- | ५००/- | निवडणूक संपेपर्यंत |
| ३ | कार्यालयीन कामाचे प्रसंगी व निवडणुकीमध्ये व्हीडीओ चित्रीकरण करण्याकरिता व्यक्तीसह किराया दर सादर करणे. | १०००/- | ५००/- | निवडणूक संपेपर्यंत |
| ४ | निवडणूकीकरिता लागणारे स्टेशनरी साहित्य चा पुरवठा करणे. | १०००/- | ५००/- | निवडणूक संपेपर्यंत |
| ५ | निवडणूकीकरीता लागणारे छापील साहित्य पुरवठा करणे. | १०००/- | ५००/- | निवडणूक संपेपर्यंत |
| ६ | निवडणुकीकरिता लागणाऱ्या झेरॉक्स प्रतीचा पुरवठा करणे. | १०००/- | ५००/- | निवडणूक संपेपर्यंत |
| ७ | सी.सी.टी.व्ही. कॅमेरे पुरविणे. | १०००/- | ५००/- | निवडणूक संपेपर्यंत |
| ८ | निवडणुकीकरिता चारचाकी वाहने पुरवठा करणे. | १०००/- | ५००/- | निवडणूक संपेपर्यंत |
| ९ | संगणक खरेदी दुरुस्ती व तत्सम साहित्य पुरवठा करणे. | १०००/- | ५००/- | निवडणूक संपेपर्यंत |
| १० | इनव्हर्टर पुरवठा व दुरूस्ती देखभाल करणे. | १०००/- | ५००/- | निवडणूक संपेपर्यंत |

**अटी व शर्ती: -**

१) प्रत्येक कामाकरीता वेगवेगळे निविदा फार्म खरेदी करावे लागतील, व लिफाप्यावर अनामत रकमेचा संदर्भ व पावती क्रमांक स्पष्ट स्वरुपात नमुद करावा.

२) निविदेसोबत भरावयाची अनामत रक्कम रोख स्वरुपात न.पं. फंडात भरावी लागेल.

३) निविदेसोबत आवश्यक ते कागदपत्र (जसे GST. Pan Card/ इनकम टैक्स बाबत सोबत जोडावे.

४) निविदा द्विलिफाफा पध्दतीने सादर करावी.

८) निविदेमधील ईतर अटी व शर्ती नगरपंचायत बार्शिटाकळी कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

७) एक किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अधिकार न.पं. ने राखून ठेवले आहेत.

**अर्ज उपलब्ध व विक्री दिनांक वेळ :-** दिनांक ०९/११/२०२५ ते दिनांक ०७/११/२०२५ (कार्यालयीन वेळेत)

**निविदा भरण्याची दिनांक व वेळ:-** दिनांक ०१/११/२०२५ ते दिनांक ०७/११/२०२५ दुपारी ३:०० वा. पर्यंत


**निविदा दाखल करण्याचे ठिकाण :-** नगरपंचायत बार्शिटाकळी.

**(राहुल कंकाळ)**
मुख्याधिकारी
नगरपंचायत, बार्शिटाकळी

जा.क्र.न.प.बा./निवडणूक-२०२५/ निविदा जाहीर सुचना/ २०२५/२७०१, दिनांक ३१/१०/२०२५

# आलेगाव परिसरातील घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते रखडले

## पातूर प.स. कार्यालयावर ४ नोव्हेंबरला भव्य मोर्चा




■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत आलेगाव परिसरातील घरकुल योजने अंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांचे पहिला, दुसरा, तिसरा आदी हप्ते न मिळाल्याने मालेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्या नेतृत्वात पतुर पंचायत समिती कार्यालयावर ४ नोव्हेंबर रोजी भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. हप्ते रखडल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी असून प्रशासनाच्या विरोधात तीव्र असंतोष व्यक्त केला जात आहे. संबंधित विभागाकडून वारंवार मागणी करूनही हप्ते न मिळाल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या गरीब लाभार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे.

या योजनेत दलाली व आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप लाभार्थ्यांकडून करण्यात येत असून, काही दलाल पैसे घेतल्याशिवाय हफ्ते मंजूर करून देत असल्याचे म्हटले जात आहे. संबंधित अधिकारी व दलालांच्या संगनमताने हप्ते मंजूर केल्याचा आरोप लाभार्थ्यांनी केला असून, अशा दलालीतून शोषण थांबविण्याची मागणी जोर धरत आहे.

या वाढत्या अन्यायाचा निषेध करण्यासाठी व तात्काळ हप्ते मिळावेत यासाठी ४ नोव्हेंबर रोजी पातूर पंचायत समिती कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा सकाळी ११ वाजता काढण्यात येणार असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांनी केले आहे.

# २७ व्या राज्यस्तरीय वधु-वर परिचय संमेलनाचे आयोजन

**अकोला :** गत २६ वर्षांपासून सामजिक सेवेत सक्रिय असणाऱ्या अकोला जिल्हा देशमुख समाज सेवा मंडळाच्या वतीने महानगरात देशमुख मराठा समाजाच्या २७ व्या राज्यस्तरीय वधु वर, पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. समाज मंडळाच्या या माध्यमातून लग्नाचे योग जुळून यावेत यासाठी वर वधूंची इत्यंभूत माहिती असणाऱ्या शुभम-भवतु या परिचय पुस्तिकेचे प्रकाशन ही या संमेलनात करण्यात येणार आहे.यात राज्यातीलच नव्हे तर इतर राज्यातील समाजाच्या उपवर युवक युवतींची माहिती असते.या माध्यमातून अनेक योग जुळून येत असतात. या पुस्तिकेत समाजातील उपवर समवेत समाजातील विधवा ,विधुर ,घटस्फोटित आदींचाही समावेश करण्यात येत असतो.त्यांचे ही या माध्यमातून योग जुळून येत असतात.

# पवन ऊर्जा क्षेत्राच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत महावितरणला 'विंड इंडिया- २०२५' पुरस्कार

**अकोला :** केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांशी सुसंगत राहून महावितरणकडून अक्षय ऊर्जेला प्राधान्य देण्यात येत आहे. सन २०३० पर्यंतच्या दीर्घकालीन वीज खरेदी करारात पवन-सौर संकरित ऊर्जेचाही समावेश करण्यात आला आहे. त्याची दखल घेऊन भारतातील पवन ऊर्जा क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इंडियन विंड टर्बाइन मॅन्यूफॅक्चरर्स असोसिएशनच्या (घेंऊर्ई) चेन्नई येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत गुरुवारी (दि. ३०) केंद्रीय नवीन व नवीकरणीय मंत्री मा. श्री. प्रल्हाद जोशी यांच्याहस्ते महावितरणला 'विंड इंडिया-२०२५' पुरस्काराने गौरविण्यात आले.

मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात अपर मुख्य सचिव (ऊर्जा) सौ. आभा शुक्ला यांनी राज्याच्या वीज क्षेत्रासाठी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. या नियोजनाद्वारे प्रामुख्याने सौर ऊर्जेसह पवन-सौर हायब्रीड, अशा विविध अक्षय स्त्रोतांपासून वीज निर्मितीला प्रोत्साहन मिळाले आहे.

## Change In Name

I Have Change My Name in My HUSBAND Passport No is - (N7933474) From **MADHAVI INNANI** --TO-- **MADHAVI SUNIL INNANI** My Residential Address is :- "Madhuram" Near Nishu Nursery Convent Vidhya Nagar Gaurakshan Road Akola 444004.

## Change In Name

I Have Change My Name in my Leaving Certificate NameFrom **SYED SABIR SYED WAZEER** --TO-- **SYED SABIR SYED NAZEER** My Residential Address is :- Near Railway Station Borgaon Manju Post Borgaon Manju Akola 444102.

## Change In Name

I Have Change My Name in My Passport No is - (N7933474) From- **SUNILKUMAR MANIKLAL INNANI** --TO-- **SUNIL MANIKLAL INNANI** My Residential Address is :- "Madhuram" Near Nishu Nursery Convent Vidhya Nagar Gaurakshan Road Akola 444004.

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९७५/२०२५ — प्रोसेस नं. १८०४७/२०२५
चौ.ता. ०४/१२/२०२५ — दिनांक : ३०/१०/२०२५

**अर्जदार :** १. अमोल श्रीकृष्ण मेश्राम रा. पंचशील नगर, खरप रोड, अकोला, ता. जि. अकोला. २. विनोद श्रीकृष्ण मेश्राम रा. सिव्हिल लाईन चौक, अकोला. ता. जि. अकोला. ३. चरित्रा दिलीप तिरपुडे लग्नाअगोदरचे नाव चरित्रा श्रीकृष्ण मेश्राम रा. कृषि नगर, लेबर कॉलनी, बुद्ध विहाराजवळ, अकोला. ता. जि. अकोला. ४. अर्चना राजदिप डोंगरे लग्नाअगोदरचे नाव अर्चना श्रीकृष्ण मेश्राम रा. फेजरपुरा, भिमगेट मंडळ अमरावती ता. जि. अमरावती. ५. अश्विनी शंकर वासनिक लग्नाअगोदरचे नाव अश्विनी श्रीकृष्ण मेश्राम रा. साईनगर, अकोली अमरावती, ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्रीकृष्ण महादेव मेश्राम
**पत्ता :-** रा. पंचशील नगर, खरप रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीकृष्ण महादेव मेश्राम यांचे दि. ०९/०९/२०२५ रोजी पंचशील नगर, खरप रोड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर प्रसिध्दी

दिनांक :- ३१/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, अकोट तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी अकोट तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामेचही करतात अशा व्यक्तींनी अकोट तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी ( इसमांनी ) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय मु.पो.मुंडगाव ता. अकोट जि. अकोला येथे दिनांक १५/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे ही विनंती.

**( राहुल गोविंदराव देशमुख)**

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९२७/२०२५ — प्रोसेस नं. १७५७६/२०२५
चौ.ता. २९/११/२०२५ — दिनांक : १८/१०/२०२५

**अर्जदार :** १. नजमुन्निसा सय्यद नजीर हुसेन २. सय्यद सज्जाद अहमद हुसेन सय्यद नझिर हुसेन ३. अजुमंद फातिमा झुबेर खान रा. लहरिया कंपाउंड, मुझफ्फर नगर, अकोला. ता. जि. अकोला. ४. ताझिना आयेशा आरिफ खान रा. मिलन नगर, वार्ड नं. १, १२ नं. शाळेच्या मागे, नायगाव, अकोला. ता. जि. अकोला. ५. नावेद हाजरा मोहम्मद अतिक रा. सौदागर पुरा, वाशिम ता. जि. वाशिम अर्जदार क. १ व २ रा. अहाले हाडिस मस्जिद जवळ, सैलानी नगर, खैरमोहम्मद प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सय्यद नजीर हुसैन सय्यद मुसा
**पत्ता :-** रा.अहाले हाडिस मस्जिद जवळ, हबिब नगर, डाबकी रोड, खैर मोहम्मद प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सय्यद नजीर हुसैन सय्यद मुसा यांचे दि. १५/०२/२०११ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# महाराष्ट्र शासन
# अकोला वनविभाग अकोला
## वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे) बार्शिटाकळी मु.धाबा
## ईमेल - rfobarshitakil1@gmail.com.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाकडील उचित वर्गवारीत नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन १ नमुन्यातील खालील कामाकरिता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सुचना परिक्षेत्र कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याच्या अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे) बार्शिटाकळी मु.धाबा यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे) बाशिटाकळी मु.धाबा कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

खालील कामा विषयी या कार्यालयाचे जा.क्र./वपअ/निवीदा. ४/६७०/२०२५-२६/ मु.धाबा/दि. ३१/१०/२०२५

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा/ बयाना रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याच्या कालावधी | निविदा संघाची किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | परांडा येथे गॅबियन बंधारे बांधणे बंधारा क्र.०१-१३ कक्ष क्र.३९१ | 990547.00 | 9905/- | २ महिने | 500/- |
| २ | साखरविरा गॅबियन बंधारे बांधणे बंधारा क्र.०१-१३ कक्ष क्र. १२७ | 935592.00 | 9355/- | २ महिने | 500/- |
| ३ | देवदरी - २ गॅबियन बंधारे बांधणे बंधारा क्र.०१-१३ कक्ष क्र. १२९ | 934738.00 | 9347/- | २ महिने | 500/- |
| ४ | धानोरा येथे गॅबियन बंधारे बांधणे बंधारा क्र. ०१-१४ कक्ष क्र. १२५ | 935023.00 | 9350/- | २ महिने | 500/- |
| ५ | धानोरा येथे गॅबियन बंधारे बांधणे बंधारा क्र.०१-१३ कक्ष क्र. १२६ | 935165.00 | 9351/- | २ महिने | 500/- |
| | एकुण | 4731065.00 | 47308/- | | |

**निविदा अटी व शर्ती :-**

१) कोरे निविदा प्रपत्राची मागणी करतांना कार्यालयीन पावती व्दारे निवीदा संचाची किंमत स्वीकारली जाईल. तसेच इसार रक्कम धनादेशा व्दारे वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) बार्शिटाकळी यांच्या नावे जमा करावे लागेल. तसेच सा.बां. विभाग यांचे वैद्य पंजीबद्ध प्रमाणपत्राची सत्यप्रत प्रमाणित केलेली सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदा प्रपत्रे देण्यात येणार नाही.

२) कोरी निविदा संच वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा)बार्शिटाकळी यांच्या कार्यालयात दिनांक ०१/११/२०२५ वेळ सकाळी १०.०० वा पासुन ते ०७/११/२०२५ वेळ १८.०० वाजेपर्यंत कामकाजाच्या दिवशी मिळेल.

३) निविदा या कार्यालयात दिनांक ०८/११/२०२५ वेळ ११.०० वा. उघडण्यात येईल काही अपरीहार्य कारणास्तव दिनांक व वेळ मध्ये बदल होऊ शकतो.

४) निवेदेतील कामे रद्द करण्याचे अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) बार्शिटाकळी मु. धाबा यांना राहतील. कामांचा कार्यरंभ आदेश हा निधी उपलब्धतेवर अवलंबून राहील.

५) निवेदा घेवुन स्वतःह कत्राटदाराने उपस्थित राहावे प्रतिनिधी पाठवु नये.

६) इतर अटी व शर्ती निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील.

**आर. आर. बोरकर**
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे)
बार्शिटाकळी मु.धाबा

जिमाका/ अकोला / जाहिरात/ ९२/२०२५

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३३२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# दिव्यांग अशोक भानसे यांची ५ कि.मी. मॅरेथॉन धावून प्रेरणादायी कामगिरी



**वर्धा जनमाध्यम :** सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी वॉक फॉर युनिटीचे वर्धा पोलिसांनी भव्य आयोजन केले होते, यावेळी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता, यात एका पायाने दिव्यांग असलेल्या निवृत्त कर्मचाऱ्यांनी पाच किलोमीटरचा मॅरेथॉन पूर्ण केला,

वनविभागातील सेवानिवृत्त वनपाल आणि बोर फाऊंडेशनचे सचिव, अशोक भानसे यांनी दिव्यांग असूनही ५ किलोमीटरचा मॅरेथॉन यशस्वीपणे पूर्ण करून अनेकांसाठी प्रेरणेचा स्रोत ठरला आहे.अशोक भानसे यांच्यासारखे लोकच समाजाला धैर्य आणि आत्मविश?वास देतात असे सांगायला हरकत नाही. दिव्यांग असूनही त्यांनी स्पर्धेत आपला उत्साह, चिकाटी आणि धडपड दाखवली. बोर फाऊंडेशनच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमात सक्रीय असलेले भानसे यांचे हे कार्य सकारात्मक संदेश देणारे आहे.मॅरेथॉनमधील अशा प्रेरणादायी व्यक्तींची ओळख होऊन, त्यांच्या जिद्दीने समाजामध्ये सकारात्मक बदल घडवण्याचा संदेश सरळ पोहोचतो. अशा कार्यातून केवळ स्वतःला नव्हे, तर अनेकांना जीवनात प्रगती करण्याची प्रेरणा मिळते. अशा उपक्रमांमुळे निराशा दूर होऊन आशेचे दिप लावला जातो. महाराष्ट्रातील सामाजिक संस्थांनी अशा प्रेरणादायी व्यक्तींना पुढे आणून त्यांच्या कष्टांना उजाळा द्यायला हवा, त्यामुळेच समाजाची खरी उन्नती होईल. अशोक भानसे यांना पुढील वाटचालीसाठी अनेकांनी शुभेच्छा दिल्या.



**वर्धा : पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून सरदार वल्लभभाई पटेल जयंती निमित्त वॉक फॉर युनिटी आयोजन करण्यात आले या कार्यक्रमात वनविभाग सेवानिवृत्त कर्मचारी अशोक भानसे दिव्यांग असूनही ५ किलोमीटर मॅरेथॉन मध्ये सहभाग घेतला तसेच ३ वर्ष ते ८४ वर्ष पर्यंत वयोगटातील नागरिकांनी सहभाग घेतला,** (फोटो :राहुल तेलरांधे)

## संक्षिप्त

### फटाके फोडल्याच्या कारणावरून एकास मारहाण

**पुलगाव :** फटाके फोडल्याच्या कारणावरून वाद करीत एकास दोघांनी बेदम मारहाण केली. ही घटना विरुळ येथील बाजार चौकात घडली. पुलगाव पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. प्रवीण पाल असे जखमीचे नाव आहे. प्रवीण पाल हे मूळचे मध्यप्रदेशातील रहिवासी असून ते समृद्धी महामार्गावर असलेल्या एका हॉटेलमध्ये हॉटेल व्यवस्थापक म्हणून काम करतात. शिवाय ते सध्या विरुळ येथे वास्तव्यास आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी फटाके फोडण्याच्या कारणावरून त्यांच्याशी गावातील दोघांनी वाद केला. तो वाद त्यावेळी गावातील काहींनी मध्यस्ती केल्याने निवळला. पण या वादाचा वचपा काढण्याच्या उद्देशाने विरुळ येथील सचिन व नागेश यांनी वाद करून प्रवीण पाल यांना मारहाण केल्याचे तक्रारीत नमुद असल्याचे पुलगाव पोलिसांनी सांगितले. दोघांवर पुलगाव पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे.

### चोरट्यांनी शेतीसाहित्य पळविले

**समुद्रपूर :** चोरट्यांनी शिवणी शिवारातील शेतातून रोटाव्हेटर आणि किर्लोस्कर कंपनीचा डायनामा असा १ लाख ५ हजारांच्या शेती साहित्य पळविल्याची घटना समुद्रपूर पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून उघडकीस आली. पवन वानखेडे यांनी शिवणी येथे मत्त्याने शेती केली असून शेतामध्ये किर्लोस्कर कंपनीचा डायनामा किंमत ५५ हजार आणि रोटावेटर किंमत ५० हजार ही अवजारे ठेवून होती.

# गिरड आरोग्य केंद्रात रुग्णांची हेळसांड

## रिक्त पदे आणि अपुरा औषधसाठा ; ग्रामस्थांची तातडीच्या कारवाईची मागणी



**समुद्रपूर जनमाध्यम :** गिरड या तालुक्यातील सर्वात मोठ्या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र सध्या गंभीर समस्यांना सामोरे जात आहे. कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे आणि औषधसाठ्याच्या टंचाईमुळे रुग्णसेवा विस्कळीत झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.या केंद्रात औषध वितरण अधिकारी, एक आरोग्य सेविका आणि तीन शिपाई अशी सहा पदे रिक्त आहेत. त्यामुळे नियमित आरोग्यसेवा अडखळली असून येथील रुग्णांना उपचारासाठी दीर्घ काळ प्रतीक्षा करावी लागत आहे. औषध वितरणासाठी स्वतंत्र कर्मचारी नसल्याने विद्यमान कर्मचाऱ्यांनाच ही अतिरिक्त जबाबदारी पार पाडावी लागते.औषधसाठा अपुरा असल्याने अनेक रुग्णांना आवश्यक औषधे स्वतः विकत घेण्याची वेळ येते. शासनाच्या मोफत आरोग्यसेवेचा उद्देशच यामुळे व्यर्थ ठरत असल्याची ग्रामस्थांमध्ये चर्चा सुरू आहे.स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी आरोग्य विभागाकडे तातडीने रिक्त पदे भरणे आणि औषधसाठा नियमित ठेवण्याची मागणी केली आहे. गिरड ग्रामपंचायत सरपंच राजू नौकरकर, उपसरपंच मंगेश गिरडे, मोहगाव सरपंच विलास नवघरे, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. महेश गौर, माजी पंचायत समिती सदस्य शेख इस्राईल, तसेच ग्रामपंचायत सदस्य अमोल पर्बत आणि शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुख प्रभाकर चामचोर यांनी या बाबतीत विशेष लक्ष देण्याचे जिल्हा प्रशासनास आवाहन केले आहे. उपसरपंच मंगेश गिरडे म्हणाले, आम्ही प्रत्यक्ष पाहणी केली असता केंद्रात कर्मचाऱ्यांची कमतरता आणि औषधसाठ्याचा अभाव स्पष्ट दिसून आला. आठ दिवसांत ही परिस्थिती सुधरली नाही, तर ठोस पावले उचलली जातील.

# संकटमोचन मंदिरातर्फे रोगनिदान व उपचार शिबिर

**सेलू :** दत्ता मेघे उच्चशिक्षण संशोधन संस्थाद्वारा संचालित आचार्य विनोबा भावे रुग्णालय सावंगी (मेघे) आणि संकटमोचन हनुमान मंदिर, खडकी यांच्या संयुक्त विद्यमाने खडकी येथील हनुमान मंदिरात रविवार, २ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत रोगनिदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. शिबिरात निवड झालेल्या रुग्णांवर सावंगी रुग्णालयात भरती करून उपचार केले जाणार आहे.

यावेळी काही चाचण्या या विनामूल्य असून, काही महत्त्वाच्या चाचण्यांवर पन्नास टक्के एवढी सवलत दिली जाणार आहे. संकटमोचन हनुमान मंदिर खडकीच्या सौजन्याने हायड्रोसिल, हर्निया व इतर काही शस्त्रक्रिया मोफत केल्या जाणार आहेत. मूळ शिधापत्रिका आणि आधारकार्ड घेऊन रुग्णांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संकटमोचन हनुमान मंदिर खडकीचे अध्यक्ष केसरीचंद खंगारे, सचिव श्रीकृष्ण भंडारे, अशोक तेलंग, रसीद मुसानी, अरुण येरणवार, डॉ. किरण अग्रवाल, मुरलीधर उमाटे यांनी केले आहे.

# विदर्भ भोई समाज सेवा संस्थेच्यावतीने वर्धा येथे उपवर युवक-युवती परिचय मेळावा

**वर्धा जनमाध्यम :** विदर्भ भोई समाज सेवा संस्था वर्धा यांच्या वतीने जिल्ह्यातील तसेच विदर्भभरातील समाजबांधवांच्या संयुक्त विद्यमाने ’उपवर युवक-युवती परिचय मेळावा व गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त कर्मचारी-अधिकारी सत्कार सोहळा रविवार, २ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता वर्ध्यातील आकरे मंगल कार्यालय, कारला चौक, आर्वी रोड, वर्धा येथे भव्यादिव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्याचे उद्घाटन पंकज भोयर, राज्यमंत्री तथा पालकमंत्री, वर्धा यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उकंडरावजी सोनोने, अध्यक्ष, विदर्भ भोई समाज सेवा संस्था, वर्धा हे भूषविणार आहेत. तसेच प्रमुख अतिथी म्हणून राजेश बकाने (आमदार,देवळी-पुलगांव), वैशाली अजय गौळकार (सरपंच, ग्रामपंचायत पिपरी मेघे), चंद्रलालजी मेश्राम (सेवानिवृत्त न्यायाधीश व माजी मागासवर्गीय आयोग सदस्य), तसेच संस्थेचे कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष, महासचिव, महिला पदाधिकारी व विविध जिल्ह्यांतील समाज प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

या मेळाव्यात विवाहयोग्य उपवर युवक-युवती, विधवा, घटस्फोटीत तसेच अपंग बांधवांसाठी परिचय सत्राचे आयोजन करण्यात आले असून, समाजातील सर्व पालकांनी आपल्या मुला-मुलींसह मेळाव्यात सहभागी होऊन या समाजोपयोगी उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेने केले आहे. त्याचबरोबर गुणवंत विद्यार्थी आणि सेवानिवृत्त शासकीय व निमशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या सत्काराचाही कार्यक्रम या दिवशी होणार आहे.

# कार्तिक महिन्यात काकड आरतीने उजळले लक्ष्मीनारायण मंदिर

**वर्धा जनमाध्यम**

कार्तिक महिन्याच्या पवित्रतेत भक्तिभावाचा सुगंध दरवळताना वर्ध्यातील लक्ष्मीनारायण देवस्थानात गेल्या पन्नास वर्षांहून अधिक काळ अविरत सुरू असलेल्या काकड आरती परंपरेने यंदाही भक्तांना आपल्या प्रकाशाने पवित्र केलं आहे. कोजागरी पौर्णिमेपासून सुरू झालेली आणि त्रिपुरी पौर्णिमे पर्यंत चालणारी ही आरती सलग तीस दिवस सूरांच्या नादात आणि दिव्यांच्या तेजात भक्तांचे मन भारावून टाकते. दररोज सकाळच्या वेळी सुमारे ६० ते ७० भक्त या आरतीत सहभागी होतात, तर दिवाळीच्या पाच तेजस्वी दिवसांत धनतेरस ते भाऊबीज पर्यंत ही संख्या तब्बल ४०० पर्यंत पोहोचते.या आरतीची विशेष म्हणजे भक्त स्वतःच्या घरातील तेलदिवे घेऊन येतात आणि मंदिरात एकत्रितपणे ते पेटवतात. त्यामुळे मंदिर परिसर दीपमाळांनी झळाळून उठतो. या काळात मंदिर ट्रस्टकडून विविध प्रसादाचे वितरण केले जाते.भक्ती, एकात्मता आणि उज्ज्वल संस्कार यांचा संगम घडवणारी कार्तिक काकड आरती आजही वर्ध्यातील समाज जीवनाला प्रेरणा देत आहे.

# साहूर येथे श्रीराम कथा महोत्सवास सुरुवात

## ज्ञानेशानंदजी महाराजांच्या रसाळ वाणीतून श्रोते झाले मंत्रमुग्ध



**साहूर जनमाध्यम ;** धन्वंतरी जयंती आणि कार्तिक पौर्णिमेच्या मंगल पर्वानिमित्त येथील लक्ष्मीनारायण सभागृहात संगीतमय श्रीराम कथा महोत्सव व ज्ञानयज्ञ सप्ताहाला बुधवारी सुरुवात झाली. सात दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमामुळे गावात भक्तीमय आणि अध्यात्मिक वातावरण पसरले आहे.

आळंदी, मोवाड येथील रामायणाचार्य ज्ञानेशानंदजी सेंबेकर महाराज आपल्या मधुर आणि तेजस्वी वाणीने श्रीरामकथेमधून भक्तांना अध्यात्मिक समाधान देत आहेत. प्रारंभी कलश स्थापना व अधिष्ठान पूजनानंतर कथा वाचनास प्रारंभ झाला.

लक्ष्मीनारायण मंदिरात दरवर्षी प्रमाणे यंदाही कार्तिक महिन्यातील ग्रंथवाचन व काकड आरतीप्रसंगी वारकरी भक्त मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. सकाळी साडेपाचला सामुदायिक ध्यान, सहाला काकड आरती, नऊ ते बारा भजन, एक ते पाच श्रीराम कथा वाचन आणि सायंकाळी साडेपाचला सामुदायिक प्रार्थना असे दैनंदिन कार्यक्रम सातत्याने सुरू आहेत.

समारोपीय कार्यक्रम ५ नोव्हेंबर रोजी होणार असून, त्यादिवशी सकाळी दहा ते बारा गोपालकाल्याचे कीर्तन आणि दुपारी दोन ते सहा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या पवित्र सप्ताहात साहूरसह परिसरातील भाविकांना उपस्थित राहून श्रीरामकथेमधून आध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन कथा महोत्सव समितीकडून करण्यात आले आहे.

# तुळजापूर शेतशिवारातील वीजपुरवठा चार दिवसांपासून ठप्प

## संबंधित लाइनमनची तत्काळ बदली करण्याची मागणी

**सेलू जनमाध्यम :** तुळजापूर-हेलोडी दहेगाव (गो.): नजीकच्या मौजा शेतशिवारातील विद्युत रोहित्र नादुरुस्त असल्याने गेल्या चार दिवसांपासून वीजपुरवठा ठप्प आहे. या संदर्भात वारंवार संपर्क करूनही प्रतिसाद न देणाऱ्या संबंधित लाइनमनरची तत्काळ बदली करावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा महावितरणचे कार्यकारी अभियंता यांना शेतकऱ्यांनी दिला आहे.

निवेदनात मौजा तुळजापूर हेलोडी शेतशिवारातील रोहित्र (डिपी) नादुरुस्त असल्याने चार दिवसांपासून वीजपुरवठा बंद आहे. या संदर्भात डीपी तातडीने दुरुस्त करावी यासाठी शेतकऱ्यांनी वारंवार संबंधित कार्यालय अधिकारी व लाइनमन यांच्याकडे तक्रार केली.

अद्यापही कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही. वारंवार फोन करूनही फोन उचलत नाही. उचलला तर उद्धटपणे बोलतात. याचा शेतकऱ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. वीजपुरवठा बंद असल्याने त्याचा परिणाम शेतपिकांवर होत आहे. सद्यस्थितीत खरीप हंगामातील पिकांना पाणी देणे आवश्ये असून, काहिंच्या शेतात रब्बी हंगामातील पिकांची परणी झाली आहे.

त्यामुळे लागवड केलेल्या पिकांना पाणी देण्यास विलंब होत आहे. यात शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. तेव्हा तातडीने दखल घेऊन वीजपुरवठा सुरळीत करावा व संबंधित लाइनमनची येथून हकालपट्टी करावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा संजय पिसुड्डे, सुनील मिश्रा व शेतकऱ्यांनी दिला आहे.

# दुचाकीच्या धडकेत महिला गंभीर जखमी

**वर्धा :** स्थानिक वर्धा-हिंगणघाट मार्गावरील बोरगाव (मेघे) येथे रस्ता ओलांडत असताना दुचाकीच्या धडकेत एक महिला गंभीर जखमी झाली. जखमी महिलेचे नाव सुनीता उमेश रंगारी (५७) असे आहे. माहितीनुसार, सुनीता रंगारी या रस्ता ओलांडत असताना वेगात येणाऱ्या दुचाकीने त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तत्काळ वर्धा येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथील रुग्णालयात हलविण्यात आले. याप्रकरणी शहर पोलिसांनी अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# फटाकेमुक्त दिवाळी आणि व्यसनमुक्ती प्रबोधन मोहिमेत सहभागी कार्यकर्त्यांचा सत्कार

## वर्धा जिल्ह्यात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या प्रबोधन मोहीमेचा यशस्वी आढावा



**वर्धा जनमाध्यम:** दिवाळीच्या सणासुदीच्या पार्श्वभूमीवर फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणासह व्यसनाधीनतेच्या संसर्गाचा प्रश्न गंभीरपणे लक्षात घेता, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने यंदा वर्धा जिल्ह्यात फटाकेमुक्त दिवाळी व व्यसनमुक्तीच्या प्रचारासाठी व्यापक प्रबोधन मोहीम राबवली आहे.जिल्हा व शहर शाखा वर्धा, तसेच आर्वी, समुद्रपूर, आष्टी, कारंजा घाडगे, हिंगणघाट, देवळी, सेलू अशा आठ शाखांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील २४ शाळा- महाविद्यालयांमध्ये महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी टू व्हिलरवरुन जाऊन दहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत या मोहिमेचा आत्मार्पणपूर्ण संदेश पोहचविला. या मोहिमेचा शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मान्यवरांच्या उपस्थितीत झाला, ज्यात राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, जिल्हाध्यक्ष बाबाराव किटे, शहर शाखा अध्यक्ष अरुण चवडे, सभागृहाचे संचालक गुड्डु देशमुख तसेच राज्य व जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती गेल्या ३६ वर्षांपासून बुवाबाजी तसेच अनिष्ट प्रथा आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठी झटत आहे. याच निरंतर सततच्या प्रयत्नाचा भाग म्हणून या वर्षी फटाक्यांच्या हानीकारक परिणामांबाबत समाजात जागरूकता वाढवण्यामुळे यशस्वी प्रबोधन मोहिम राबविली गेली.कार्यक्रमात सहभागी महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संविधानाची पुस्तिका, वयात येताना हे प्रबोधनग्रंथ व अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका देऊन सत्कार करण्यात आला. प्रबोधन यात्रेत सहभागी अनेक कार्यकर्त्यांनी समाजातील बदलासाठी केलेले प्रयत्न उलगडून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. माधुरी झाडे यांनी, प्रास्ताविक भरत कोकावार यांनी तर आभारप्रदर्शन सुनील ढाले यांनी केले. या मोहिमेच्या यशस्वितेसाठी डॉ. हरीश पेटकर, डॉ. राठोड, अशोक हेडावू, जगदिश भोयर, दिलीप गुळघाणे आदींनी भरपूर परिश्रम घेतले. फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण, आरोग्याचा प्रश्न आणि व्यसनाधीनतेच्या वाढत्या समस्येवर मात करण्यासाठी अशा प्रबोधन मोहिमांचे महत्त्व अधोरेखित करत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती प्रत्येक वर्षी वर्धा जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये ही मोहीम सातत्याने राबवित आहे.या सामाजिक उपक्रमातून फटाक्यांच्या पर्यायी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी आणि वर्गाच्या सर्व स्तरांत व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३३२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# बोगस जन्म-मृत्यू दाखले प्रकरणात ५०५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

## -मनपा वैद्यकीय अधिकारी यांची तक्रार

**अमरावती/प्रतिनिधीः-** बोगस जन्ममृत्यू दाखले प्रकरणात महानगरपालिका वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल काळे यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात ५०५ लोकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या लोकांनी दाखल्यासाठी दिलेल्या पत्तावर त्यांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाही.यावरून त्यांच्याविरुद्ध कलम ३३६(३),३४०(२) व ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये रंगरावजी बळीरामजी जाधव (रा.सोनल कॉलनी), राम मोरवाल (विलासनगर), मोहम्मद फरहान मोहम्मद साजिद( सौदागर पुरा) सैयदद हुसेन सैय्यद( हाथीपुरा), अब्दुल गफुर अब्दुल रजा ( नालसाबपुरा) ,मोहम्मद नजीव मो. तफजुल (नागपुरी गेट), मोहम्मद अशफाक अब्दुल रहिम(नागरपुरी गेट), मोहम्मद आबिद मो अबूल्ला ( मोलापुरा), मोहम्मद अकिल मो.याकुब ( तारखेडा),शेख रहिम ( नालसापुरा ), शेख हनिफ इरफान खान सुलेमान खान ( तारखेडा ),अब्दुल रहमान अब्दुल गफुर (गवळीपुरा, तारखेडा ),शेख आबिद शेख मोहम्मद रा.( नुरनगर),मोहम्मद कामरुन अब्दुल हनान ( नुरनगर) तसेच अन्य ४८५ विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

यामध्ये काही महिलांचा समावेश आहे.तक्रारी अनुसार जन्म मृत्यु प्रमाणपत्रापैकी जे प्रमाणपत्र तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी या पदापेक्षा कमी दर्जाचे अधिकारी यांनी निर्गमीत केलेले ते प्रताणपत्र रद्रद करण्यात येत असुन त्याची सक्षम




अधिकारी यांचे कडुन फेर तपासणी करुन त्यावरुन योग्य निर्णय घेण्या बाबत निर्देष प्राप्त झाले होते.मनपा आयुक्त यांना माजी खासदार किरिट सोमैया यांनी मनपा येथे आरोग्य विभागाने दिलेल्या जन्म मृत्यु दाखल्याची पडताळणी करणे बाबत लेखी पत्र दिले. त्या अनुषंगाने मनपा आयुक्त यांनी जन्म मृत्यु दाखल्याची पडताळणी करणे बाबत तोंडी आदेश दिले होते.परीमंडळ पातळीवर सदर कालावधीतील देण्यात आलेले जन्म मृत्यु दाखले संबंधीत व्यक्तीकडून जप्त करुन रद्द करणे बाबत परिमंडळ पातळीवर सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी यांना जबाबदारी दिली होती. त्या प्रमाणे सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी व त्यांच्या कडील लिपीक असे मिळुन सदर कालावधीत देण्यात आलेल्या जन्म मृत्यु दाखल्या मध्ये अर्जदाराने नमुद केलेल्या पत्यावर जावुन दाखले जप्त केले असता जन्म मृत्यु दिलेल्या नोंदी मधील आरोपीतांचा अर्जदार यांनी दिलेल्या पत्यावर त्यांचा शोध घेतला असता त्यांचे घरी मिळुन आले नाही. तसेच त्यांचे बाबत कोणतीही ठोस माहीती मिळुन आली नाही वरुन आरोपीतांनी जन्म मृत्यु दाखले प्राप्त करण्या साठी केलेल्या अर्जा सोबत खोटे व बनावट कागदपत्र जोडुन जन्म मृत्यु दाखले व जन्म दाखला नोंदणी आदेश मिळवुन शासनाची फसवणुक केली असल्याचे प्रथम दर्शनी निष्पन्न झाले. १ ते १५५ आरोपी हे मिळून न आल्याने व १ ते ३४९ आरोपी हे दिलेल्या पत्त्यावर त्यांचे घरे मिळुन न आल्याने त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उपमुख्यमंत्री पवार यांच्या ताफ्याला दाखवले काळे झंडे

## -तळेगाव येथील शेतकऱ्यांचा आक्रोश

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज गुरुवार ३० ऑक्टोबर रोजी एक दिवसीय अमरावती दौऱ्यावर आले होते. यावेळी त्याच्या ताफ्याला तळेगाव दशासर येथे शेतकऱ्यांनी काळे झेंडे दाखवले. आणि शासनाचे विरोधात जोदार घोषणाबाजी केली. यवतमाळची सभा संपवून उपमुख्यमंत्री अजित पवार अमरावती येत असताना तळेगाव दशासर येथे येथे संतापलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले.





सकाळपासून जिल्ह्यातील विविध भागात पाऊस सुरू असताना देखील शेतकऱ्यांनी पावसात उभे राहून काळे झेंडे दाखवले.सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. जोपर्यंत सरकार शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार नाही तोपर्यंत वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी शेतकऱ्यांनी दिला.काँग्रेस तालुकाध्यक्ष पंकज वानखेडे यांच्या नेतृत्वात असंख्य कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. त्यांनी शेतकऱ्यांच्या खात्यात अजून पर्यंत पैसे जमा नाही झाले. कर्जमाफी नाही झाली, अशी घोषणा देत आक्रोश व्यक्त केला. धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे पंचायत समिती काँग्रेस सदस्य व जिप सदस्य यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तडीपाराजवळून देशी कट्ट्यासह जिवंत काडतुस जप्त!

## -खुनासह गंभीर गुन्ह्यांतील शहबाज उर्फ मुरारी अटकेत

**अमरावती :** शहर गुन्हे शाखेने मंगळवारी (दि. २९) नागपुरी गेट परिसरात धडक कारवाई करत तडीपार आरोपीकडून देशी बनावटीचा कट्टा, दोन जिवंत राउंड आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त केली. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आरोपीकडून १ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

गुन्हे शाखेचे पथक मंगळवारी पेट्रोलिंगदरम्यान कार्यरत असताना गुप्त माहिती मिळाली की, तडीपार आरोपी शेख शहबाज उर्फ मुरारी शेख कलीम (२४, रा. पठाण चौक) हा ॲकेडमी हायस्कूलच्या मैदानावर मोपेडच्या डिकीत देशी बनावटीचा कट्टा लपवून गुन्हा करण्याच्या तयारीत आहे. तत्काळ पथकाने वीजेच्या वेगाने छापा टाकत आरोपीला ताब्यात घेतले. तपासादरम्यान त्याच्याकडून देशी बनावटीचा कट्टा, दोन जिवंत काडतुसे आणि ॲक्सेस गाडी (एमएच २७ डीव्ही ७३०२) असा एकूण १.१९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनाखाली, डीसीपी गणेश शिंदे, रमेश धुमाळ, एसीपी शिवाजी बचाटे यांच्या नियंत्रणाखाली पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक अमोल कडू, हवालदार दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, सुनील लासूरकर, जहीर शेख, मनोज ठोसर, अतूल संभे, चेतन कराडे, राजीक रायलीवाले आणि सुरज चव्हाण यांनी केली.

### आरोपीचा रक्तरंजित गुन्हेगारी इतिहास-

ताब्यात घेतलेला आरोपी शहबाज उर्फ मुरारी हा अमरावती पोलिसांच्या यादीतील 'हाय रिस्क' गुन्हेगारांपैकी एक आहे. नागपुरी गेट पोलीस ठाण्यात चोरी व आर्म ॲक्टअंतर्गत दोन गुन्हे, कोतवाली पोलीस ठाण्यात धमकी देण्याचा गुन्हा, खोलापुरी गेट आणि नागपुरी गेट ठाण्यात खुनाच्या गुन्ह्यांची नोंद अशा गंभीर गुन्ह्यांनंतरही तो शहरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच गुन्हे शाखेने ही निर्णायक कारवाई केली.

# शहरात कलम ३७ (१) व (३) लागू

**अमरावती :** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस आयुक्त (अमरावती शहर) यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

सदर प्रतिबंधात्मक आदेश शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला असून आजपासून ते १२ नोव्हेंबर २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पोलीस आयुक्त (अमरावती शहर) अरविंद चावरिया यांनी कळविले आहे.

# ६ लाखांचे दागिने लंपास

**परतवाडा -** खुल्या घरातून सहा लाखाचे दागिने लंपास करण्यात आल्याची घटना कांडली परिसरातील द्वारका नगरमध्ये समोर आली आहे. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार अरुणा अजयपंत नवले (६१ द्वारका नगर, कांडली) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली की त्यांच्या घरातून अज्ञात आरोपींनी दिवानाखाली ठेवलेले ३३ ग्रॅम सोन्याच्या बांगड्या ३ लाख ३० हजार, दोन अंगठ्या १ लाख, कानातले सात ग्राम ७० हजार, काळ्या मनीची पोत १० ग्राम १ लाख असे एकूण ६० ग्रॅम सोन्याचे दागिने किंमत ६ लाख रुपये चोरून नेले. अरुण नवले यांनी सांगितले की १२ ऑक्टोंबर रोजी त्यांच्या घराचा दरवाजा उघडा होता. त्यावेळी



आरोपींनी घरात घुसून बेडरूम मध्ये ठेवलेल्या दिवानाच्या खालून दागिन्याची पर्स लंपास केली. त्यांनी जेव्हा पाहिले तर त्यांना दागिन्याची पर्स नाही दिसली. यामुळे त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी कलम ३०५ अ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास परतवाडा पोलीस करत आहे.

# अमरावती महानगरपालिकेतर्फे छायाचित्र स्पर्धेचे पारितोषिक विजेते जाहीर

**अमरावती :**अमरावती महानगरपालिका आणि विधिमंत्र संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'फोटोग्राफी स्पर्धा २०२५' या उपक्रमातील विजेत्यांची घोषणा करण्यात आली आहे.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक शंतनु पाटील यांना, द्वितीय क्रमांक भूषण अळसपुरे यांना तर तृतीय क्रमांक संदीप चौधरी यांना घोषित करण्यात आला आहे. तसेच प्रोत्साहनपर बक्षीस सुशांत पांडे आणि मनीष मु-हेकर यांना देण्यात आले आहे.

विजेत्यांना अनुक्रमे रु. ११,०००, रु. ७,०००, रु. ५,०००, तसेच प्रोत्साहनपर रु. ३,००० व रु. २,०००- अशी पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. दिनांक २ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेतील छायाचित्रांचे प्रदर्शन १६ ते २१ ऑक्टोबर दरम्यान संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे आयोजित करण्यात आले होते. स्पर्धेचा उद्देश अमरावती शहराचे सांस्कृतिक, सामाजिक आणि नैसर्गिक सौंदर्य कॅमेऱ्याच्या माध्यमातून सादर करणे हा होता. छायाचित्रकारांनी गणेश उत्सवातील अमरावती, शहरी व सांस्कृतिक सौंदर्य, तसेच निसर्ग व वन्यजीव – अमरावती परिसर या विषयांवर छायाचित्रे सादर केली होती. परीक्षण समितीत उदय खोत, अद्वैत केवले आणि विकास केमदेव यांनी परीक्षक म्हणून कामकाज केले. त्यांनी छायाचित्रांची निवड करताना कलात्मक दृष्टीकोन, विषयाची मांडणी आणि सौंदर्यपूर्ण अभिव्यक्ती या निकषांचा विचार केला. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, 'फोटोग्राफी स्पर्धा २०२५ हा उपक्रम शहरातील कलात्मक वातावरण अधिक समृद्ध करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. भविष्यातही अशा उपक्रमांच्या माध्यमातून स्थानिक प्रतिभेला प्रोत्साहन दिले जाईल.' आयुक्त यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करताना, स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व छायाचित्रकारांचे आभार मानले. या उपक्रमामुळे शहरातील नवोदित छायाचित्रकारांना आपली कला सादर करण्याचे आणि ओळख निर्माण करण्याचे व्यासपीठ उपलब्ध झाले असून, अमरावतीच्या छायाचित्रकलेला नवसंजीवनी देणारी ही स्पर्धा ठरली आहे.

# दाजीसाहेबांच्या तपोवनात रद्दीतून वृद्धी उपक्रमाचा गौरव

**अमरावती :** विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीच्या दिवशी डॉ. गोविंद कासट मित्र मंडळीचा दीपावली मिलन कार्यक्रम अनेक मित्रमंडळींच्या उपस्थिती संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांच्या अध्यक्षतेखाली व त्यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई तर मंचावर मातोश्री कमलताई गवई सुदर्शन गांग पी.बी इंगळे धनंजय गूळदेकर डॉ. राजू डांगे काशिनाथ फुटाणे प्रभाताई आवारे मेघा बोबडे अश्विनी बुरघाटे, दिलीप सदार ,प्राचार्य संजय शिरभाते, विष्णुपंत कांबे, सुरेश कस्तुरकर, जीवन व वैशाली गोरे ,मंगला व दिलीप गावंडे ,रविकांत काकडे ,लक्ष्मण तडस, नंदकिशोर मालवीय, महेश माहुलकर , विवेक सहस्त्रबुद्ध ,यश सहस्त्रबुद्धे इत्यादी मंडळी हजर होती.



दाजीसाहेब, मातोश्री पार्वतीबाई पटवर्धन प्रतिमेचे पूजन, स्वागतपर भाषण, एकाहून एक सरळ भाषणे, तपोवनातील मंडळी सोबत दिवाळी फराळ, आनंद परिवारातर्फे देणगी इत्यादी कार्यक्रम नंतर प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांचे अध्यक्ष भाषण, अनेक जुने आठवणींना उजाला देत एक ना अनेक कार्यक्रम मित्रमंडळीच्या कार्यक्रमांमध्ये होत गेले. यामध्ये रद्दीतून वृद्धी उपक्रमात मित्र मंडळातील ८० वर्षी आदर्श सेवानिवृत्त शिक्षक पी.बी इंगळे यांनी आठवणीने घरून आणलेल्या वृत्तपत्र रद्दीचा अविनाश राजगुरू यांनी स्वीकार केला.

मा.सह दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील
किरकोळ (R.M.J.C.) क्र.२८१/२०२५ ने.ता.०४.१२.२०२५
बंडु - वि - निरंक

अर्जदार : १. बंडु काशिनाथ शेटे,
रा.वार्ड नं.३, वडाळा, पो.नांदसावंगी,
ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत **सुशिला श्रीराम शेटे** यांचा मृत्यू दि.**२१.०२.२०१८** रोजी वडाळा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती मयत सुशिला श्रीराम शेटे यांचे पती **श्रीराम दामोदर शेटे** यांचे दिनांक **०२.०६.२००७** रोजी वडाळा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे मयत झाले व श्रीराम शेटे यांचे भाऊ मयत **काशिनाथ दामोधर शेटे** यांचे देखील दिनांक **२८.१२.२००८** रोजी मयत झाले. मयत काशिनाथ दामोधर शेटे यांची पत्नी नामे **ताराबाई काशिनाथ शेटे** यांचे देखील निधन **०६.०२.२०११** रोजी वडाळा येथे मृत्यू झाला. मयतांचे अर्जदार नं.१ हा पुतण्या आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

# ड्रोन आणि स्टिल फोटोग्राफी कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आधुनिक छायाचित्रण तंत्राची गोडी

## -आयआयएमसीत कार्यशाळा : तज्ञांनी केले मार्गदर्शन

**अमरावती :** आयआयएमसी च्या विद्यार्थ्यांनी कॅमेरा सेटिंग, फ्रेमिंग, लाइटिंग, कंपोझिशन तसेच ड्रोनद्वारे फोटो आणि व्हिडिओ चित्रीकरणाच्या कौशल्यांचा कार्यशाळेत प्रत्यक्ष सराव केला. या अनुभवातून त्यांच्यात छायाचित्रण बद्दल आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि गोडी निर्माण होण्यास मदत झाली.

भारतीय जन संचार संस्थानच्या (आयआयएमसी) पश्चिम क्षेत्रीय परिसरात 'ड्रोन व फोटो पत्रकारिता' या विषयावर दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात लोकमत मीडिया ग्रुपचे छायाचित्रकार मनीष तसरे आणि शहरातील ड्रोन तज्ज्ञ हितेश बोधानी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा, डॉ. विनोद निताळे, डॉ. आदित्य मिश्रा, प्रमोद गायकवाड, जयंत सोनोने, रोहन तायडे उपस्थित होते.

कार्यशाळेत प्रथम सत्रात ड्रोन तंत्रज्ञ हितेश बोधानी यांनी आधुनिक पत्रकारितेत ड्रोनचा वाढता वापर, एरियल शॉट्स घेण्याची पद्धत, ड्रोन उडवताना पाळावयाचे नियम आणि सुरक्षा मानदंड याबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ड्रोन ऑपरेशनचे प्रात्यक्षिक दाखवून तंत्रज्ञानाचा अनुभव दिला. दुसऱ्या सत्रात मनीष तसरे यांनी कॅमेरा हाताळणीचे तंत्र विस्ताराने समजावून देताना फोटोग्राफी ही केवळ बटण दाबण्याची प्रक्रिया नसून ती विचार आणि दृष्टिकोनातून घडणारी कला असल्याचे सांगितले. उत्कृष्ट छायाचित्रासाठी विषयाचे सखोल ज्ञान, योग्य वेळेचे नियोजन, प्रकाशाचा अभ्यास आणि वाचनाची सवय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी निवडक छायाचित्रांच्या माध्यमातून बातमी लेखनाचे तंत्र मनीष तसरे यांनी उलगडून सांगितले. विद्यार्थांनी ड्रोन द्वारा स्वतः काढलेल्या छायाचित्रांचे आणि व्हिडीओचे सादरीकरण शेवटी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय डॉ. आदित्यकुमार मिश्रा यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रमोद गायकवाड यांनी तर आभार जयंत सोनोने यांनी मानले.कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी राजेश झोलेकर, नुरूझुमा शेख, भूषण मोहोकार, राजेश कुमार अनंत नांदुरकर, मंदा पवार, नंदा तुप्पट आदींचे सहकार्य लाभले. कार्यशाळेत मराठी, हिंदी आणि इंग्रजी पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहीर नोटीस
विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात
आर.एम.जे.सी.क्र.६३२/२०२५ ने.ता.२७.११.२०२५

अर्जदार : १. बबीता दिपकराव देशमुख, वय ४१ धंदा - घरकाम
रा.चिंचोली काळे, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. तेजस्विनी दिपकराव देशमुख,वय २२ धंदा - शिक्षण
रा.काळगव्हाण, अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती
३. ईशिका दिपक देशमुख, वय १० धंदा - शिक्षण
(अ.पा.क.आई अर्जदार नं.१)
४. सह्यांद्री चेतन जांभुळकर, वय २४ धंदा - घरकाम
रा.काळगव्हाण, अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत दिपक उध्दवराव देशमुख** यांचा मृत्यू दिनांक **२३.०८.२०२४** रोजी **चिंचोली काळे,** ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच मयत **कमलाबाई उध्दवराव चौधरी (देशमुख)** हिचा दि.**१३.११.२०२०** रोजी अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे मरण पावली. त्यामुळे अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशीर वारस असल्याने त्यांना कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.६३२/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.१६.१०.२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**.डी.बी.गुल्हाने**
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.ए.बी.कळदाते, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३९९/२०२५
**सुगंधाबाई -वि- निरंक**
पुढील ता.१६.१२.२०२५

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : १. सुगंधाबाई गुलाब सातपैसे, वय ८७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. मनोरमा अरुणराव सातपैसे, वय ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
३. अंकुश अरुणराव सातपैसे, वय ३१ वर्षे, व्यवसाय - मजुरी
तिघेही रा.गुरुदेव चौक, भातकुली, जि.अमरावती
४. अंकिता पंकज सहारे, वय २९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.कोल्ही कोळी, पो.फाळेगांव, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अरुण गुलाबराव सातपैसे** हे दिनांक 05.09.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुगंधाबाई गुलाब सातपैसे व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुगंधाबाई गुलाब सातपैसे व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १६.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.ए.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४२७/२०२५
**विमल -वि- निरंक**
पुढील ता.०८.१२.२०२५

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : १. विमल नानासाहेब सराफ, वय ८० वर्षे, व्यवसाय - निरंक
२. प्रशांत नानासाहेब सराफ, वय ५६ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
दोन्ही रा.क्वॉर्टर नं.६, मालटेकडी चौक, विदर्भ हाऊसिंग सोसायटी, कॅम्प, अमरावती, ता.जि.अमरावती
३. निलीमा प्रविण जगताप, वय ५३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.सदानी नगर, तिरुपती नगर नं.२, साईनगर, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **नानासाहेब वासुदेवराव सराफ** हे दिनांक 03.01.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **विमल नानासाहेब सराफ व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विमल नानासाहेब सराफ व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १७.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ५५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयाचा भोंगळ कारभार

## दर गुरवारी स्त्री रोग तज्ञ डॉक्टर मंडळीकडून तपासणीचे केले आयोजन मात्र डॉक्टर मंडळी अनुपस्थितीत

**अचलपुर/वार्ताहर**

अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय येथे अचलपूर तालुक्या सह मेळघाट, अंजनगाव, दर्यापूर व चांदूरबाजार तसेच आदी ग्रामीण भागातील गर्भवती महिलांची तपासणी व प्रसूती साठी प्रचंड गर्दी असते. सकाळी ८ वाजता सुरु होणारी गर्भवती महिलांची स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर मंडळीकडून होणारी तपासणी ची ओ.पी.डी दुपारी १२ वाजुनही सुरु न झाल्याने एकच गोंधळ उडाला होता. कारण अनेक गर्भवती महिला हे ग्रामीण भागातून सकाळीच अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात दाखल झाल्या होत्या.यामुळे त्यावेळी संबधित स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर मंडळी अनुपस्थितीत असल्याने याचा त्रास मात्र तपासणी साठी आलेल्या गर्भवती महिलांना सहन करावा लागला.तसेच



सोनोग्राफी केंद्र सुद्धा शोभेची वस्तू बनलेली आहे.याप्रकारामुळे अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात स्त्री रोग तज्ञ डॉक्टर मंडळी ची संख्या कमी आहे का ? किंवा स्त्री रोग तज्ञ डॉक्टर मंडळी ची संख्या व्यवस्थित असताना ड्युटी चे नियोजन चुकले का ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे.विशेष म्हणजे १५० पेक्षा जास्त गर्भवती महिलांनी तपासणी साठी नोंदणी केली होती.

प्राप्त माहितीनुसार, दर गुरुवार प्रमाणे यावेळी ही अचलपुर येथील जिल्हा स्त्रि व बाल रुग्णालयात गर्भवती महिलांची आरोग्य तपासनी साठी तज्ञ स्त्री रोग डॉक्टर मंडळीकडून विषेश ओ.पी.डी आयोजीत करण्यात येते. या गुरुवारी ग्रामीण भागासह, मेळघाटातील गरोदर महिलांना तपासणी साठी बोलावण्यात आले होते. पण तिथे संबंधित डॉक्टर उपस्थित नसल्याने तीन ते चार तासाचा अवधी उलटल्यानंतर तपासणी सुरू न झाल्याने काही रुग्णांच्या नातेवाईकांनी फोटो , व्हिडीओ काढून स्थानिक पातळीवर तक्रार केली. त्यावेळी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी मनाई करत तंबी दिली. गोधळ वाढत असल्याचे पाहुन लगेच एका डॉक्टरांकडून त्या गरोदर महिलांची तपासणी सुरू करण्यात आली.पण यावेळी विशेष म्हणजे स्त्री रोग तज्ञ डॉक्टर मंडळी अनुपस्थित होते. यामुळे गरोदर महिलांची तपासणी,उपचार ,मार्गदर्शन साठी स्त्रि रोग तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती असताना सुद्धा संबधित डॉक्टर मंडळीच्या अनुपस्थितीमुळे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहे.यामुळे जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात मनमानी कारभार सुरू असल्याची संतप्त प्रतिक्रिया काही नातेवाईकांनी दिल्या. एकीकडे अचलपूर उपजिल्हा रुग्णालयाचे राज्य शासनाच्या कोट्यावधी रुपयाच्या निधीतून जिल्हा व स्त्री बाल रुग्णालयाचा रुपात नुतनिकरण होत आहे. यामुळे गर्भवती महिला व बालकांना तज्ञ डॉक्टर मंडळीकडून निःशुल्क महागडे उपचार ,मार्गदर्शन ,तपासणी होऊन फायदा मतदार संघासह जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रुग्णांना होणार अशी आशेची किरण निर्माण झाली आहे. पण आजच्या या प्रकरणामुळे ही आशा धुळीत जाणार का ? हा प्रश्न सुद्धा निर्माण झालेला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.आणि आगामी काळात हा प्रकार पुन्हा घडू नये ? तपासणी साठी येणाऱ्या गर्भवती महिला व नातेवाईकांना तासनतास रांगेत उभे राहण्याची वेळ येऊ नये ? यासंदर्भात वैद्यकीय अधीक्षक ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



# विद्यापीठाची हिवाळी-२०२५ एल.एल.बी.

## सेमि.-२ च्या कॉन्ट्रॅक्ट-२ विषयाची पुनर्परीक्षा

**अमरावती/का.प्र.**



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची हिवाळी - २०२५ एल.एल.बी. (तीन वर्षीय) सेमि.-२ च्या कॉन्ट्रॅक्ट-२ या विषयाची पुनर्परीक्षा यापूर्वीच्याच परीक्षा केंद्रांवर दि. ०४ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी ९.०० ते १२.०० या वेळेत घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांना यापूर्वी देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणावे, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे.

यासंदर्भात सर्व प्राचार्य, केंद्राधिकारी, संबंधित महाविद्यालये, परीक्षा केंद्र यांना पत्राव्दारे परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून, संबंधितांनी याची सर्व विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

## मा. मुख्यमंत्री १५० दिवस कार्यक्रमांतर्गत

# 'महापालिका संदेशिनी' पोर्टलची सुरुवात

**अमरावती/का.प्र.**

मा. मुख्यमंत्री १५० दिवस कार्यक्रमांतर्गत नागरिकांपर्यंत महापालिकेच्या कार्यवाही, निर्णय, योजना आणि उपक्रमांची माहिती पारदर्शकपणे पोहोचविण्यासाठी अमरावती महानगरपालिकेतर्फे 'महापालिका संदेशिनी' या अधिकृत न्यूज पोर्टलचा शुभारंभ करण्यात आला.




या पोर्टलच्या माध्यमातून शहरातील स्वच्छता, पायाभूत सुविधा, पर्यावरण संरक्षण, नागरी सुविधा, विकासकामे, नागरिक सेवा आणि विविध सामाजिक उपक्रमांबाबतच्या बातम्या व अद्ययावत माहिती नागरिकांना एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. महापालिका प्रशासनाने नागरिकांशी संवाद वाढविणे, पारदर्शक प्रशासन मजबूत करणे आणि नागरिकांना अधिक माहितीपूर्ण बनविणे हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले.'महापालिका संदेशिनी' हे पोर्टल नागरिकांना शहरातील घडामोडी, निर्णय व उपक्रमांची अधिकृत व विश्वसनीय माहिती देणारे एक डिजिटल व्यासपीठ ठरणार आहे.अमरावती महानगरपालिकेच्या सर्व अधिकृत बातम्या, निवेदने आणि जनहिताची माहिती आता महापालिका संदेशिनी या पोर्टलवर उपलब्ध राहणार आहे.

# आमदार केवलराम काळे यांची बिनविरोध नियुक्ती

**धारणी/वार्ताहर**

आदिवासी बांधवांच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या आ. केवलराम काळे यांची आदिवासी विकास महामंडळ, नाशिक येथे संचालक पदावर बिनविरोध निवड झाली आहे.



या निवडणुकीपूर्वी या पदासाठी माजी आमदार राजकुमार पटेल यांचे बंधू जयप्रकाश पटेल यांच्या नावाची चर्चाही राजकीय वर्तुळात रंगली होती. त्यामुळे दोन्ही प्रतिस्पर्धी गट पुन्हा आमनेसामने येण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, शेवटच्या क्षणी आमदार काळे यांच्या विरोधात कोणताही उमेदवार न उभा राहिल्याने त्यांची निवड अविरोध झाली. या विजयाच्या पार्श्वभूमीवर धारणी भाजपा शहर तर्फे जल्लोष व आतषबाजी करण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून आमदार काळे आदिवासी विकास महामंडळाच्या संचालकपदावर कार्यरत असून, त्यांनी आपल्या कार्यकाळात आदिवासी बांधवांच्या शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या क्षेत्रात अनेक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या या सातत्यपूर्ण कार्यशैलीमुळेच त्यांना पुन्हा एकदा संचालकपदाची बिनविरोध निवड मिळाल्याची प्रतिक्रिया स्थानिक कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. त्यांच्या आशीर्वादामुळेच मला पुन्हा या पदावर बिनविरोध निवड मिळाली. आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी मी यापुढेही तेवढ्याच जोमाने कार्य करणार आहे.

## श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील

# पाच दिवसाची अवधूत भजनाची मांड

**कुऱ्हा/वार्ताहर**

तिवसा तालुक्यातील व विदर्भाची पंढरी आई रुक्मिणी मातेचे माहेर अशा प्राचीन पुरातन श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथील अवधूत महाराज चर्तुपती सेवा संस्थान तर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी २ नोव्हेंबर ते ७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये पाच दिवसाची अवधूत भजनाची मांड व अवधूत ज्ञान कथा व ६ नोव्हेंबरला सायं. ५ वा. दहिहांडी चा कार्यक्रम होईल. तसेच मंदिरामध्ये २ नोव्हेंबरला पहाटे ५.३० वा. उटी व गाय पूजन लहानुजी महाराज वानखडे टाकरखेडा यांचे हस्ते स. ६ ते ७ वा. चौघडा



व सायं. ६ ते ७ वा. चौघडा दु. २ ते सायं. ५ वा. प्रवक्ते अवधूत नाम प्रचारक ह.भ.प. वासुदेव चोपकर वऱ्हा यांचे सुमधुर वाणीतून कार्यक्रम होणार आहे. त्याचप्रमाणे परिसरातील सर्व अवधूत भजन मंडळ व संच यांचा अवधूत भजन व रात्रीचा जागर कार्यक्रम या परिसरातील अवधूत भजन मंडळ व संच यांचा सहभाग राहील. त्याचप्रमाणे या भागातील मान्यवरांचा व प्रमुख अतिथी व उपस्थितांचा सत्कार कार्यक्रम करण्यात येईल. ७ नोव्हेंबरला स. चौघडा स. ९ वा. अरजीला सुरुवात स. १०.३० वा. मांडीचा वाढवा व गाईचे पूजन होऊन दुपारी १२ वा. पासून महाप्रसाद होऊन कार्यक्रमाची सांगता होईल. या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आव्हान संस्थांचे अध्यक्ष रामदास नवल,उपाध्यक्ष राजन खारकर,सचिव विलासभाऊ माहूरे, कोषाध्यक्ष वासुदेव चोपकर, सहसचिव शिशुपाल इखार, संचालक मुकुंद चाफले, वसंत लोखंडे, प्रमोद इंगोले, नामदेव बेलके, अवधूत शिरपुरे, लहानोजी वानखडे यांनी केले आहे.

# कोळी समाजाला जात प्रमाणपत्र द्या

## मुख्यमंत्र्यांना कृती समितीचे निवेदन

**अमरावती -** अमरावती जिल्ह्यातील आदिवासी कोळी समाजाला कोळी महादेव (अनुसूचित जमात) प्रमाणपत्र देण्याची मागणी महाराष्ट्र कृती समितीचे महासचिव उमेश महादेवराव ढोणे यांनी केली.रा. सु. गवई स्मारक उद्घाटन सोहळ्यादरम्यान ढोणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यासंदर्भात निवेदन सादर केले. आदिवासी कोळी समाजाल 'कोळी महादेव' प्रमाणपत्र मिळाल्यास समाजाच्य न्याय व हक्कांसाठीचा अनेक वर्षापासूनचा संघर्ष संपुष्टात येईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले.

# मनपा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांची झोन क्र. ४ बडनेरा परिसरातील पाहणी

**अमरावती/का.प्र.**

शहर स्वच्छता मोहिमेअंतर्गत आज महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी झोन क्रमांक ४ बडनेरा क्षेत्रातील प्रभाग क्र. १९, २० व २१ येथील GVP (GaRage Vulnerable Points), वॉल पेंटिंग तसेच कंटेनर स्पॉट स्थळांची सविस्तर पाहणी केली.

या पाहणीदरम्यान त्यांनी स्वच्छता कामकाजाची प्रत्यक्ष स्थिती तपासली आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ते निर्देश दिले. शहरात स्वच्छता, सौंदर्यीकरण आणि जनजागृती उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी त्यांनी काही महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी वॉल पेंटिंग व माहितीफलकांचा अधिक वापर



करावा, तसेच कचरा संकलनाच्या ठिकाणी स्वच्छता व व्यवस्थापन सुधारावे, असे निर्देश दिले.पाहणीदरम्यान अमरावती शहर समन्वयक श्वेता बोके, तसेच संबंधित जेष्ठ स्वास्थ निरीक्षक शारदा गहाणे, यंग मार्वल IEC टीम उपस्थित होती. त्यांनी प्रभागातील सध्याची स्वच्छता स्थिती, नागरिकांचा प्रतिसाद, आणि राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांना दिली. 'स्वच्छता मोहिम केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाची आहे. नागरिकांनी घरगुती कचरा वेगळा करून देणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे आणि आपल्या परिसराची स्वच्छता राखणे ही सामूहिक जबाबदारी आहे,' असे त्यांनी सांगितले. अमरावती महानगरपालिका प्रशासनाच्या विविध उपक्रमांद्वारे शहरातील सर्व झोनमध्ये सातत्याने स्वच्छता, सुंदरता आणि जनजागृतीसाठी प्रयत्न सुरू असल्याचेही सांगण्यात आले.पाहणीमुळे संबंधित झोनमधील अधिकाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, पुढील काही दिवसांत GVP ठिकाणे व वॉल पेंटिंगद्वारे स्वच्छता जनजागृतीला अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## संक्षिप्त

### राष्ट्रीय एकता दिवस साजरा



**कुऱ्हा -** स्थानिक पोलीस स्टेशन कुऱ्हा येथे श्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंती निमित्ताने (राष्ट्रीय एकता दिवस) वॉक फॉर युनिटी चे आयोजन करण्यात आले. सदर वॉक फॉर युनिटी या कार्यक्रमा करिता पोलीस स्टेशन चे सर्व अधिकारी,अंमलदार, होमगार्ड, शांतता समिती सदस्य, शिक्षक, पोलिस पाटील, ग्राम पंचायत सदस्य, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र कुऱ्हा तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक,मुले व शालेय विद्यार्थी सहभागी झाले होते. अंदाजे जनसमुदाय १०० ते १२० लोक उपस्थित होते.

### जलाराम बापाची जयंती साजरी



**चांदुर रेल्वे -** स्थानिक संताबाई यादव मंगल कार्यालयात चंदाराणा कुटुंबाच्या वतीने जलाराम बापाची २२६ वी जयंती साजरी करण्यात आली. सुंदरकांड, श्याम भजन, आरती, पूजा आणि अन्न वाटप करण्यात आले. जलाराम बापाच्या फोटोची पूजा आरती करण्यात आली आणि अन्न वाटप करण्यात आले. या पूर्वसंध्येला संध्याकाळी, सचिन गिरधारीलाल चंदराणा यांच्या निवासस्थानी भजन गायक आशिष जालन यांनी श्याम प्रेमींसाठी श्याम भजन सादर केले. सचिन चंदाराणा, नीलेश चंदाराणा, प्रफुल्ल चंदाराणा, स्नेहल चंदाराणा, जयश्री चंदाराणा, शितल चंदाराणा, विरल आणि सेजल चंदाराणा, राम, टिळक, वल्लभ, हिनताश, चंदाराणा, धर्मेश सुचक, पूनम सुचक, हिमांशू, नित्यम सुचक, विक्की भक्कू, गोविंद राय, दीपकुमार गोविंद, पूनम हे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जालान, संजय उजळाईकर, प्रवीण शर्मा, प्रशांत माकोडे, सतीश जैस्वाल, चंदू बगाडे, सुनील राऊत यांनी आर्थिक परिश्रम घेतले.

### पी. आर. पोटे पाटील रुग्णालयात शिबीर



**अमरावती -** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने संचालित पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस आयुर्वेद, अमरावती येथे स्व. रामचंद्रजी पोटे पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त सामान्य रोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी एकूण १०५ रुग्णांची तपासणी करून त्यांना औषधोपचार व आवश्यक मार्गदर्शन केले. रुग्णांच्या आरोग्यविषयक अडचणींवर आयुर्वेद पद्धतीने उपचार करून त्यांना निरोगी जीवनशैलीबाबतही सल्ला देण्यात आला.शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. रणजित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या उपक्रमासाठी रुग्णालयातील वैद्यकीय चमू तसेच सर्व कर्मचारीवर्गाने सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. दिलीप चऱ्हाटे यांनी केले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात दादासाहेब गवई याची जयंती



**अमरावती-** स्मृतीशेष दादासाहेब गवई यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय उत्तम नगर येथे अभिवादनाचा कार्यक्रम झाला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य, तथा श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट चे सचिव डॉ. कमलाकर पायस यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे प्रा. पी.आर एस. हे उपस्थित होते, तसेच प्रा.डॉ. श्याम तंत्रपाळे, प्रा. अनिल धोटे, विजुभाऊ इंगळे, प्रा. प्रकाश बोरकर, यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला, प्रा. सुधिर संगोले,डॉ. प्रदीप अंबोरे, डॉ. प्रशांत खेडकर, डॉ. प्रकाश मस्के, डॉ. शुद्धोधन कांबळे, डॉ. राजेश देशमुख , प्रा. दिपाली पडोळे, डॉ. सुनील, प्रा. प्रवीण विधाते, प्रा. शंकर लाहोटी, प्रा. अनिल डोईफोडे, प्रा. हर्षवर्धन देशमुख, डॉ. ज्ञानेश्वर भगत, डॉ. अनिल पाचकुडके, प्रा. सुभाष मुंडे, प्रा. नवलकर, प्रा. रुद्रा चोपकर, प्रा. ज्योती टाले, प्रा. मेघा चिमणकर, प्रा. स्वप्निल मानकर, राजूभाऊ नाखले, किशोर भाऊ बिजवे, सागर शिरसाट, इत्यादी उपस्थित होते.

### विभागीय आयुक्तालयात राष्ट्रीय एकता दिनाची शपथ

**अमरावती -** भारताचे पहिले उपपंतप्रधान, गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्तालयात आज विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार करून अभिवादन केले. तसेच दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना राष्ट्रीय संकल्प दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेसही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.भारतीय एकात्मतेसाठी निश्चियपूर्वक धोरण आखून त्यासाठी पावले उचलणाऱ्या सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येत असलेल्या राष्ट्रीय एकता दिनानिमित्त विभागीय आयुक्तालयातील अधिकारी, कर्मचारी यांना विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांनी राष्ट्रीय एकतेची शपथ दिली.यावेळी उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार प्रज्ञा काकडे, नायब तहसीलदार श्याम देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# राज्यातील प्रत्येक गरजू शेतकरी कर्जमुक्त होणार

## -'प्रहार'चे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांची रणनीती

### ३० जूनच्या मुदतीमागचे गूढही उलगडले

**अमरावती/प्रतिनिधीः-** आजच्या तारखेत कर्जमाफी घेतली असती तर केवळ २०१९ ते २०२४ या आर्थिक वर्षातील थकीत शेतकऱ्यांनाच लाभ मिळाला असता. यंदा अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफीची गरज आहे. आज त्यांना उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे. जगण्यासाठीचा संघर्ष सुरू आहे. या माझ्या शेतकरी बांधवांसाठी ३० जूनपर्यंतच्या कर्जमाफीसाठी वेळ दिली. ३१ मार्चनंतर हे सर्व थकीबाकीदार होऊन त्यांनाही कर्जमाफीचा लाभ मिळेल. राज्यातील सर्व गरजू



शेतकऱ्यांचा सात-बारा यातून कोरा होईल, असा विश्वास प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी (दि.३१) व्यक्त केला आहे. काही जणांकडून सोशल मीडियावर या कर्जमाफीच्या मुदतीच्या अनुषंगाने दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यात कुठलेही तथ्य नसल्याचेही कडू यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे, शेतकरी नेते शरद जोशी यांच्यानंतर पहिल्यांदाच बच्चू कडू यांच्या नेतृत्वात राज्यातील लाखो शेतकरी एका झेंड्याखाली आले. या महाएल्गारमुळे शेतकऱ्यांना परत एकदा आपली ताकद लक्षात आली आहे.

अमरावती जिल्ह्यातील बेलोरा गावातून शेतकऱ्यांसह महाएल्गार पुकारत बच्चू कडू यांनी ट्रॅक्टर मोर्चा काढला. अमरावती, वर्धा जिल्ह्यातील गावागावांतून मार्गक्रमण करीत हा मोर्चा नागपूरच्या वेशीवर धडकला. लाखोंच्या संख्येतील हे शेतकऱ्यांचे वादळ पाहून सरकारला धडकी भरली. राज्यमंत्री पंकज भोयर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल हे दोन नेते बच्चू कडू यांच्या भेटीसाठी पाठविण्यात आले. पण, कर्जमाफीची तारीख जाहीर झाल्याशिवाय वाटाघाटी होणार (पान २ वर)



शेतकरी हितासाठी पुकारलेले महाएल्गार आंदोलन स्थगित केले आहे, रद्द नाही. शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय झाला म्हणून आम्ही थांबलोय. सरकारने शब्द पाळला नाही, तर पुन्हा रस्त्यावर उतरणार. या आंदोलनाचे यश सर्वांचे आहे. मी फक्त शेतकऱ्यांचा आवाज पोहचविणारा माध्यम आहे. जेव्हा शेतकरी बुडतो, तेव्हा सरकार झोपलेले असते. पण जेव्हा शेतकरी उठतो, तेव्हा सरकार हादरते. शेतकऱ्याच्या घामाचे मोल पैसे नाही, धोरणे ठरवितात. आणि ती आम्ही बदलवणारच.

# जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांना मिळणार १,११७ कोटींचा मदतनीधी

### -भाजपा आमदारांच्या पाठपुराव्याला यश !

**वरूड-** जिल्ह्यात झालेल्या सततच्या पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. या नुकसान भरपाईसाठी व ५७० कोटी आणि रब्बी हंगामाकरीता बियाणे व इतर अनुषंगिक बाबींकरीता विशेष मदत म्हणून ५४७ कोटी रूपयांचा निधी देण्याचा निर्णय गुरूवारी शासनाने घेतला आहे. मागील सहा दिवसापासून जिल्ह्यातील भाजपाचे आमदारांनी राज्याचे मुख्यमंत्री, पालकमंत्री, वित्त विभाग तसेच जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. राज्यात केवळ अमरावती जिल्ह्याला हा निधी प्राप्त झाला असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दोन स्वतंत्र शासकीय निर्णय जाहीर झाले आहे. अतिवृष्टी, पूर आणि सततच्या पावसामुळे जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीसाठी हा निधी वितरित करण्यात येत असल्याची



माहिती पत्रकार परिषदेत आमदार प्रताप अडसड यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील ४ लाख ९० हजार ९११ शेतकऱ्यांची ४ लाख ८१ हजार ५०३ हेक्टर जमीन बाधीत झाली होती. यासाठी ४९० कोटी रूपयांचा निधी वितरीत केला आहे. तसेच दोन हेक्टरवरून तीन हेक्टर मर्यादा (पान २ वर)

# परतवाडा वरून निघालेल्या संगीतम ट्रॅव्हल्सचा पुण्यामध्ये अपघात

**परतवाडा :** परतवाडा वरून पुण्यासाठी निघालेल्या संगीता ट्रॅव्हलचा पुण्याजवळील कारेगाव येथे भीषण अपघात झाला. या अपघातात पाच लोकांच्या जखमी झाल्याची माहिती आहे. माहिती नुसार शुक्रवारच्या सकाळी संगीतम ट्रॅव्हल्स पुण्यासाठी निघाली होती. कारेगाव जवळ बस पोहचली असता पुणे हायवेवर ट्रक एम एच १२ टीएफ ३१०८ ने ब्रेक लावले तर मागून येणाऱ्या संगीतम ट्रॅव्हल्सने ही ब्रेक लावले आणि त्याच्या मागून येणाऱ्या रामायण ट्रॅव्हल्स एमएच १९ सी एक्स ४८८४ ने ही ब्रेक लावत संगीतम ट्रॅव्हल्सला धडक दिली. ज्यावेळी ही दुर्घटना झाली त्यावेळी बसमधील लोक झोपेत होते. यामध्ये पाच ते सहा लोक जखमी झाले आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिक मदतीसाठी धावले. त्यांनी जखमींना बसच्या बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात पाठवले.



# १५ नोव्हेंबरपासून नाफेडची मूग, उडीद, सोयाबीन खरेदी सुरू

## -शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन

### -जिल्ह्यातील १५ नोंदणी केंद्रांना मान्यता

**अमरावती/प्रतिनिधीः** केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मूग, उडीद आणि सोयाबीन पिकांची खरेदी १५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणी करावी लागणार आहे. ही नोंदणी दि. ३० ऑक्टोबरपासून सुरू झाली आहे.

शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणीची अंतिम मुदत ही दि. ३१ डिसेंबर आहे. त्यानंतर १५ नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया सुरू होणार आहे. खरेदीचा कालावधी हा दि. १५ नोव्हेंबरपासून पुढील ९० दिवसांसाठी राहणार आहे. जिल्ह्यात १५ खरेदी केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. जिल्ह्यात पणन महासंघाचे ८ आणि विदर्भ को-ऑपरेटिव्हच्या ७ उपअभिकर्ता संस्थांच्या खरेदी केंद्रांना शेतकरी नोंदणीसाठी मान्यता मिळाली आहे.

पणन महासंघाच्या उपअभिकर्ता (पान २ वर)

# आलिशान बुलेट बाइक ने रेकी अन् घरफोड्या

## -अंजनगाव पोलीसांनी चार आरोपीच्या नांग्या ठेचल्या, एक फरार

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधी :** - अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन हद्दीत २९ ऑक्टोबर रोजी चोरीचा गुन्हा उघडकीस करण्यात आला. त्यामध्ये एकूण पाच आरोपीचां समावेश असून तसेच पाच लाखाचा मुद्देमाल सुद्धा हस्तगत करण्यात आल्याचे ठाणेदार सुरज बोंडे यांनी सांगितले.

अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन हद्दीतील शहरी व ग्रामीण भागात मागील काही महिन्यापासून घरफोडी व चोरीच्या घटनेस मोठ्या प्रमाणावर वाढ झाली होती.

### -आरोपी कडून पाच लाखांचा माल जप्त



ज्यामध्ये दिवसा व रात्रीच्या घरफोडी मोठ्या प्रमाणात होत्या. नुकतेच काही दिवसापूर्वी नवीन रुजू झालेले ठाणेदार सुरज बोंडे यांनी सदर गुन्ह्याचा तपास लावण्याचा आदेश काही पोलीस कर्मचाऱ्यांना दिला व तांत्रिक पुरावाच्या आधारे व गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. आरोपी जुबेरोदिन कलिमोदिन वय २२ रा अंजनगाव, निरोदिन उर्फ मुक्का नजमोदीन (पान २ वर)

# जीएचआरयू अमरावतीत सायबर गुन्हे जागरूकतावर सत्र

**अमरावती :** डिजिटल धोक्यांमध्ये झपाट्याने होणाऱ्या वाढीच्या पार्श्वभूमीवर जी. एच. रायसोनी युनिव्हर्सिटी (जीएचआरयू), अमरावती येथे नुकताच 'सायबर गुन्हे जागरूकता : सूचित राहा, सुरक्षित राहा' या शीर्षकाखाली महत्वपूर्ण अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले. कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग आणि फॉरेन्सिक सायन्स विभागांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम मुख्य इमारतीतील सेमिनार हॉलमध्ये पार पडला. यात १५० पेक्षा अधिक विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी सहभाग घेतला. सत्राची सुरुवात फॉरेन्सिक सायन्सच्या सहाय्यक प्राध्यापिका सुश्री रितिका कुमारी यांच्या स्वागत संबोधनाने झाली.



संशोधन व विकास डीन तसेच फॉरेन्सिक सायन्स प्रमुख डॉ. मंगेश ढोरे यांनी थीम आणि वक्त्यांचा परिचय करून दिला.

विशेषज्ञांमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उप कुलसचिव डॉ. सुलभा पाटील, अमरावती सायबर पोलीस स्टेशनचे श्री. अनिकेत वानखेडे आणि सायबर सुरक्षा प्रशिक्षक निखिल माहोरे यांचा समावेश होता. २१ वर्षांच्या शैक्षणिक अनुभव असलेल्या डॉ. पाटील यांनी सायबर हायजीन, कायदेशीर जागरूकता आणि अभ्यासक्रमात सुरक्षेचे एकीकरण यावर भर दिला. वानखेडे यांनी फिशिंग, रॅन्समवेअर, ओळख चोरी यासारख्या वाढत्या धोक्यांवर आणि तपासात डिजिटल फॉरेन्सिकची भूमिका यावर प्रकाश टाकला, ज्यामुळे सायबर कायद्याच्या अंमलबजावणीत करिअरची प्रेरणा मिळाली. माहोरे यांनी प्रतिबंधावर लक्ष केंद्रित करून मजबूत पासवर्ड, दोन-घटक प्रमाणीकरण, सुरक्षित व्यवहार आणि सोशल इंजिनिअरिंगबाबत सतर्कतेची सल्ला दिला.

कार्यक्रमात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल, (पान २ वर)

# १०४ किलो गांजासह दोन तस्कर ताब्यात

## -ग्रामीण गुन्हे शाखेची मोठी कारवाई -२६.१६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती :** ओडिसा राज्यातून अमरावती जिल्ह्यात विना नंबरच्या कारमधून गांजा तस्करी करणाऱ्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. रवी रामराव राठोड (३६,भिवापूर, कुऱ्हा) व आकाश गौतम भडके (३२,वाई बोथ, नांदगाव खंडेश्वर) अटक करण्यात आलेल्या आरोपी यांचे नावे आहे. त्यांच्याकडून २० लाख ६६ हजार रुपयाचा १०४ किलो ८७९ ग्राम गांजा व बोलेरो वाहन ५ लाख ५० हजार असा एकूण २६ लाख १६ हजार ९६० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.माहिती



नुसार ग्रामीण गुन्हे शाखेचे पीएसआय मुलचंद भांबुरकर आपल्या पथकासोबत तिवसा हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी त्यांना गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, काही ईसम चार चाकी वाहनाने नागपूरकडून अमरावतीकडे अवैधरित्या गांजा वाहतूक करून घेऊन जाणार आहे. पथकाने तात्काळ नागपूर ते अमरावती हायवे वरील मोझरी दासटेकडी - डवरगांव उडानपुला खाली नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली असता एक विना क्रमांकच्या सिल्वर रंगाच्या बोलेरो वाहनाला थांबून वाहना मध्ये असलेल्या चालक व बाजूला बसलेले त्याचे नाव विचारले. त्यांनी रवी रामराव राठोड व आकाश गौतम भडके असे नाव सांगितले. दोघे कुठून आले कुठे जात आहे याबाबत विचारपूस केली असतात ते उडवा उडवीचे उत्तरे देत होते. यामुळे त्यांच्यावर संशय (पान २ वर)

# ओला इलेक्ट्रिक दुचाकी ग्राहकांसाठी डोकेदुखी

## -सोमवारी शोरूमला ताला ठोको आंदोलन


**अमरावती :** ओला इलेक्ट्रॉनिक दुचाकी ग्राहकांसाठी डोकेदुखी ठरत आहे .या दुचाकी मध्ये मोठ्या प्रमाणात तांत्रिकी अडचणी येत आहे. ओला ही इलेक्ट्रिकल नावाजलेली इलेक्ट्रॉनिक दुचाकी गाड्यांची कंपनी आहे. या कंपनीचे जिल्हामध्ये शोरूम असून जिल्ह्यातील विविध तालुक्यामधून यांच्या शोरूम मध्ये गाड्यांची विक्री होते,परंतु देखभाल व दुरुस्ती सेंटर हे अमरावतीला आहे.तेथे अपुरा स्टाफ आहे. यामुळे ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. कंपनीच्या या मनमानीच्या विरोधात सोमवार ३ नोव्हेंबर रोजी ग्राहकांनी शोरूम व सर्विस सेंटरला ताला ठोको आंदोलन



करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती आज शुक्रवार ३१ ऑक्टोबर रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये देण्यात आली. ग्राहकांनी सांगितले की ही कंपनी फक्त गाड्यांच्या विक्रीवर भर देत असून ग्राहकांना विक्री पश्चात सेवा देत नाही आहे. वर्कशॉप मध्ये जवळपास २०० ते २५० गाड्या बारा महिने उभे राहतात कारण की त्यांच्याकडे स्पेअर पार्ट नसतात. तसेच कुशल अनुभवी कर्मचारी अभावी या गाड्या दुरुस्त केल्या जात नाही. संपूर्ण जिल्ह्यातून आणि (पान २ वर)

# फासात अडकलेल्या कोल्ह्याला जीवदान

**अमरावती :** क्लचर वायरच्या फासात अडकलेल्या कोल्ह्याला वन अधिकाऱ्यांनी जीवदान दिल्याची घटना आज शुक्रवार ३१ ऑक्टोबर च्या सकाळी इर्विन चौकात समोर आली आहे. माहिती नुसार शुक्रवारच्या सकाळी १० वाजता सुमारास ईविन चौक येथील सुरज कॅफे च्या मागे



तार कंपाऊंडच्या क्लचर वायर च्या फासा मध्ये कोल्हा अडकला असल्याची माहिती नागरिकांनी वन विभागाला दिली. माहिती मिळता वन विभागाचे रेस्क्यू पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी कोल्ह्याला रेस्क्यू करून नैसर्गिक अधिवासात सोडले. सदर कार्यवाही महेश धदर वनपरिक्षेत्र अधिकारी, अमोल गावनेर वनपाल, फिरोज खान वनपाल,मनोज ठाकुर वनमजूर, संदिप चौधरी वाहन चालक,व सुशिल तायडे यांनी केली.

# ब्रह्मा कुमारी विश्व परिवर्तन भवन येथे 'भावेश' कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न

**अमरावती -** अमरावती येथील ब्रह्मा कुमारी विश्व परिवर्तन भवन येथे जिल्हास्तरीय बहिणींसाठी प्रेरणादायी 'भावेश' कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.



अमरावतीच्या जिल्हा संचालक राजयोगिनी ब्रह्मा कुमारी सीता दीदी आणि इंद्रा दीदी यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. दोन्ही बहिणींनी उपस्थित असलेल्या सर्व ब्रह्मा कुमारी बहिणींचे हार्दिक स्वागत केले आणि त्यांना सेवेच्या मार्गावर चालत राहण्याचे प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अमरावतीचे प्रसिद्ध समाजसेवक चंद्रकुमार (लप्पी भैया) जाजोदिया होते. त्यांच्या प्रेरणादायी भाषणात ते म्हणाले, 'ब्रह्मा कुमारी बहिणी जगभर शांती, शक्ती आणि सद्भावना पसरवून मानवतेची अमूल्य सेवा करत आहेत. त्यांची शांतीची देणगी ही आधुनिक काळाची सर्वात मोठी (पान २ वर)

# एमएसएमई उद्योगांच्या सर्वांगिण विकासासाठी सर्वकष प्रयत्न करणार - विभागीय आयुक्त डॉ.श्वेता सिंघल

## -खर्च आणि स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी एमएसएमईचा त्रि-स्तरीय कार्यक्रम महत्वपूर्ण ; तज्ज्ञांचे मत

**अमरावती :** सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपीच्या) ३० टक्के आणि जागतिक निर्यातीमध्ये ४५ टक्के योगदान देते. तसेच शेती क्षेत्रानंतर दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक रोजगार निर्माण करणारे क्षेत्र आहे. विकसित भारत-२०४७ च्या दृष्टीने विकसित अर्थव्यवस्था या





आकांक्षा पूर्ततेसाठी एमएसएमई क्षेत्राला अधिक बळकट व लवचिक बनवणे आवश्यक आहे. विभागातील एमएसएमई अंतर्गत येणाऱ्या उद्योगांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने ज्या-ज्या आवश्यक बाबींची पूर्तता करावयाची आहे, त्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा केल्या जाईल, असे विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी आज येथे सांगितले.

केंद्र सरकारच्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय अंतर्गत असलेल्या नागपूर एमएसएमई विकास कार्यालय, अमरावती एमआयडीसी असोसिएशन, औद्योगिक वसाहत सहकारी संस्था व नांदगाव पेठ एमआयडीसी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'एमएसएमई उद्योजकांच्या खर्च आणि स्पर्धात्मकतेबाबत क्षमता बांधणी' (पान २ वर)

# ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचेवर आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्यांना अटक करा

## तिवसा पोलीस स्टेशनला तक्रार

**तिवसा/प्रतिनिधीः-** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्याबाबत अपमानजनक तथा आक्षेपार्ह वक्तव्य करणारे व्हिडिओ पोस्ट करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांचे विरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी तिवसा तालुका वंचित बहुजन आघाडीने केली असून तसा रीतसर तक्रार अर्ज युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते यांनी तिवसा पोलीस स्टेशनमध्ये दाखल केला आहे.

समाज माध्यमावरील एका फेसबुक पेजवरून वंचित बहुजन



आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह आणि जातीयवादी टिपण्णी असलेला एक व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आला असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २४ ऑक्टोबर २०२५ रोजी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने औरंगाबाद जिल्ह्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (एए) कार्यालयावर जनआंदोलन (पान २ वर)